मराठी अस्मितेचा आवाज बुलंद करण्याचे कार्य गेली २७ वर्षे करणारे 'दैनिक वृत्तमानस' आता घरोघरी पोचवण्याचे काम आम्ही करणार आहोत. वाचकांना आमच्या लोकप्रिय दैनिकाची प्रत उपलब्ध होत नसेल तर या दूरध्वनींवर संपर्क साधावा.
**दातार अँड सन्स न्युज पेपर डिस्ट्रिब्युटर्स**
भ्रमणध्वनी - ८६५५१९४४५२, ८५९१६६२६१६,९८६७३०८०६३

मराठी अस्मितेचा बुलंद आवाज.

https://epapervrittamanas. in/

# वृत्तमानस

Email : vrittamanas1@gmail. com

मुंबई/ पालघर | मुंबई, शुक्रवार, १३ सप्टेंबर २०२४ | वर्ष- २९ | अंक - ८४ | पाने- ८ | आर. एन. आय क्र. - ६५६०९/९६ | किंमत : ३ रुपये



रायगड जिल्ह्यातील धाटाव एमआयडीसीत भीषण स्फोट पान ४

## चीन जेव्हा सैन्य मागे घेईल तेव्हाच संबंध सामान्य होतील!



**जिनेव्हा :** केंद्रीय परराष्ट्र मंत्री एस जयशंकर यांनी पूर्व लडाखमध्ये चीनसोबत सुरू असलेल्या तणावासंदर्भात भाष्य केले आहे. तेथील 75% वाद मिटला आहे. मात्र, सीमेवर जमलेले चिनी सैनिक हा अद्यापही एक मोठा मुद्दा आहे, असे त्यांनी म्हटले आहे. स्वित्झर्लंडमधील जिनेव्हा येथे एका थिंक टँकशी चर्चा करताना ते बोलत होते. जयशंकर म्हणाले, जून 2020 मध्ये गलवान व्हॅलीमध्ये जो संघर्ष झाला, त्याचा परिणाम आमच्या संबंधांवर झाला आहे. सीमेवर कुणालाही हिंसाचाराची परवानगी दिली जाऊ शकत नाही. चीन जेव्हा आपले सैन्य मागे घेईल तेव्हाच संबंध सामान्य होऊ शकतात, ही आमची अट आहे. जयशंकर म्हणाले, वाद सोडवण्यासाठी दोन्ही देशांदरम्यान चर्चा सुरू आहे. यात काही प्रमाणात प्रगती झाली आहे. दोन्ही देशांचे सैन्य आमनेसामने आहे. याला कसे सामोरे जायचे आणि हा प्रश्न कसा सोडवायचा यावर दोन्ही देश चर्चा करत आहेत.

# मुंबईचे जागतिक आर्थिक केंद्राचे स्वप्न दृष्टीपथात : मुख्यमंत्री शिंदे

**मुख्यमंत्री शिंदे, उपमुख्यमंत्री फडणवीस यांच्या उपस्थितीत वर्ल्ड इकॉनॉमिक फोरम व एमएमआरडीए यांच्यात सामंजस्य करार**

## मुंबई जगातील सात महत्वाच्या महानगरांमध्ये स्थान पटकावेल – प्रा. श्वाब

**प्रतिनिधी**
**मुंबई**

वर्ल्ड इकॉनॉमिक फोरम आणि मुंबई महानगर क्षेत्र विकास प्राधिकरण- एमएमआरडीए यांच्यातील सामंजस्य करारामुळे मुंबईचे जागतिक आर्थिक केंद्राचे स्वप्न दृष्टीपथात आले आहे. यातून आगामी काळात मुंबईचा जीडीपी - सकल उत्पन्न दुप्पट होईल असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी येथे सांगितले. तर निती आयोगाने महाराष्ट्राच्या एक लाख कोटी डॉलर्स – वन ट्रिलीयन डॉलर्स ईकॉनॉमीच्या दिशेने टाकलेल्या पावलांना बळ दिले आहे, असे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांनी सांगितले.

मुख्यमंत्री शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत आज सह्याद्री राज्य अतिथीगृह येथे मुंबई महानगर प्रदेश (एम.एम.आर) ला 'जागतिक आर्थिक केंद्र' म्हणून विकसित करण्याबाबत निती आयोगाच्या अहवालाचे प्रकाशन करण्यात आले. तसेच मुंबई महानगर क्षेत्र विकास प्राधिकरण- एमएमआरडीए व वर्ल्ड इकॉनॉमिक फोरम यांच्या एमएमआर वर्ल्ड ईकॉनॉमी हबसाठीच्या सामंजस्य करार करण्यात आला.

या करारावर एमएमआरडीएचे महानगर आयुक्त विक्रमकुमार तसेच वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमचे संस्थापक तथा कार्यकारी अध्यक्ष प्रा. क्लॉस श्वाब यांनी स्वाक्षरी केल्या व करारांचे अदान-प्रदान केले.


या समारंभास उद्योग मंत्री उदय सामंत, शिक्षण मंत्री दीपक केसरकर, वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमचे संस्थापक तथा कार्यकारी अध्यक्ष प्रा. श्वाब, श्रीमती हिल्डे श्वाब, निती आयोगाचे मुख्य कार्यकारी अधिकारी बी. व्हि. आर. सुब्रमण्यम, राज्याच्या मुख्य सचिव सुजाता सौनिक, पालिकेचे आयुक्त तथा प्रशासक भूषण गगराणी तसेच उद्योग, बांधकाम तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री शिंदे म्हणाले, गणेशोत्सवाच्या दरम्यान मुंबईच्या दृष्टीने अत्यंत महत्वाच्या संकल्पनेचा शुभारंभ होत आहे. मुंबई महानगर प्रदेश हे जागतिक आर्थिक केंद्र व्हावे हे स्वप्न होते. हे स्वप्न साकार होत असल्याचा विशेष आनंद आहे. पान 7 वर




**विस्तीर्ण समुद्र किनाऱ्यांमुळे पर्यटन उद्योगालाही चालना**

*मुंबई, पालघर, ठाणे आणि रायगड या जिल्ह्यांचा समावेश असलेल्या या संकल्पनेतून या परिसरात मोठ्या क्षमतेचे डाटा सेंटर, वाढवण, दिघी या बंदरामुळे परिसराचा कायापालट होईल. विस्तीर्ण समुद्र किनाऱ्यामुळे पर्यटन उद्योगालाही चालना मिळेल. महाराष्ट्रात उद्योगांसाठी पोषक वातावरण आहे. गुंतवणूकदारांना सुविधा देण्यात येताहेत. महाराष्ट्र परकीय गुंतवणूक मिळवणारे भारतातील प्रथम क्रमाकांचे राज्य आहे. यामुळे रोजगार, स्टार्टअपस्, क्लीन एनर्जी यामध्येही महाराष्ट्र नेतृत्व करत असल्याचेही मुख्यमंत्री म्हणाले.*




मुंबई : भव्य दिव्य बाप्पाची मूर्ती आणि सामाजिक उपक्रमांसाठी लोकप्रिय असलेल्या नरेपार्कच्या परळ सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाने यंदा गणरायाची श्री खंडेरायाची 'मल्हारी मार्तंड' रूपातील भव्य मूर्ती उत्सवात गणेशभक्तांसाठी मंडपात बसवली आहे. अतिशय तेजस्वी आणि विशाल बाप्पाच्या दर्शनासाठी भाविक मोठी गर्दी करीत आहेत. यंदा या गणेशोत्सव मंडळाचे ७८वे वर्ष आहे. मंडळाने यंदाही आपली सामाजिक, शैक्षणिक आणि धार्मिक उपक्रमांची मालिका अखंडित सुरु ठेवली आहे.

छायाचित्र - अनिल पानस्कर

## कॉम्रेड येचुरींचे निधन



**नवी दिल्ली :** मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे महासचिव सीताराम येचुरी यांचे वयाच्या 72 व्या वर्षी निधन झाले. त्यांना 19 ऑगस्ट रोजी खूप ताप आल्याने दिल्लीच्या एम्समध्ये दाखल करण्यात आले होते. 25 दिवसांपासून त्यांच्यावर उपचार सुरू होते. कुटुंबाने त्यांचा देह रुग्णालयाला दान केला आहे. सीपीआय(एम) ने जारी केलेल्या निवेदनात म्हटले आहे की, कॉम्रेड सीताराम येचुरी यांना श्वसनाचा गंभीर संसर्ग झाला होता. डॉक्टरांचे पथक त्यांच्यावर उपचार करत होते. या 72 वर्षीय सीपीएम नेत्याचे नुकतेच मोतीबिंदूचे ऑपरेशनही झाले होते.

## मी राजीनामा देण्यास तयार



**कोलकाता :** पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी राजीनामा देण्याबाबत वक्तव्य केल्याने राजकारणात खळबळ उडाली आहे. कोलकाता बलात्कार प्रकरणी आंदोलन करणाऱ्या डॉक्टरांनी मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्यासमवेत बैठकीला उपस्थित राहण्यास नकार दिला.

सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानंतर बंगाल सरकारने आंदोलन करत असलेल्या डॉक्टरांना मुख्यंमत्री ममता बॅनर्जी यांच्यासमवेत चर्चेचं निमंत्रण दिलं होतं. त्यासाठी, ममता डॉक्टरांकडेही पोहोचल्या. मात्र, 2 तासांहून अधिक वेळ त्यांनी वाट पाहूनही आंदोलक डॉक्टर त्यांच्यासोबत चर्चेला पान 7 वर

## कोस्टल रोड मुंबईसाठी गेमचेंजर ठरेल - मुख्यमंत्री

**मुंबई**

धर्मवीर स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज मुंबई किनारी रस्ता प्रकल्प (दक्षिण) हा मुंबईसाठी गेमचेंजर असा प्रकल्प असून यामुळे मुंबईकरांचा प्रवास सुखकारक, जलद, दिलासादायक आणि वेळेची बचत करणारा असून मुंबईच्या पायाभूत सुविधा विकासातील पुढचे पाऊल असल्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज या प्रकल्पाच्या लोकार्पणासमयी सांगितले. या प्रकल्पामुळे मरिन लाईन ते वांद्रे सी लिंक हा प्रवास केवळ 10 मिनिटात पूर्ण होणार असून यामुळे वेळ, इंधन वाचेल आणि प्रदुषण कमी होऊन मुंबईकरांची कार्यक्षमता वाढेल, असा विश्वास मुख्यमंत्री श्री.शिंदे यांनी व्यक्त केला. धर्मवीर स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज मुंबई किनारी रस्ता प्रकल्प (दक्षिण) या प्रकल्पाचे लोकार्पण मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते आज करण्यात आले.

सविस्तर वृत्त पान 3 वर



सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
ऊर्जा विभाग
महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

नरेंद्र मोदी
प्रधानमंत्री
एकनाथ शिंदे
मुख्यमंत्री
देवेंद्र फडणवीस
उपमुख्यमंत्री तथा ऊर्जा मंत्री
अजित पवार
उपमुख्यमंत्री

उपमुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री मा. श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते मागेल त्याला सौर कृषिपंप योजनेसाठी महावितरणच्या नोंदणी वेबपोर्टलचे उद्घाटन, पोस्टरचे अनावरण आणि माहिती पुस्तिकेचे प्रकाशन

वीज शेतीला... ऊर्जा शेतकऱ्यांना!

मुंबई येथे दिनांक १३ सप्टेंबर २०२४ रोजी

मागेल त्याला सौर कृषिपंप
महाराष्ट्रात १० लाख सौर कृषिपंप बसविण्याची महत्त्वकांक्षी योजना
शेतकऱ्यांना सिंचनासाठी हक्काची स्वतंत्र आणि शाश्वत योजना



**मागेल त्याला सौर कृषिपंप**
शेतकऱ्यांसाठी २७ हजार कोटी रुपयांची सौर कृषिपंप योजना १० टक्के रक्कम भरून सोलर पॅनेलसह पंप
अनुसूचित जाती-जमातींसाठी लाभार्थी हिस्सा ५ टक्के
- सिंचनासाठी दिवसा वीज पुरवठा वीजबिल नाही, लोडशेडिंगची चिंता नाही
- पाच वर्षे देखभाल दुरुस्तीची विमा संरक्षणासह हमी
- उर्वरित रक्कम केंद्र आणि राज्य सरकारकडून अनुदान जमिनीच्या क्षेत्रफळानुसार ३ ते ७.५ एचपीचे पंप
- https://www.mahadiscom.in/solar_MTSKPY/index.php या वेबसाईटवर नोंदणी करा

**मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजना**
- ७.५ एचपीपर्यंत शेती पंपांना मोफत वीज
- ४४ लाख शेतकऱ्यांना लाभ
- १४,७६१ कोटी रुपयांची तरतूद

**मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.०**
- कृषी फीडर्स सौर ऊर्जेवर चालणार
- सिंचनासाठी दिवसा वीज पुरवठा
- जगातील सर्वात मोठा १२००० मेगावॅट क्षमतेचा डिस्ट्रीब्यूटेड रिन्यूएबल एनर्जी प्रकल्प
- ४०,००० कोटी रुपयांची गुंतवणूक आणि ३०,००० रोजगार निर्मिती

**संभाजीनगर जिल्ह्यातील**
**धोंदलगाव येथे मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजने २.० अंतर्गत कार्यान्वित करण्यात आलेला सौरऊर्जा प्रकल्प**



योजनेत सहभागी होण्यासाठी www.mahadiscom.in, महावितरण मोबाईल ॲपवर सुविधा उपलब्ध किंवा जवळच्या कार्यालयाशी त्वरित संपर्क साधा (ग्राहक सेवा क्रमांक:- 1912/ 18002333435 / 18002123435)

## मोबाईल सोडा, मैदानावर या; गणेशोत्सव सजावटीतून दिल्या कानपिचक्या

**मुंबई :** आजकाल मोबाईल गेमच्या विळख्यात तरुणांपासून ते लहान मुले अडकली आहेत त्यामुळे मैदानी खेळांकडे दुर्लक्ष होत आहे. तरुणांनी व लहान मुलांनी मैदानी खेळाकडे आकर्षित व्हावे व एक धाव आरोग्यासाठी असा मौलिक संदेश देणारी संकल्पना कुर्ला कामगार नगर सार्वजनिक गणेशोत्सवात साकारण्यात आली आहे . या सजावटीमध्ये क्रिकेट , फुटबॉल या खेळांचे देखावे करण्यात आले आहेत. जेणेकरुन तरुण व लहान मुले मोबाईल गेमच्या विळख्यातून बाहेर पडून मैदानी खेळाला प्राधान्य देतील, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे. सिनियर क्रिकेट क्लबचे विश्वस्त सुधीर गावडे, श्री गजानन वाविकर , राजू देसाई, श्री नयन तळवडेकर तसेच उत्सव समिती चे सिध्दार्थ कारंडे, पुरुषोत्तम पवळे, निखिल तारकर, प्रथमेश तारकर, रोशन देसाई, ओंकार पाचलग, अमोल परब, प्रथमेश तारकर, गौरव परब , उमेश सावंत या तरुणांनी अपार मेहनतीने हा देखावा साकार केला आहे. तसेच विविध क्रीडा स्पर्धा जिंकलेले चषकही या सजावटीत मांडण्यात आले आहेत. मोबाईल मुळे झपाटलेल्या पीढीच्या डोळ्यात झणझणीत अंजन या सजावटीने घातले आहे.




## थोडक्यात

### राष्ट्रीय महिला कबड्डी खेळाडू पुष्पा महाडेश्वर काळाच्या पडद्याआड



**मुंबई:** बँक ऑफ महाराष्ट्र, मुंबई व महर्षी दयानंद स्पोर्ट्स क्लबची राष्ट्रीय खेळाडू पुष्पा महाडेश्वर(रोडे) हिचे काल दिनांक ११सप्टेंबर २०२४रोजी सायंकाळच्या सुमारास प्रदीर्घ आजाराने निधन झाले. निधना समयी ती ६२ वर्षाची होती. तिच्या पश्चात एक मुलगा व मुली असा परिवार आहे. काही वर्षापूर्वी तिच्या पतीचे निधन झाले होते. कबड्डी खेळाडू म्हणून महाराष्ट्र बँक व महर्षी दयानंद संघाकडून खेळताना तिने महाराष्ट्रातील व देशातील अनेक मैदाने गाजविली होती. आजारपणामुळे तिने बँकेतून काही वर्षापूर्वी सेवानिवृत्ती घेतली होती. तिने तीन राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेत महाराष्ट्राचे प्रतिनिधीत्व केले होते. उत्कृष्ट डावा कोपररक्षक असलेली पुष्पा चवडा काढण्यात निष्णात होती. चढाईत पाठलाग करून गडी टिपण्यात तिचा हातखंडा होता. आज दिनांक १२सप्टेंबर रोजी दुपारी १२-० ०च्या सुमारास तिच्या पार्थिवावर चेंबूरच्या चरई स्मशानभूमीत मुलाच्या अंत्य संस्कार करण्यात आले.

### घाटकोपर मध्ये वृत्तपत्र विक्रेत्याला बेस्ट बसची धडक

**मुंबई:** घाटकोपर पश्चिमेकडील सर्वोदय सिग्नल जवळ वृत्तपत्रांची रिक्षामधून ने आण करणाऱ्या अनिल साळुंखे ५२ वर्षीय यांना बेस्ट बसने धडक दिल्याने जखमी झाले.सदर घटनेची माहिती मिळताच इतर वृत्तपत्र विक्रेत्यांनी पोलिसांच्या मदतीने त्यांना राजावाडी रुग्णालयात नेले.सदर घटनेची माहिती मिळताच घाटकोपर वृत्तपत्र विक्रेता सेनेचे अध्यक्ष प्रकाश वाणी, उपाध्यक्ष सचिन भांगे यांनी त्याचे नातेवाईक अमेय साळुंखे यांच्या मदतीने रुग्णालयात सर्वोतोपरी मदत करत योग्य ते उपचार करून दिले. ऊन, वारा,पाऊस कशाचीही तमा न बाळगता वृत्तपत्रांची ने आण करणाऱ्या विक्रेत्यांच्या सुरक्षित्तेसाठी विमा योजनेसारखे काही उपाय सरकारने केले पाहिजे,असे मत प्रकाश वाणी यांनी व्यक्त केले

### चिमुकलीचा विनयभंग, एकाला अटक

**वसई:** अल्पवयीन मुलींवर जवळच्या लोकांकडून लैंगिक अत्याचार होण्याच्या घटनांचे सत्र सुरूच आहे. मिरा रोड येथे १२ वर्षांच्या चिमुकल्या मुलीवर इमारतीत काम करणाऱ्या कचरावेचकाने लिफ्टमध्ये विनयभंग केल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी काशिमिरा पोलिसांनी ५८ वर्षीय आरोपी कचरावेचकाला अटक केली आहे. पीडित मुलगी १२ वर्षांची असून ती मिरा रोड पूर्वेच्या काशिमिरा पोलीस ठाण्याच्या हद्दीत राहते.

**महत्त्वपूर्ण निवेदन**

वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीचा मजकूर स्वीकारण्यापूर्वी काळजी घेतली जात असली तरी त्याच्या आशयाची पडताळणी करणे शक्य होत नाही. तरी आपल्या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील जाहिरातदार कंपन्या, सहयोगी संस्था अथवा व्यक्तीबरोबर व्यवहार केल्यामुळे कोणत्याही स्वरूपाचे नुकसान व हानी झाल्यास त्यासाठी अथवा संबंधित जाहिरातीतील आशयासाठी मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि.ला जबाबदार ठरविता येणार नाही. त्यामुळे जाहिरातदारांना कोणतीही रक्कम प्रेषित करण्यापूर्वी अथवा त्यांच्याबरोबर कोणत्याही स्वरूपाचे संमतिपत्र कार्यसिद्ध करण्यापूर्वी अथवा एखाद्या जाहिरातीवर आधारित कोणतीही कृती करण्यापूर्वी वाचकांनी आवश्यकती चौकशी करण्याची खबरदारी घ्यावी.

## पुढच्या वर्षी लवकर या........

# वसईत 9550 गणेशमूर्त्यांचे तर 6500 गौराईचे विसर्जन

**प्रतिनिधी**
■ **वसई**

सहा दिवसांच्या गणरायांचे व माहेरवाशीण लाडक्या गौराईचे गुरूवारी (दि.12) भावपूर्ण वातावरणात विसर्जन करण्यात आले. विसर्जनावर सकाळपासूनच काही ठिकाणी पावसाचे विघ्न असल्याने भाविकांचा हिरमोड झाला. दरम्यान, गुरुवारी रात्रीपर्यंत 9550 लाडक्या बाप्पांना भावपूर्ण वातावरणात निरोप देण्यात आला. यात 250 सार्वजनिक तर 9300 खाजगी गणरायांचा समावेश आहे. तसेच 6500 लाडक्या गौराईंनादेखील भावपूर्ण



वातावरणात निरोप देण्यात आला. यात 90 सार्वजनिक तर 6410 खाजगी गौराईंचा समावेश आहे.

सकाळपासूनच पावसाने हजेरी लावल्याने विसर्जनावर पावसाचे विघ्न होते. मात्र दुपारी पावसाने कडक ऊन दिले होते. दुपारनंतर पुन्हा पावसाचे ढग जमा झाल्याने काही ठिकाणी पावसात गणरायांना व गौराईंना निरोप देण्यात आला. विसर्जनावर पावसाने विघ्न धरल्याने गणराय व गौराईंच्या मिरवणुकीत भाविकांच्या उत्साहावर विरजण पडले. सहा दिवसांच्या बाप्पांचे व दिड दिवसांच्या गौराईंचे वसईतील तलाव, खाडी, कृत्रिम तलावांत विसर्जन करण्यात आले. वसईकरांनी यावेळी कृत्रिम तलावांना अधिक पसंती दिल्याने पालिकेच्या आवाहनाला प्रतिसाद देत हजारो भाविकांनी सहकार्य केले. दुपारी 5 वाजल्यानंतर गणपती व गौराईंच्या विसर्जनासाठी मिरवणुका निघाल्या. मात्र या विसर्जन मिरवणुकांवर पावसाचे विघ्न होते. ग्रामीण भागात पावसाचे विघ्न असल्याने भाविकांचा उत्साह मावळलेला दिसला.

विसर्जनादरम्यान कोणतीही अनुचित घटना घडू नये यासाठी चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. विसर्जन रात्री उशिरापर्यंत सुरू होते. मात्र कोठेही अनुचित प्रकार घडला नाही. सहा दिवसांच्या बाप्पांना व लाडक्या गौराईंना भाविकांनी भावपूर्ण वातावरणात तसेच जयघोषात निरोप दिला .

# वसई विधानसभेसाठी राजकीय सस्पेन्स

**प्रतिनिधी**
■ **वसई**

राज्याच्या निवडणूक आयोगाने राज्यातील सर्व जिल्हाधिकाऱ्यांची आढावा बैठक बोलावली असून नवरात्रीनंतर विधानसभा निवडणुकीची अधिकृत घोषणा होण्याची शक्यता आहे. विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर वसईतील प्रमुख दोन विधानसभा मतदारसंघांत आत्तापासूनच राजकीय हालचालींना वेग आला आहे. दरम्यान, यातील अत्यंत प्रतिष्ठेचा व तितकाच यावेळेस चुरशीचा होऊ पाहणाऱ्या वसई विधानसभा मतदारसंघात सध्या तरी राजकीय सस्पेन्स पाहायला मिळत आहे.

या विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान आमदार हितेंद्र ठाकूर यांनी मागील वेळेस राजकारणातून संन्यास घेत असल्याची घोषणा केली होती. मात्र या मतदारसंघात बविआसाठी चांगले वातावरण नसल्याची पोचपावती लोकसभा मतदारसंघाने दिली आहे. त्यामुळे या मतदारसंघात बविआला संस्थापक आमदार हितेंद्र ठाकूर यांच्याशिवाय तरणोपाय नाही, असा कार्यकर्त्यांचा आग्रह आहे. त्यामुळे येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत स्वत: हितेंद्र ठाकूर हे मैदानात उतरणार का? ते आपला राजकीय संन्यास मागे घेणार का? असा सवाल उपस्थित होत आहे. वसई विधानसभा मतदारसंघात ठाकरे गटाच्या भारती कामडी यांनी बविआपेक्षा जास्त मते घेतली होती. त्याच धर्तीवर या मतदारसंघात आमदार हितेंद्र ठाकूर यांच्या व्यतिरिक्त अन्य कोणते नाणे चालणार नाही, असा एक राजकीय दृष्टीकोन दिसून येतो. वसई विधानसभा मतदारक्षेत्रात यावेळेस काँग्रेस रणांगणात उतरणार असल्याच्या चर्चा आहेत. या पक्षाकडून विजय पाटील, समीर वर्तक, ओनिल आल्मेडा यांच्या नावाची चर्चा आहे.

तर भाजप किंवा शिंदे गटाकडून या मतदारसंघात कोणाला तिकीट मिळते ते पाहणे रंजक ठरणार आहे. तर बहुजन विकास आघाडीकडून या मतदारसंघात स्वत: आमदार हितेंद्र ठाकूर हे राजकीय निवृत्तीची घोषणा मागे घेऊन पुन्हा मैदानात उतरतील का? असा सवाल उपस्थित होत आहे. वसई विधानसभा मतदारसंघात ख्रिश्चन, मुस्लीम समाज हा महाविकास आघाडीकडे वळलेला पाहायला मिळतो. त्यामुळे यंदाच्या विधानसभा मतदारसंघात हा मतदार काँग्रेस उमेदवाराला भरभरून मतदान करेल अशी चर्चा आहे. ती बहुजन विकास आघाडीसाठी मात्र धोक्याची घंटा ठरू शकते.

# साकीनाका आगीतील मृतांच्या नातेवाईकांना भरपाई देण्याची मागणी

### मदत देण्यास दिरंगाई करणाऱ्या अधिकाऱ्यांविरुद्ध तक्रार

**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

साकीनाका येथील मेट्रो जंक्शनवर असलेल्या पेनिन्सुला हॉटेलसमोरील राजश्री हार्डवेअर नावाच्या कारखान्यात 26 मार्च 2023 रोजी शॉर्ट सर्किटमुळे आग लागली होती. या आगीत एकूण 11 जण भाजून जखमी झाले तर दोन मजुरांचा मृत्यू झाला होता. मात्र अद्याप या मजुरांच्या कुटुंबीयांना कोणतीही भरपाई देण्यात आलेली नाही. स्थानिक सामाजिक कार्यकर्ते रुपेश रवी ढोणे यांनी मुख्यमंत्र्यांसह वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे तक्रार करून मृतांच्या कुटुंबीयांना नुकसान भरपाई देण्यात स्थानिक अधिकारी वारंवार हलगर्जीपणा दाखवत असल्याची टिपणी केली आहे. राजश्री हार्डवेअर कारखाना कोणाच्या मदतीने स्थापन झाला हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. या संदर्भात संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यासाठी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग मुंबई, दक्षता विभाग, विभागीय तपास अधिकारी आणि आर्थिक गुन्हे शाखा मुंबई यांना या तक्रारीसह तपशील ईमेलद्वारे देण्यात आला आहे. या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रुपेश रवी ढोणे यांना कारवाई पुढे करण्याचे उत्तर दिले आहे. मृतांच्या कुटुंबीयांना तातडीने नुकसान भरपाई देण्यात यावी आणि हा बेकायदेशीर कारखाना उभारणाऱ्या दोषी अधिकाऱ्यांवर एफआयआर नोंदवावा, अशी मागणी रुपेश रवी ढोणे यांनी केली आहे.

# वाडा पश्चिम भागात नाणे गाव “नॉट रिचेबल”

**प्रतिनिधी**
■ **वाडा**

दहा हजारांहून अधिक लोकसंख्या असणाऱ्या वाडा तालुक्यातील पश्चिमेकडील नाणे गावासह अन्य गावांत कोणत्याही मोबाईल कंपनीची रेंजच येत नसल्याने गावकरी हवालदिल झाले आहेत. याचा सर्वाधिक फटका ऑनलाइन शिक्षण घेणारे तसेच ऑनलाइन परीक्षा देणारे विद्यार्थी , वर्क फ्रॉम होम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना बसत असून आमचे गाव मोबाईल कंपन्यांच्या रेंजमध्ये कधी येणार, असा सवाल येथील ग्रामस्थांनी विचारला आहे. वाडा पश्चिमेकडील नाणे हे गाव कोहोज किल्ल्याच्या पायथ्याशी आणि वैतरणा नदीच्या तीरावर वसलेले आहे.

परिसरातील गावांची लोकसंख्या जवळपास अंदाजे दहा हजारांच्या वर आहे. या गावातील शेकडो चाकरमानी पोटापाण्यासाठी वाडा, पालघर, वसई तसेच बोईसर येथे कामानिमित्त जात असतात. गावात जीओ, एअरटेल, वोडाफोनसह अन्य कोणत्याही मोबाईल कंपनीची रेंज घरात मिळत नसल्याने त्यांची अवस्था बिकट झाली आहे.

या सर्वांना आपले लॅपटॉप उचलून त्यांना काम करण्यासाठी गावाबाहेर जावे लागते. रात्री-अपरात्री एखादी दुर्घटना घडल्यास अथवा कुणाला निरोप द्यायचा असल्यास कोणालाही संपर्क करता येत नाही.

# मोबाईल सोडा, मैदानावर या ; सार्वजनिक गणेशोत्सव सजावटीतून दिल्या कानपिचक्या

**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

मुंबई, दि. (प्रतिनिधी) : आजकाल मोबाईल गेमच्या विळख्यात तरुणांपासून ते लहान मुले अडकली आहेत त्यामुळे मैदानी खेळांकडे दुर्लक्ष होत आहे. तरुणांनी व लहान मुलांनी मैदानी खेळाकडे आकर्षित व्हावे व एक धाव आरोग्यासाठी असा मौलिक संदेश देणारी संकल्पना कुर्ला कामगार नगर सार्वजनिक गणेशोत्सवात साकारण्यात आली आहे . या सजावटीमध्ये क्रिकेट , फुटबॉल या खेळांचे देखावे करण्यात आले आहेत. जेणेकरुन तरुण व लहान मुले मोबाईल गेमच्या विळख्यातून बाहेर पडून मैदानी खेळाला प्राधान्य देतील, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे. सिनियर क्रिकेट क्लबचे विश्वस्त श्री. सुधीर गावडे, श्री गजानन वाविकर , श्री. राजू देसाई, श्री नयन तळवडेकर तसेच उत्सव समिती चे श्री. सिध्दार्थ कारंडे, पुरुषोत्तम पवळे, निखिल तारकर, प्रथमेश तारकर, रोशन देसाई, ओंकार पाचलग, अमोल परब, प्रथमेश तारकर, गौरव परब , उमेश सावंत या तरुणांनी अपार मेहनतीने हा देखावा साकार केला आहे. तसेच विविध क्रीडा स्पर्धा जिंकलेले चषकही या सजावटीत मांडण्यात आले आहेत. मोबाईल मुळे झपाटलेल्या पीढीच्या डोळ्यात झणझणीत अंजन या सजावटीने

# विक्रोळीतील शिक्षकाने कागदांपासून साकारली श्रीगणेश मूर्ती

**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

आराध्य दैवत असलेल्या श्री गणपती बाप्पाचे घरोघरी आगमन झाले आहे. बाप्पाचा हा उत्सव आनंदात आणि पर्यावरणासाठी पोषक व्हावा यासाठी सामाजिक संस्थांच्या माध्यमातून 2020 पासून विक्रोळीतील शिक्षक दिपक गभाले हे त्यांच्या घरी पर्यावरण पूरक श्री गणपती बाप्पाची मूर्ती बसवत आहेत.



*मूर्ती बनवण्यासाठी पाचशे रुपये खर्च*

*पर्यावरणप्रेमी शिक्षक दीपक गभाले यांना ही कागदी मूर्ती साकारण्यासाठी तीन आठवडे लागले. या मूर्तीची उंची अडीच ते तीन फुटापर्यंत आहे. ही मूर्ती पाचशे रुपयांत निर्माण झाली असून त्यासाठी 600 ते 700 ग्रॅम कागदाचा वापर केला गेला आहे. दरवर्षी ते अशाच प्रकारे कागदांपासून मूर्ती बनवतात. या मूर्तीचे विसर्जन दरवर्षी दिपक गभाले हे घरीच टबच्या पाण्यात करतात असे त्यांनी सांगितले. विसर्जन केलेले पाणी दुसऱ्या दिवशी झाडांच्या मातीत घातले जाते.*

वर्तमान पेपरच्या कागदापासून दिपक हे श्री गणेश मूर्ती साकारत आहेत.विक्रोळीतील दीपक गभाले हे विकेश इंग्लिश हायस्कूल शाळेत शिक्षक म्हणून कार्यरत आहेत. सार्वजनिक मंडळांनी आणि घरोघरी श्री उत्सव साजरा करणाऱ्या गणेश भक्तांनी पर्यावरण पूरक उत्सव साजरा करावे असे आवाहन ते गेल्या चार वर्षांपासून करत आहेत.

आधी कृती मग समाजाला आवाहन या वृत्तीने दिपक गभाले यांनी अत्यंत कमी खर्चात गणेश उत्सव साजरा करता येतो हे त्यांनी आपल्या बनवलेल्या कलाकृतीतून दाखवून दिले आहे.

दिपक गभाले या शिक्षकाने पर्यावरणपूरक गणेश मूर्ती घडवली आहे. गेल्या चार वर्षांपासून दीपक कागदाचा वापर करून निर्मित केलेल्या घरगुती गणेशमूर्तींची स्थापना करत आहेत.

# गणेशोत्सवात भाजपाच्या खासदारांचा जनसंवाद

### घरोघरी गणरायांच्या दर्शनासाठी खा. डॉ. सावरांची हजेरी

**प्रतिनिधी**
■ **वसई**

पालघर लोकसभा मतदारसंघात मातब्बर पक्षांना धोबीपछाड देत मोठ्या मताधिक्याने निवडून आलेल्या खासदार डॉ. हेमंत सावरा यांनी आपला जास्तीत जास्त भर हा जनसंवादावर ठेवला आहे. निवडून आल्यानंतर ते सातत्याने प्रत्येक तालुक्यात, प्रत्येक विधानसभा क्षेत्रात नागरिकांच्या गाठीभेटी घेत असल्याने जनमानसात त्यांची प्रतिमा चांगलीच रूजली आहे. यंदाच्या गणेशोत्सवात ते घरोघरी, गावोगावी हजेरी लावत असल्याने नागरिकांत समाधानाचे वातावरण पाहायला मिळत आहे.

पालघर लोकसभा निवडणुकीच्या उमेदवारी अर्ज भरण्याच्या आदल्या दिवशी डॉ. हेमंत सावरा यांच्या गळयात उमेदवारीची माळ पडली. त्यानंतर प्रचारासाठी हातात अवघे 8 ते 10 दिवस असताना सावरा यांनी झंझावाती प्रचार करून विजय खेचून आणला. निवडून आल्यानंतर पायाला भिंगरी लावून ते मतदारसंघात फेरफटका मारत आहेत. येथील विकासकामांचा केंद्र शासनाच्या दरबारी पाठपुरावा करत आहेत. तर अनेक नागरी समस्यांचे निवारण करण्यासाठी ते पुढाकार घेत आहेत. त्यांच्या कामाचा धडाका आणि जनतेशी जोडलेली त्यांची नाळ लक्षात घेता त्यांची प्रतिमा जनमानसात चांगलीच रूजली आहे.

दरम्यान, खासदार डॉ. हेमंत सावरा यांचे पालघर जिल्ह्यातील सध्याचे झंझावाती जनसंवाद दौरे लक्षात घेता आगामी विधानसभा निवडणुकीत भाजपसाठी ती जमेची बाजू ठरू शकते, असा अंदाज राजकीय निरीक्षक बांधत आहेत.

## कचरा विल्हेवाट प्रक्रियेला वेग

# पालिकेकडून सव्वा दोन लाख मॅट्रिक टन कचऱ्याची विल्हेवाट

**प्रतिनिधी**
■ **वसई**

पालिकेच्या कचरा भूमीवरील कचऱ्याचे साचलेले डोंगर कमी करण्यासाठी प्रयत्न सुरू केले आहेत. बायोमायनिंग प्रकल्पाच्या द्वारे आतापर्यंत सव्वा दोन लाख मॅट्रिक टन कचऱ्यावर प्रक्रिया करण्यात आली आहे.अजूनही संपूर्ण कचरा नष्ट करण्यासाठी दोन वर्षे इतका कालावधी लागणार आहे.

वसई विरार शहरात वाढत्या नागरिकरणामुळे दैनंदिन निघणारा कचऱ्याचे प्रमाण वाढले आहे.दररोज शहरातून आठशेहून अधिक मॅट्रिक टन इतका कचरा संकलित करून गोखीवरे येथील कचरा भूमीवर नेऊन टाकला जात आहे. यापूर्वी कचऱ्यावर प्रक्रिया करण्यासाठी पालिकेचा कोणताही प्रकल्प नसल्याने विल्हेवाटीसाठी अडचणी निर्माण झाल्या होत्या.त्यामुळे एका वर एक असे कचऱ्याचे ढिगारे साचून त्याचे डोंगर तयार झाले होते.या वाढत्या कचऱ्यामुळे कचरा टाकण्यास ही पालिकेला जागा अपुरी पडत होती. या कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी महापालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाने कचरा भूमीवर बायोमायनिंग प्रकल्प सुरू केला आहे. मे साई युटिलिटी या संस्थेला वीस वर्षांसाठीचे काम देण्यात आले आहे. सुमारे १५ लाख मॅट्रिक टन कचऱ्यावर प्रक्रिया करण्याचे काम १५ जानेवारी पासून सुरू करण्यात आले आहे. ट्रॉमल यंत्रणेद्वारे कचऱ्याचे वर्गीकरण करण्यात येते. त्यानंतर त्यावर प्रक्रिया करून विल्हेवाट लावली जात आहे.

या विल्हेवाट प्रक्रियेला वेग आला आहे. विल्हेवाटीसाठी ३ ट्रॉमल यंत्र असून त्याद्वारे काम सुरू आहे. आतापर्यंत पालिकेच्या कचरा भूमीवरील सव्वा दोन लाख मॅट्रिक टन इतक्या कचऱ्यावर प्रक्रिया करून त्याची विल्हेवाट लावण्यात आली असल्याचे पालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाने सांगितले आहे.उर्वरित कचऱ्यावर टप्प्या टप्प्याने विल्हेवाट लावली जात आहे संपूर्ण कचरा मोकळा करण्यासाठी साधारणपणे दोन वर्षे इतका कालावधी लागेल असे पालिकेचे उपायुक्त नानासाहेब कामठे यांनी सांगितले आहे.

# नळाला फेसाळ पाणी; ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण

■ **डहाणू**

डहाणू तालुक्यातील रामपूर ग्रामपंचायत हद्दीत पुरवठा होत असलेल्या नळांना सध्या फेसाळ पाणी येत असल्याने ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. पाण्याच्या गुणवत्तेविषयी ग्रामस्थांमध्ये चिंता व्यक्त होत असून, जलप्रदूषणाची शक्यता व्यक्त केली जात आहे.

प्लाटपाडा परिसरातील ग्रामस्थांनी नळांना फेसाळ पाणी येत असल्याचे निदर्शनास आणून दिले आहे. या पाण्यामुळे आरोग्याच्या बाबतीत भीती निर्माण झाली आहे. पाण्याला फेस आल्यामुळे जलप्रदूषणाच्या शक्यतेची चर्चा होत आहे. त्यामुळे पाण्याचा स्त्रोत तपासण्याची आणि जलवाहिनीची तातडीने पाहणी करण्याची मागणी ग्रामस्थांकडून जोर धरली आहे. ग्रामस्थांनी ग्रामपंचायतीकडे तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली असून, संबंधित अधिकाऱ्यांनी जलप्रदूषणाची कारणे शोधून त्वरित उपाययोजना करावी, असे आवाहन केले आहे. ग्रामसेवक निलेश जाधव यांनी या समस्येवर त्वरीत तपास सुरू केल्याची माहिती दिली आहे.

# आरक्षण संपवण्याची भाषा करणाऱ्या राहुल गांधींना दलित मागासवर्गीय धडा शिकवतील - रामदास आठवले

### राहुल गांधींच्या निषेधार्थ रिपब्लिकन पक्ष राज्यभर आंदोलन करणार

**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

अमेरिकेत जाऊन काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी भारतातील आरक्षण संपवण्याबाबत केलेल्या वक्तव्याचा आम्ही तीव्र निषेध करतो. महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी दलित आदिवासी ओबीसी मागासवर्गीयांना संविधानाद्वारे दिलेले आरक्षण कोणीही संपवू शकत नाही. जो पर्यंत सूर्य चंद्र आहे तो पर्यंत भारताचे संविधान राहील आणि संविधानाने दिलेले आरक्षण राहील. आरक्षण संपविण्याचे बेताल वक्तव्य करणाऱ्या राहुल गांधींचा आम्ही तीव्र निषेध करतो. खबरदार आरक्षण संपविण्याची भाषा कराल तर असा इशारा रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्य मंत्री ना रामदास आठवले यांनी दिला आहे.

रिपब्लिकन पक्षाच्या वतीने राहुल गांधी यांच्या विरुद्ध राज्यभर निषेध आंदोलन करण्यात येईल. अशी घोषणा रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना. रामदास आठवले यांनी आज केली.

उद्या शुक्रवार दिनांक 13 सप्टेंबर रोजी दुपारी 2 वाजता मुंबई प्रदेश रिपब्लिकन पक्षाच्या वतीने आझाद मैदान मुंबई येथे काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्या निषेधार्थ आंदोलन करण्यात येणार असल्याची माहिती रिपाइं चे मुंबई अध्यक्ष सिद्धार्थ कासारे यांनी दिली आहे

सामाजिक दृष्ट्या भारतात सामंजस्य निर्माण झाल्यानंतर सामाजिक आरक्षण संपवण्याचा निर्णय काँग्रेस घेईल असे काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी केलेले वक्तव्य निषेधार्ह आहे. या वक्तव्यातून राहुल गांधींनी काँग्रेस ही आरक्षण विरोधी असल्याचेच उघड केले आहे.काँग्रेस सर्वाधिक काळ देशात सत्तेत राहिली आहे.त्यांच्या काळात दलितांवर अधिक अत्याचार झाले आहेत .आज ही दलितांवर अत्याचार होतात.त्यामुळे दलित आदिवासी मागासवर्गीयांना संविधानाने दिलेले आरक्षण हे त्यांचे कवच कुंडल आहे. आरक्षण संपविण्याची भाषा करण्याची राहुल गांधीना गरज काय होती असा सवाल ना.रामदास आठवले यांनी केला आहे .आरक्षण संपविण्याचा भाषा करणाऱ्या राहुल गांधींना दलित आदिवसी मागासवर्गीय धडा शिकवतील असा इशारा ना.रामदास आठवले यांनी दिला आहे.परदेशात जाऊन आपल्या देशाची बदनामी करणे हे काँग्रेस नेते राहुल गांधींचे उद्योग आहेत. भारतात लोकतंत्र नाही असे परदेशात जाऊन बरळणे चूक आहे.लोकतंत्र आणि आरक्षणबाबत परदेशात जाऊन चुकीची वक्तव्य करून देशाची बदनामी करणाऱ्या राहुल गांधीचा आम्ही तीव्र निषेध करतो असे ना.रामदास आठवले म्हणाले.

### जाहीर नोटीस

माझे अशिल श्री. हारुन सुलेमान सय्यद, रा. बोळींज, विरार प., ता. वसई, जि. पालघर यांच्याद्वारे जाहीर नोटीस देण्यात येते की, माझे अशिलांना श्री. ईरशाद हारुन सय्यद, श्री. तोफिक हारुन सय्यद, श्री. वसीम अक्रम हारुन सय्यद व श्री. रहीस सय्यद अशी चार मुले असून ते त्यांच्या आज्ञेत राहत नाही व मनाला येईल तसे वागतात, त्यामुळे माझे अशिलांच्या नावांने वसई विरार तालुका, महाराष्ट्र राज्य व राजस्थान राज्यामध्ये त्यांची जी काही स्थायी व अस्थायी मालमत्ता आहे, त्यामधून माझे अशिल तुम्हांस बेदखल करत आहेत, त्यांच्या संपत्तीवर तुम्हां चौघांचा काहीही हक्क, हिस्सा, दावा व अधिकार राहणार नाही तसेच भविष्यात त्यांनी काहीही चुकीचे काम केले तर त्याची जिम्मेदारी माझे अशिल श्री. हारुन सुलेमान सय्यद यांच्यावर असणार नाही, याची नोंद घ्यावी. कळावे.

आपला विश्वासू
आर. टी. पाठक
वकील

Printed and Published by **Bhushan B.Mhatre** for Owner **Marik Media And Communication Pvt .Ltd.** at S.R.Publicatiinns ,Mohan Arjun Compound ,Godown No. 8,9 And 10 , Near Ghartan Pada ,Vaishali Nagar ,Last Bus Stop ,Dahisar (E ) ,Mumbai -400068 and Published From Marik Media And Communication Pvt .Ltd.,102, Shyam Sunder Sadan ,Sitaram Jadhav Marg, Lower Parel ,Mumbai 400013. Editor - **Deepak B. Mhatre**, E-mail vruttmanas1@ gmail.com ,telephone 2498546,24985609. Resident Editor - **Sham Deulkar**

**As per PRB Act Editorial Responsibilities On Deepak B. Mhatre Nespaper Related Desputes Lies Under Jurisdiction of Mumbai Courts**

**Year - Twenty Nine**
**Issu - 84**
**R.N.I. Registration No. - 65609/96**

मुद्रक आणि प्रकाशक **भूषण भा. म्हात्रे** यांनी मालक **मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि.** साठी, एस. आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंपाऊंड, गोडाऊन नं. ८,९ आणि १०, घारटन पाडाजवळ, वैशालीनगर लास्ट बस स्टॉप, दहिसर (पूर्व), मुंबई - ४०० ०६८ येथे छापून मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि., १०२, श्याम सुंदर सदन, सीताराम जाधव मार्ग, लोअर परळ (पश्चिम), मुंबई - ४०० ०१३ येथून प्रकाशित केले. संपादक - **दीपक भा. म्हात्रे,** E-mail: vrittamanas1@gmail.com दूरध्वनी क्रमांक - २४९८५४६, २४९८५६०९ निवासी संपादक - **शाम देऊलकर**

**पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी दीपक भा. म्हात्रे यांच्यावर राहील. सदर वृत्तपत्रासंबंधीच्या विवादित बाबी मुंबई न्यायालय क्षेत्रात येतील.**

**वर्ष- एकोणतीसावे**
**अंक - ८४**
**आर.एन.आय. रजिस्ट्रेशन क्र.- ६५६०९/९६**

## सिद्धीविनायक मंदिराकडे जाणाऱ्या रस्त्याला भगदाड, कार गेली खड्ड्यात

मुंबई : प्रभादेवी जंक्शन परिसरात रस्ता खचला खचल्याची घटना आज समोर आलीय. खचलेल्या रस्त्याची १५ ते २० फूट खोली असल्याचं सांगितलं जातंय. खचलेल्या रस्त्यात एक चारचाकी अडकली होती. ही चारचाकी अर्ध्या तासानंतर स्थानिकांनी बाहेर काढली. रस्ता खचला असल्यामुळे कार थेट खड्ड्यात गेली होती. सुदैवाने मोठा अपघात टळला असल्याचं समोर आलंय. सिद्धीविनायक मंदिराकडे जाणाऱ्या रस्त्याला भगदाड पडलंय. मुंबईतील प्रभादेवी परिसरात सिग्नलवरच असलेला व्हीआयपी रस्ता खचलाआहे. आज सकाळी या रस्त्यावर गाडी अडकली होती. आता मुंबई महानगरपालिकेचे कर्मचारी घटनास्थळी दाखल होऊन रस्ता खचण्याचं कारण शोधताना दिसून येत आहेत. भरधाव वेगातील कार अचानकपणे रस्त्यात खाली गेल्याने मोठा गोंधळ उडाला होता. व्हिडिओमध्ये दिसतंय की, रस्त्यात गाडी अडकलेली आहे. रस्त्यावर भला मोठा खड्डा पडलेला दिसत आहे. रस्ता खचल्याचीही काही पहिली वेळ नाही. याआधी देखील अशा घटना घडलेल्या आहेत.



# किनारी रस्ता मुंबईच्या पायाभूत सुविधेतील पुढचे पाऊल - मुख्यमंत्री शिंदे

**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

धर्मवीर स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज मुंबई किनारी रस्ता प्रकल्प (दक्षिण) हा मुंबईसाठी गेमचेंजर असा प्रकल्प असून यामुळे मुंबईकरांचा प्रवास सुखकारक, जलद, दिलासादायक आणि वेळेची बचत करणारा असून मुंबईच्या पायाभूत सुविधा विकासातील पुढचे पाऊल असल्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज या प्रकल्पाच्या लोकार्पणासमयी सांगितले. या प्रकल्पामुळे मरिन लाईन ते वांद्रे सी लिंक हा प्रवास केवळ 10 मिनिटात पूर्ण होणार असून यामुळे वेळ, इंधन वाचेल आणि प्रदुषण कमी होऊन मुंबईकरांची कार्यक्षमता वाढेल, असा विश्वास मुख्यमंत्री श्री.शिंदे यांनी व्यक्त केला.

धर्मवीर स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज मुंबई किनारी रस्ता प्रकल्प (दक्षिण) या प्रकल्पाचे लोकार्पण मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते आज करण्यात आले. या लोकार्पणप्रसंगी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, शालेय शिक्षण मंत्री तथा मुंबई शहर पालकमंत्री दीपक केसरकर, कौशल्य विकास उद्योजकता उद्योजकता व नाविन्यता मंत्री तथा मुंबई उपनगर पालकमंत्री मंगलप्रभात लोढा, गृह विभागाचे अपर मुख्य सचिव इक्बाल सिंह चहल, मुंबई महानगर पालिका आयुक्त भूषण गगराणी आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री म्हणाले की, मुंबईतील गेमचेंजर प्रकल्पाचे टप्पे पुढे जात असून यानंतर वर्सोवा, भायंदर, विरारपर्यंत हा प्रकल्प सुद्धा पुढे नेत आहोत. भविष्यात मुंबई ते वर्सोवा मधील 3-4 तासाचे अंतर हे केवळ 40 ते 50 मिनिटात पार करण्यात येईल. हा प्रकल्पाचा पूल पाहतांना विदेशात असल्याचे जाणिव होत



असल्याची घडणावळ असून यात अत्याधुनिक तंत्रज्ञान वापरण्यात आले आहे. हा प्रकल्प बांधताना कोळी बांधवांची देखील काळजी घेण्यात आली आहे आणि त्यांना देखील न्याय दिला आहे. हे प्रकल्प पुढे पालघर पर्यंत जाणार असून वाढवण बंदराला देखील या कोस्टल रोडचा फायदा होणार आहे. मुंबई खड्डेमुक्त करण्याबरोबरच सर्व रस्ते कॉंक्रिटचे करण्यात येणार आहे. मुंबई वाहतूक कोंडीमुक्त तसेच प्रदुषण कमी करण्यासाठीही सर्व उपाययोजना केल्या असल्याचेही मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी यावेळी सांगितले.

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी सत्तेवर आल्यानंतर या प्रकल्पासाठी सर्व परवानग्या मिळाल्या आहेत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या कार्यकालात या प्रकल्पाचे काम अतिशय वेगाने झाले आहे. या प्रकल्पाचे 90 टक्के काम पूर्ण झाले असून उर्वरित कामेही लवकरच पूर्ण करण्यात येत असल्याचेही श्री. फडणवीस यांनी सांगितले.

**प्रकल्पाचे ठळक मुद्दे :** हा प्रकल्प मरीन ड्राइव्ह ते वांद्रे-वरळी सागरी सेतूपर्यंत बांधण्यात येत आहे. तात्पुरत्या स्वरुपात वांद्रे-वरळी सागरी सेतूला जोडणाऱ्या दक्षिण वाहिनीवरील 827 मीटर लांबीच्या पुलावरुन उत्तर वाहिनीवर सुरू होत असलेली वाहतूक सोमवार ते शुक्रवार सकाळी 7 ते रात्री 11 वाजेपर्यंत सुरू राहील.

**महत्त्वाचे टप्पे** - 11 मार्च 2024 रोजी वरळी ते मरीन ड्राईव्ह 9.29 किमी. दक्षिणवाहिनी मार्गिका. 10 जून रोजी मरीन ड्राईव्ह ते लोटस जंक्शन 6.25 किमी उत्तरवाहिनी मार्गिका. 11 जुलै रोजी हाजी अली ते खान अब्दुल गफार खान मार्गाला जोडणारी मार्गिका (तात्पुरत्या स्वरुपात, 3.5 किलोमीटर) सुरू.

**पुढील नियोजन :**

सद्यस्थितीत प्रकल्पाचे 92 टक्के काम पूर्ण. प्रकल्पातील वांद्रे-वरळी सागरी सेतूला जोडणारा उत्तर वाहिनीवरील मुख्य पूल व वरळी आंतरबदल डिसेंबर 2024 पर्यंत तर हाजीअली आंतरबदल येथील उर्वरित कामे (मार्गिका क्रमांक 1, 6 व 7) मार्च 2024 पर्यंत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट आहे.

**प्रकल्पाची वैशिष्ट्ये :**

* बोगदा खनन संयंत्राच्या (TBM) सहाय्याने भारतातील सर्वात मोठा व्यास (१२.१९ मीटर) असलेल्या बोगद्याची निर्मिती.
* भारतात प्रथमच रस्ते वाहतूक बोगद्यामध्ये सकार्डो वायूविजन प्रणालीचा वापर.
* भारतामध्ये प्रथमच एकलस्तंभ (मोनोपाईल) उभारून पुलाची बांधणी.
* एकाच प्रकल्पामध्ये पुनःप्रापण करुन रस्ता, पूल, उन्नत मार्ग, उतरण मार्ग, आच्छादित बोगदा, समुद्रक्षेत्र तसेच टेकडीखालून बोगदा, हरितक्षेत्राची निर्मिती.

# विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासासाठी 'महावाचन उत्सव'



**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

व्यक्तिमत्व विकासाचे तसेच सृजनशीलता वाढीस लागण्याचे एक महत्त्वपूर्ण साधन म्हणजे वाचन! वाचनामुळे आनंद मिळतो. विद्यार्थ्यांना आनंददायी शिक्षण देण्यासाठी त्यांना पुस्तकांकडे आकर्षित करावे आणि लहान वयातच वाचनाची गोडी निर्माण करण्याच्या उद्देशाने शालेय शिक्षण विभागामार्फत महावाचन उत्सव 2024 चे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमात 11 सप्टेंबर, 2024 पर्यंत 96,639 (88.95 टक्के) शाळांमधून 12,30,557 विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला असल्याची माहिती, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेच्या राज्य प्रकल्प संचालक आर.विमला यांनी दिली आहे. मोबाईल, टीव्ही, संगणक आदी स्क्रीनच्या वेडामुळे हल्ली मुले वाचनाच्या आनंदापासून दूर जाताना दिसत आहेत. अशावेळी त्यांना पुन्हा पुस्तकांच्या सहवासात आणण्यासाठी शालेय शिक्षण विभागाने महावाचन उत्सव या उपक्रमाची सुरुवात केली आहे. हा उपक्रम 20 सप्टेंबर, 2024 पर्यंत सुरू राहणार आहे.

**महावाचन उत्सवाचे ब्रँड ॲम्बेसेडर अमिताभ बच्चन**

मागील वर्षी राज्यातील सर्व शाळांमध्ये 'महाराष्ट्रातील वाचन चळवळ' हा उपक्रम राबविण्यात आला होता. या उपक्रमामध्ये 66 हजार शाळा व 52 लाख विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. याची पडताळणी 'टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्स' मार्फत करण्यात आली होती. या उपक्रमास विद्यार्थ्यांचा मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळाला होता. हा प्रतिसाद लक्षात घेऊन सन 2024-25 या वर्षी देखील रिड इंडिया यांच्या सहकार्याने राज्यातील सर्व माध्यमांच्या व व्यवस्थापनाच्या शाळांमध्ये 'महावाचन उत्सव' राबविण्यात येत आहे. या उपक्रमाकरीता ज्येष्ठ अभिनेते अमिताभ बच्चन यांची ब्रँड ॲम्बेसेडर म्हणून निवड करण्यात असून त्यांनी देखील सर्वांना दररोज किमान 10 मिनीटे नवीन काही वाचनाचे आवाहन केले आहे. राज्यातील सर्व माध्यमांच्या व सर्व व्यवस्थापनाच्या शाळांमधील इयत्ता तिसरी ते बारावी इयत्तेतील सर्व विद्यार्थ्यांसाठी इयत्ता तिसरी ते पाचवी, सहावी ते आठवी व नववी ते बारावी असे तीन गट निश्चित करण्यात आले आहे.

**उपक्रमाची उद्दिष्टे**

वाचन संस्कृतीला प्रोत्साहन देणे. विद्यार्थ्यांमध्ये अवांतर वाचनाची गोडी निर्माण करणे. मराठी भाषा, साहित्य, संस्कृतीशी विद्यार्थ्यांची नाळ जोडणे. दर्जेदार साहित्याचा व लेखक, कवींचा विद्यार्थ्यांना परिचय करुन देणे. विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासास चालना देणे. विद्यार्थ्यांच्या सृजनशीलतेला व भाषा संवाद कौशल्य विकासास चालना देणे ही या उपक्रमाची उद्दिष्टे आहेत.

# नऊ वर्षांनी एसटी अखेर नफ्यात...

**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

गेली पाच ते सहा वर्ष आर्थिक संकटाचा सामना करणाऱ्या एसटी महामंडळाला आर्थिकदृष्ट्या चांगले दिवस येवू लागले आहेत. एसटी महामंडळाच्या ३१ पैकी २० विभागांनी ऑगस्ट महिन्यात नफा कमवला आहे. एसटी महामंडळाला ऑगस्टमध्ये १६ कोटी ८६ लाख ६१ हजार रुपये नफा झाला आहे. तब्बल ९ वर्षांनी, ऑगस्ट-२०२४ मध्ये एसटी महामंडळ नफ्यात आल्याने महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर यांनी सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले असून, भविष्यात प्रयत्नांची पराकाष्टा करून



महामंडळाला सातत्याने फायदा होईल यादृष्टीने प्रयत्न करावे, असे आवाहन त्यांनी केले.

दोन वर्ष करोना काळ आणि त्या पाठोपाठ सहा महिने कर्मचाऱ्यांचा चाललेला दीर्घकालीन संप यामुळे एसटी महामंडळ आर्थिक दृष्ट्या डबघाईला आले होते. एसटी बंद पडते की काय ? अशी अवस्था निर्माण झाली होती. एसटीची वाहतूक सेवा मे २०२२ पासून सुरळीत सुरू झाली.

# धारावी पुनर्विकास प्रकल्पाचे भूमिपूजन चोरी-चोरी चुपके-चूपके कार्यक्रम...!

**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

धारावी पुनर्विकास प्रकल्पाचे भूमिपूजन प्रथमतः गणेश चतुर्थीच्या दिवशी ७ सप्टेंबर २०२४ रोजी करण्याचा घाट घालण्यात आला होता. धारावी बचाव आंदोलनाने आंदोलनाचा इशारा देताच हा कार्यक्रम रद्द करून तो १२ सप्टेंबर २०२४ रोजी करण्याचे ठरले. या भूमिपूजनाच्या आदल्या दिवशी ११ सप्टेंबर २०२४ रोजी लाक्षणिक उपोषणाचा कार्यक्रम तसेच १२ सप्टेंबर रोजी ठरलेला भूमिपूजनाचा कार्यक्रम उधळवून लावण्याचा इशारा धारावी बचाव आंदोलनाने दिला होता. ठरल्याप्रमाणे ११ सप्टेंबर रोजी लाक्षणिक उपोषणाचा कार्यक्रम पार पडला. या उपोषणाच्या वेळी DRPPL प्रशासनाने पोलिस उपायुक्त परिमंडळ ५ यांना निरोप पाठविला की दिनांक १२ सप्टेंबर रोजीचा भूमिपूजनाचा कार्यक्रम DRPPL ने रद्द केलेला आहे सबब धारावी बचाव आंदोलनाने उपोषणाचा कार्यक्रम आटोपता घेऊन १२ तारखेचे आंदोलन रद्द करावे. DRPPL ने दिलेली माहिती आणि पोलिसांची विनंती यांना मान देऊन धारावी बचाव आंदोलनाने उपोषणाचा तसेच १२ तारखेच्या आंदोलनाचा कार्यक्रम स्थगित केला होता.

DRPPL ने आज उरकलेला भूमिपूजनाचा कार्यक्रम म्हणजे चोरी-चोरी चुपके-चूपके कार्यक्रम आहे. सदरच्या भूमिपूजन कार्यक्रमाला नगरसेवक, आमदार, खासदार असे लोकप्रतिनिधी, धारावीतील प्रतिष्ठित नागरिक, धार्मिक, शैक्षणिक व सांस्कृतिक संस्थांचे पदाधिकारी असे कोणीच उपस्थित नव्हते. सदरचे भूमिपूजन कोणाच्या हस्ते झाले? व या कार्यक्रमाला कोण कोण उपस्थित होते? अशी कोणतीही माहिती DRPPL ने जाहीर केलेल्या वृत्तपत्र निवेदनात नाही. एकंदरीत अदानीचा साराच कारभार हा चोरीचा मामला असण्याचाच प्रकार आहे.

इतक्या लबाडीने भूमिपूजन उरकणारा विकासक धारावीकरांशी प्रामाणिक राहून त्यांना धारावीतच घर देईल यावर विश्वास कसा ठेवायचा? चोराच्या मनात चांदणं, तसं अदानीच्या मनात BKC असल्यामुळे धारावीकरांना धारावीबाहेर मिठागराच्या आणि कचरापट्टीच्या जमिनींवर हुसकावून लावले जाईल ही भीती खरी ठरेल अशी संभावना आहे.

# परतीच्या प्रवासासाठी 14 विशेष रेल्वेगाड्या

■ **मुंबई**

गणेत्सवकाळात गणेश भक्तांसाठी मध्य आणि कोकण रेल्वे खेड – सीएसएमटी, खेड – पनवेल दरम्यान १४ अनारक्षित गणपती विशेष रेल्वेगाड्या चालवण्यात येणार आहेत. या रेल्वेगाड्यांमुळे कोकणातून परतीचा प्रवास करणाऱ्या प्रवाशांना मोठा दिलासा मिळणार आहे. गाडी क्रमांक ०१०६९ अनारक्षित विशेष सीएसएमटी येथून १२ सप्टेंबर रोजी रात्री ११.३० वाजता सुटेल आणि खेड येथे दुसऱ्या दिवशी पहाटे ५.१५ वाजता पोहोचेल. गाडी क्रमांक ०१०७० अनारक्षित विशेष खेड येथून १६ सप्टेंबर रोजी सकाळी ६ वाजता सुटेल आणि सीएसएमटी येथे त्याच दिवशी दुपारी १.३० वाजता पोहोचेल. या रेल्वेगाडीला दादर, ठाणे, पनवेल, पेण, रोहा, कोलाड, इंदापूर, माणगाव, गोरेगाव रोड, वीर, सापे वामणे, करंजाडी, विन्हेरे, दिवाणखावटी आणि कळंबणी बुद्रुक येथे थांबा देण्यात येणार आहे.गाडी क्रमांक ०१०७१ अनारक्षित विशेष पनवेल येथून १३, १४, १५ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता सुटेल आणि खेड येथे त्याच दिवशी दुपारी २.४५ वाजता पोहोचेल. गाडी क्रमांक ०१०७२ अनारक्षित विशेष १३, १४, १५ सप्टेंबर रोजी दुपारी ३.१५ वाजता सुटेल आणि पनवेल येथे त्याच दिवशी रात्री ८.३० वाजता पोहोचेल. या रेल्वेगाडीला पेण, रोहा, कोलाड, इंदापूर, माणगाव, गोरेगाव रोड, दिवाणखावटी आणि कळंबणी बुद्रुक येथे थांबा देण्यात येणार आहे.

# पालिका कामगार, कर्मचारी आणि अधिकाऱ्यांचे वेतन वेळेवर द्या

## आदित्य ठाकरेंचे पालिका आयुक्तांना पत्र

**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

मुंबई महापालिका कामगार, कर्मचारी आणि अधिकारी तसेच निवृत्ती वेतन धारक यांचे पगार/वेतन दर महिन्याचा एक तारखेला मिळणेकरीता कार्यवाही करावी आणि वेतन धारकांना दिलासा द्यावा. अशी मागणी करणारे पत्र आमदार, माजी.मत्री आदित्य ठाकरे यांनी मुंबई महानगरपालिका आयुक्त भूषण गगराणी यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे.

मुंबई महापालिका आस्थापनेत जवळपास नव्वद हजार कामगार, कर्मचारी आणि अधिकारी कार्यरत असुन, जवळपास एक लाख तेरा हजार सेवानिवृत्त निवृत्तीवेतन धारक आहेत. या सर्वांना सहा महिन्यांपूर्वी नियमीतपणे प्रत्येक महिन्याच्या १ तारखेला वेतन/पगार त्यांच्या बँक खात्यात थेट जमा होत असे. परंतु आता १ ऐवजी २ किंवा ३ तारखेला जमा होत असल्यामुळे अनेक कर्मचाऱ्यांचे गृहकर्ज, शैक्षणिक कर्ज अथवा इतर कर्जाचे हफ्ते १ तारखेला वळते होत नसल्यामुळे दंडात्मक कारवाई होत आहे.

मागील अडीच वर्षाहून अधिक कालावधी महाराष्ट्रातील अनेक महापालिका लोकप्रतिनिधी नसल्यामुळे प्रशासना मार्फत चालवले जात आहे. कोविड १९ कालावधीत सर्व यंत्रणा ठप्प असताना फक्त महापालिका कर्मचारी आपले जीव धोक्यात घालून जनतेची सेवा करीत होते. त्यांचा कोविड योध्दा म्हणुन गौरव देखील कण्यात आला होता. शिवाय तत्कालीन महाराष्ट्राचे कुटुंबप्रमुख, मुख्यमंत्री उध्दव ठाकरे यांनी प्रतिदिन प्रत्येकी ₹३००/- प्रोत्साहन भत्ता देखील दिला होता. परंतु सध्या अस्तित्वात असलेले सरकार पालिकेचा निधी अनावश्यक ठिकाणी खर्च करून कर्मचारी आणि इतर अत्यावश्यक कामासाठी राखून ठेवलेला निधी (FD) मोडण्याचा विक्रम करीत आहे. असा आरोपही आदित्य ठाकरे यांनी केला आहे.


**महावितरण** — महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

**महत्वाचे जाहीर निवेदन**

''आवाहन'' (कल्याण ग्रामीण विभाग कार्यालयांतर्गत) म.रा.वि.वि. कंपनी मध्ये आपण निविदेसाठी अनामत रक्कम व कार्यालयीन आदेशानुसार भरलेली सुरक्षा ठेव रक्कम काम पूर्ण झाल्यावर परत घेतलेली नाही. अशा ठेकेदारांना आवाहन करण्यात येते की, ''सदर रक्कमेचा मुळ पावत्यासह कल्याण ग्रामीण, ४ था मजला, ''तेजश्री'' इमारत जहांगिर मैदान जवळ, कर्णिक रोड, कल्याण (प) ४२१३०१ या कार्यालयात जाहिरात प्रसिदध् झाल्यापासुन ४५ दिवसांच्या आत संपर्क साधावा अन्यथा आपली सुरक्षा ठेव रक्कम अथवा अमानत रक्कम दप्तरी खाती जमा करण्यात येईल.

**कार्यकारी अभियंता, कल्याण ग्रामिण विभाग.**



## पनवेल महानगरपालिका

ता. पनवेल, जि. रायगड, पिन नं. ४१० २०६

दुरध्वनी कार्यालय ०२२ - २७४५८०४०/४१/४२ फॅक्स नं. : ०२२-२७४५२२३३
उपायुक्त कार्यालय : ०२२ - २७४५५७५१ उपायुक्त कार्यालय : ०२२ - २७४५५७५१
ई-मेल : panvelcorportation@gmail.com वेबसाईट : www.panvelcorporation.com

जा.क्र. पपा / जनसंपर्क./३१२४/प्र.क्र.४४२/४४३/२०२४ दिनांक : ११/०९/२०२४

### जाहीर निविदा नोटीस

मा. आयुक्त, पनवेल महानगरपालिका खालील नमूद कामाकरीता योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत व अनुभवी व्यक्ती, संस्था, ठेकेदार, किंवा कंपनी यांचेकडून निविदा पद्धतीने निविदा मागवीत आहेत. खालील कामाचे कोरी निविदा फॉर्म WWW.PANVELCOPORA TION.COM या संकेत स्थळावर दि. १३/०९/२०२४ ते दि. २०/०९/२०२४ पर्यंत सायंकाळी १६.०० पर्यंत उपलब्ध राहणार आहेत. सदरच्या जाहीर निविदा घनकचरा व्यवस्थापन विभागात स्वीकारण्यात येतील.

| अ.क्र. | कामाबाबत तपशील | कामाची मुदत | बयाणा रक्कम | कोरी ई-निविदा फॉर्मची किंमत |
|---|---|---|---|---|
| १ | पनवेल महानगरपालिका हद्दीमधील खारघर येथील स्काय वॉकची दैनंदिन आधुनिक पद्धतीने साफसफाई करणेकरिता Ride - on Type Floor Cleaning मशिन खरेदी करणे. | ०६ महिने | रु.१०,०००/- | रु. १,०५० /- (जी.एस.टी. सह) |

जा.क्र. पपा / जनसंपर्क./३१२४/प्र.क्र.४४२/४४३/२०२४
दिनांक : ११/०९/२०२४
संदर्भ :- जा.क्र. पमपा/घकवि/२५२४/प्र.क्र.२२९/७३७/२०२४
दिनांक: ११/०९/२०२४

सही /-
अतिरिक्त आयुक्त
पनवेल महानगरपालिका



## बृहन्मुंबई महानगरपालिका

### वृक्ष प्राधिकरण

-जाहिर सूचना-

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम १९७५ (२४ जून २०२१ पर्यंत सुधारलेला) कलम ८ (३) (क) मधील तरतूदी नुसार परिमंडळ ७ मधील 'आर/उत्तर' विभागातील ०१ प्रस्ताव व 'आर / मध्य' विभागातील ०१ प्रस्ताव असे एकूण ०२ प्रस्तावांना कलम ८ (६) अन्वये मा. म. न. पा. आयुक्त, अध्यक्ष वृक्ष प्राधिकरण समिती बृहन्मुंबई महानगरपालिका यांची मंजुरी प्राप्त झाली आहे.

उपरोक्त प्रस्तांवामधील झाडे कापणे / पुनर्रोपित करणेबाबतचा तपशील हा म. न. पा. च्या www.mcgm. Gov.in संकेतस्थळावर, बृहन्मुंबई महानगरपालिकेविषयी ➔विभाग आणि खाते ➔खातेनिहाय माहिती पुस्तिका ➔उद्याने व वृक्ष प्राधिकरण कागदपत्रे या लिंक वर उपलब्ध आहे. WS222-R/ North, WS223 R / Central.

**उद्यान अधिक्षक**
**व वृक्ष अधिकारी**
उद्यान अधिक्षक यांचे कार्यालय,
पेंग्विन इमारत, २ रा माळा
वीरमाता जिजाबाई भोसले उदयान,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्ग, भायखळा (पूर्व) मुंबई - 40002
दुरध्वनी क्र. २३७४२१६२ Email-sg.gardens@mcgm.gov.in

पीआरओ/१२७४/जाही/२०२४-२५

गप्पी मासे पाळा, मलेरिया टाळा.



## मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ

(म्हाडाचा घटक)

म्हाडा MHADA

### निविदा सुचना

कार्यकारी अभियंता डी - २ विभाग, मुं. इ. दु. व पु. मंडळ, यांच्या कार्यालयामार्फत खालील दर्शविलेल्या उपकरप्राप्त इमारतीच्या दुरूस्ती कामाकरीता म्हाडा/मुं.म.पा./ सा.बां. विभाग/के.सा.बां.वि/रेलवे/बीपीटी, अथवा कोणतेही सरकारी किंवा निमसाकारी विभाग यांचकडे योग्य त्या वर्गाच्या नौदणीकत व पात्र कंत्राटदाराकडून तक्त्यातील स्तंभ क्रं. १० खालील कामाच्या मोहरबंद बी-१ (टक्केवारी दर) निविदा मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नाव | निविदा रक्कम ₹ | इसारा रक्कम ₹ | सुरक्षा अनामत रक्कम | कोऱ्या निविदेची रक्कम (बिना परतावा)₹ | कोऱ्या निविदा विक्रीची तारीख व वेळ | मोहरबंद निविदा स्वीकृतीची तारीख व वेळ | काम करावयाचा कालावधी | ठेकेदारांचा नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| १) | इ. क्र. १५-२३, डॉ. डी.बी.मार्ग डी-२ विभाग मुंबई या इमारतीची दुरुस्ती करणेबाबत ( मंडळामार्फत काम) (२री बोली ) | ९७९३२२/- | ९७९३.०० | २००००.०० | ५९०.०० | दि. १८/०९/२०२४ ते दि. २७/०९/२०२४ सकाळी ११.०० ते दुपारी ०२.०० वाजेपर्यंत | ०४/१०/२०२४ सकाळी ११.०० ते दुपारी २.०० वाजेपर्यंत | १५ महिने | ७ व त्यावरील |
| २) | इ. क्र. ८०-८२, खेतवाडी मेन रोड, डी-२ विभाग मुंबई या इमारतीची दुरुस्ती करणेबाबत ( मंडळामार्फत काम) (२री बोली | ९,५६,८००/- | ९५६८.०० | २००००.०० | ५९०.०० | | | | |
| ३) | प्र.क्र.५४ शीदजी राण स्ट्रीट मुंबई डी-२ विभाग मुंबई या इमारतीची दुरुस्ती करणेबाबत ( मंडळामार्फत काम) (२री बोली) | ८२०१४६/- | ८२०१.०० | १७०००.०० | ५९०.०० | | | | |
| ४) | इ.क्र ६.८ दीनबाई पेटीट स्ट्रीट मुंबई डी-२ विभाग मुंबई या इमारतीची दुरुस्ती करणेबाबत (मंडळामार्फत काम) ) (२री बोली) | ७४७२१७/- | ७४७२.०० | १५०००.०० | ५९०.०० | | | | |
| ५) | इ. क्र. ३६-६०, त्रिबंक परशुरात स्ट्रीट मुंबई डी - २ विभाग मुंबई या इमारतीची दुरुस्ती करणेबाबत ( मंडळामार्फत काम ) ) | ९५१५०२/- | ९५१५.०० | २००००.०० | ५९०.०० | | | | |
| ६) | इ. क्र. ११, नसरवानजी पेटीट स्ट्रीट मुंबई डी - २ विभाग मुंबई या इमारतीची दुरुस्ती करणेबाबत ( मंडळामार्फत काम ) ) | ८६०७४३/- | ८६०७.०० | १८०००.०० | ५९०.०० | | | | |
| ७) | इ. क्र. २३ए, महीला पटेल अग्यारी लेन मुंबई डी - २ विभाग मुंबई या इमारतीची दुरुस्ती करणेबाबत ( मंडळामार्फत काम ) ) | ६५६६५९/- | ६५६७.०० | १४०००.०० | ५९०.०० | | | | |
| ८) | इ. क्र. ८ फॉकलंड रोड २ री क्रॉस लेन मुंबई डी - २ विभाग मुंबई या इमारतीची दुरुस्ती करणेबाबत ( आमदार निधी काम ) ) | ३७७२७७/- | ३७७३.०० | ८०००.०० | ५९०.०० | | | १० महिने | ८ व त्यावरील |

१) कोऱ्या निविदा म्हाडा/ मु.म.पा / सा.बां. विभाग / के.सां.बा.वि / रेल्वे / बीपीटी, अथवा कोणतेही सरकारी किंवा निमसरकारी विभाग यांचेकडे योग्य त्या वर्गाच्या नोंदणरकुत व पात्र वर्गात असलेल्या नोंदणी प्रमाणपत्राच्या, पॅन कार्ड व पूर्वी अशा प्रकारची कामे केलेले पुर्वानुभवाचे प्रमाणपत्र सादर केल्यानंतरच मिळू शकतील.
२) कोऱ्या निविदाच्या प्रती कार्यकारी अभियंता / डी-२ विभाग, मुं. इ दु. व पु. मंडळ, ८९-९५, रजनी महल, ताडदेव रोड, मुंबई-३४, यांचेकडून क्र. ७ मध्ये विहीत केलेल्या दिनांक व वेळेप्रमाणे निविदाची विक्री केली जाईल व सिलबंद निविदा याच कार्यालयात रकाना क्र. ८ प्रमाणे स्विकृत केली जाईल. तसेच स्विकृती केलेल्या मोहरबंद निविदा शक्य झाल्यास अभियंता /डी-२ रकाना क्र. ८ मधील शेवटच्या दिवशी शक्य झाल्यास कार्यकारी अभियंता/डी-२ विभाग, मुं. इ. दु. व पु. मंडळ, यांच्या कार्यालयात सायंकाळी ४.०० नंतर वाजता उघडल्या जातील.
३) सविस्तर निविदा सुचनमध्ये नमुद केल्याप्रमाणे निविदा सादर करावयाच्या कार्यपध्दतीनुसार लखोटा बंद निविदा सादर कराव्यात व नमुद केलेल्या शर्तीनुसार.
४) ठेकेदारांनी निविदा भरतांना ते कुठल्याही सरकारी/ निमसरकारी संस्थेमध्ये काळ्या यादीत नांव समाविष्ट नसल्याबाबतचे नोटरी पुढील शपथपत्र सादर करावे.
५) निविदेसोबत जोडलेली सर्व कागदपत्रे खरी असल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र रु. १००/- च्या स्टॅप पेपरवर नोटरी केलेले सादर करावे.
६) इसारा रक्कम फक्त राष्ट्रीयकृत / शेडयुल बँकेच्या १ वर्षाच्या अल्प मुदतीची अनामत राशी मुख्य लेखाधिकारी, मु.इ. दु. वः पूं. मंडळ यांच्या नावावर द्यावी.
७) १०% पेक्षा अधिक कमी दराच्या निविदा प्राप्त झाल्यास सदर कामाच्या निविदा पुन्हा दोन वेळ मागविण्यात याव्यात (Recall ) व तिस-या वेळेस जर निविदा १०% पेक्षा अधिक कमी दराची प्राप्त झाल्यास संबंधित ठेकेदारास भरावी लागणारी Perfrormance Deposit ही कामाच्या अंतिम देयकानंतर दोन वर्षानंतर परत करण्यात यावी.
८) जर निपिदेचा देकार निविधादिन कामाच्या किमतीपेक्षा कमी दराचा असेल तर त्याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाचे शासन निर्णय दिनांक २६/११ / २०१८ नुसार अथ्वा DTP मध्ये नमुद केल्यानुसार गणना करुन धनाकर्ष (Demand Draft) अतिरीक्त सुरक्षा रक्कम म्हणून सादर करावा.
९) सयुक्त बोलीदाराची बोली स्विकारली जाणार नाही.
१०) जर निविदेचा देकार निविदाधीन कामाच्या किंमतीपेक्षा कमी दरांचा असेल तर प्रथम न्युनतम देकार सादर करणा-यांनी अतिरीक्त सुरक्षा अनामत रक्कम ८ दिवसाच्या आत भरली नाही तर व्दीतीय न्युनतम देकाराच्या निविदाकारास लेखी विचारणा करुन त्यांनी प्रथम न्युनतम पेक्षा कमी दराने काम करण्यास तयार असेल तर त्याची निविदा मंजुर केली जाईल. अतिरीक्त सुरक्षा अनामत बाबत सविस्तर सुचना पहावी.
११) या कामासाठी अशाच प्रकारच्या इमारत बांधकामाचा / वास्तु बांधकामाचा किमान ५ वर्षाचा अनुभव असलेला अभियंता (सीव्हील इंजीनियर) आणि इतर आवश्यक देखरेख अधिकारी ठेकेदाराकडे असणे आवश्यक आहे.
१२)उप ठेकेदाराचा अनुभव आणि त्यांच्याकडील साधने / साधन संपत्ती वियारात घेतली जाणार नाही.
१३) एक किंवा सर्व निविदा कोणत्याही कारणाशिवाय फेटाळण्यांचे अधिकार सक्षम अधिकाऱ्यांकडे ठेवण्यांत येत आहे.
१४ ) जी.एस.टी. अंतर्गत नोंदणी प्रमाणपत्र अनिवार्य आहे. महाराष्ट्र शासन वस्तु व सेवा कायदा २०१७ अन्वये अप्रत्यक्ष कर जसे वॅट विक्रीकर इत्यादिच्या ऐवजी वस्तु व सेवा कर असा बदल झालेला आहे. त्यामुळे असे अप्रत्यक्ष कर निविदा मध्ये सेवा वस्तु कर म्हणून संबोधण्यात येईल, वस्तु व सेवा कर नोंदणी आवश्यक राहील तसेच वस्तु व सेवा कर देयकामधुन प्रचलित दराने कापण्यात येईल.

CPRO/A/681

म्हाडा - गृहनिर्माण क्षेत्रातील देशातील अग्रगण्य संस्था

Follow us: @mhadaofficial

कार्यकारी अभियंता,
डी. २/मुं.इ.दु.व.पु.मंडळ.



## कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण

जनि: / मनि: विभाग

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

### निविदा सूचना क्र. ६/२०२४–२५

प्रशासक, कल्याण डोंबिवली महानगरपालिका हे कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील खालील ४ कामांकरीता बी-१ नगुन्यात योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदाराकडून ई - निविदा मागवीत आहेत.

कोरे निविदा फॉर्म व निविदेबाबत सर्व अटी व शर्तीची माहिती महाराष्ट्राचे www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दिनांक १३ / ९ / २०२४ ते २० / ९ / २०२४ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत उपलब्ध आहेत. निविदा ई-टेंडरींग कार्यप्रणालीद्वारे दि. २० / ९ / २०२४ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत भरता येतील. प्राप्त निविदा दि. २३/९/२०२४ रोजी सायंकाळी ४.०० वाजता शक्य झाल्यास उघडण्यात येईल.

कोणत्याही कारणास्तव एक किंवा सर्व निविदा रद्द करण्याचा अधिकार प्रशासकांनी राखून ठेवला आहे व त्यांचा निर्णय अंतिम व सर्व निविदांसाठी बंधनकारक राहील.

निविदेबाबतची अधिक माहिती www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

जाकृ/ कडोंमपा/ जसंवि / मुभा / १६५७
दिनांक. १२/०९/२०२४

सही/-
शहर अभियंता
कल्याण डोंबिवली महानगरपालिका,
कल्याण.

जर आपण सर्वांनी आपल्या क्षमतेच्या गोष्टी केल्या तर आपण स्वत:ला नक्कीच चकित करू शकतो.



- थॉमस एडिसन
शास्त्रज्ञ



# आत्महत्यांचा कोलाहल थांबवा

नुकताच आत्महत्या प्रतिबंधक दिवस साजरा झाला असला तरी अनेकांना त्याची अजिबातच माहिती नाही असे दिसते. कारण हा दिवस साजरा होत नाही तोच मुंबईत मल्लायका अरोरा यांच्या वडिलांनी राहत्या घरातून सहाव्या मजल्यावरून उडी मारून आत्महत्या केल्याची घटना घडली. जागतिक आत्महत्या प्रतिबंध दिनाचा उद्देश आत्महत्येशी संबंधित समज मोडून काढणे आणि जागरूकता वाढवणे हा आहे. दरवर्षी लाखो लोक मानसिक तणाव आणि सामाजिक तणावामुळे आत्महत्या करतात. लोक रागातून आत्महत्या करण्याचा प्रयत्न करीत आहेत. कौटुंबिक कलह, भांडण, ब्रेकअप ही आत्महत्येमागची महत्त्वाची कारणे आहेत. जर एखादी व्यक्ती नाराज असेल तर त्याचे ऐका, त्या व्यक्तीचे लक्ष दुसरीकडे विचलित करण्याचा प्रयत्न करा. असे झाल्यास त्याच्या मनात आत्महत्येचा विचार येणार नाही. आत्महत्येशी संबंधित समस्यांपैकी सामाजिक दबाव आणि कौटुंबिक दबाव हे सर्वात महत्त्वाचे असल्याचेसुद्धा अनेकदा दिसते. एका अहवालानुसार अपघाती मृत्यू आणि आत्महत्या आकडेवारीनुसार भारतातील सर्वाधिक लोकसंख्या असलेल्या उत्तर प्रदेशात आत्महत्यांचे प्रमाण जास्त असल्याचे स्पष्ट झाले आहे. उत्तर प्रदेशात आत्महत्येचे प्रमाण हे चार टक्के असून राज्यात दोन वर्षांपूर्वी एकूण साडेआठ हजार आत्महत्या झाल्या. त्यापैकी पाच हजार पुरुषांच्या तर तीन हजार महिलांच्या होत्या. सर्वाधिक आत्महत्या करणाऱ्यांमध्ये विशेषतः गृहिणींचा समावेश आहे. तसेच विवाहित जोडप्यांमध्ये ही संख्या जास्त आहे. धक्कादायक बाब म्हणजे बेरोजगारांच्या यादीतसुद्धा आता मोठी भर पडत चालली असल्याचे स्पष्ट होते. या आत्महत्यांमागे सामाजिक व मानसिक दबाव, कौटुंबिक समस्या आणि आर्थिक ताण ही प्रमुख कारणे असल्याचे स्पष्ट होत असल्याने भविष्यात आत्महत्या वाढू शकतात, अशी भीती आहे. आत्महत्येचे सर्वाधिक प्रमाण देशांतील पाच राज्यांमध्ये वाढले आहे. नॅशनल क्राइम रेकॉर्ड ब्यूरोच्या रिपोर्टनुसार महाराष्ट्रातील आत्महत्येचे प्रमाण हे देशात सर्वाधिक आहे. त्यानंतर तामिळनाडू, मध्य प्रदेश, कर्नाटक, आणि बंगालचा समावेश होतो. देशातील एकूण आत्महत्यांपैकी किमान ५० टक्के आत्महत्या या पाच राज्यांमध्ये नोंदवल्या गेल्या आहेत. शेतकऱ्यांच्या आत्महत्या, तरुणाईच्या आत्महत्या यादेखील महत्वाच्या समस्या आहेत. आत्महत्येची कारणे अनेक आहेत, त्याबद्दलदेखील विचार होणे गरजेचे आहे. त्यामध्ये वाढती बेरोजगारी, आईवडिलांच्या वाढत्या अपेक्षा, जीवघेणी स्पर्धा, नकारात्मक विचार, नवीन काही करण्यापेक्षा एकाच क्षेत्राकडे असणारी ओढ यामुळे येणारे अपयश, कामाचे अभ्यासाचे नियोजन नसणे, आपल्याला नेमके काय करायचे आहे हेच माहीत नसणे, द्विधा मनस्थिती असणे, कधी कधी चुकीचे मार्गदर्शन, सोशल मीडियाचा अतिवापर, वास्तविक जगापेक्षा काल्पनिक जगात वावरणे, सामाजिक, आर्थिक अडचणी यातून होणारे मानसिक बदल या सर्व गोष्टींतून वाढत जाणारा ताण आणि यातून येणारे नैराश्य यामुळे जीवन नकोशे वाटणे, झोप न लागणे, कोणत्याच गोष्टीत मन न रमणे, एकटे वाटणे, कोणतेही काम आपण करू शकत नाही अशी हताश भावना होणे, नशिबाला दोष देणे, चिडचिडेपणा वाढणे, राग येणे, नेहमी थकल्यासारखे वाटणे, या जगात कोणीही आपले नाही अशी भावना सतत सतावणे, वजन कमी होणे, व्यसनाच्या आहारी जाणे, आत्महत्येचे विचार येणे अशा प्रकारची लक्षणे वाढत्या नैराश्यातून निर्माण होतात. परिणामी अनेक लोक चुकीचे पाऊल उचलतात आणि जीवन संपवतात. अशा काही केसेस रुग्णालयांपर्यंत येतात, समुपदेशनाच्या माध्यमातून आणि औषधोपचार घेऊन काहींचे जीवन सुधारते. पण काही व्यक्तींना कुठे जायचे, कोणाशी बोलायचे, काय करायचे हे समजत नसल्यामुळे तसेच आपण यातून बाहेर पडू शकणार नाही या भावनेतून चुकीचे टोकाचे पाऊल उचलले जाते. सर्वात धक्कादायक म्हणजे गुजरातमधील सूरत येथे समुपदेशन केंद्रात दररोज किमान शेकडो फोन येत असून, आम्हाला आत्महत्या करायची असल्याचे ते सांगतात. जागतिक तणावाचा गुजरातच्या सूरतमधील हिरे व्यवसायावर वाईट परिणाम होत आहे. गेल्या काही दिवसांत व्यवसाय मंदावल्याने कारागिरांना नोकऱ्या गमवाव्या लागल्या. त्यातच आता बड्या कंपन्या बरखास्त झाल्यामुळे ही परिस्थिती आणखी वाढली आहे. कारागिरांनी आत्महत्येचे पाऊल उचलू नये यासाठी स्थापन करण्यात आलेल्या हेल्पलाइनवर मोठ्या प्रमाणात कॉल आले असल्याचे स्पष्ट होते. सूरतमध्ये गेल्या १६ महिन्यांत किमान ७५ हिरे कामगारांनी आत्महत्या केल्या आहेत. त्यापैकी बहुतेकांनी पगार कपात आणि नोकरी गमावल्यामुळे, त्यातच मंदीचा परिणाम म्हणून हे टोकाचे पाऊल उचलले जात असल्याचे सांगण्यात येते. त्यापैकी अनेकांनी आर्थिक तणावामुळे आत्महत्या करण्याच्या मार्गावर असल्याचे सांगितले आहे. गेल्या काही महिन्यांत बहुतेक कामगार बेरोजगार झाले आहेत. त्यांनाही रोजगार न मिळण्याची चिंता आहे. एका अहवालानुसार ज्या लोकांच्या पगारात ३० ते ४० टक्क्यांपर्यंत कपात झाली आहे, मुलांच्या शाळेची फी, घरभाडे, घर आणि वाहन कर्जाचे मासिक हप्ते इत्यादी गोष्टी या पगारातून केल्या जातात. युक्रेन-रशिया आणि इस्रायल-गाझा संघर्ष तसेच प्रमुख बाजारपेठेतील चीनमधील कमकुवत मागणीमुळे जास्त पुरवठा झाला आहे. यामुळे यावर्षी ५० हजार कामगारांना त्यांच्या नोकऱ्या गमवाव्या लागल्या आहेत. लहान डायमंड युनिट्स बंद झाल्यामुळे काही ज्वेलर्सना त्यांच्या नोकऱ्या गमवाव्या लागल्या आहेत. त्यामुळे कामगार त्यांच्या मुलांची शाळा आणि महाविद्यालयाची फी भरू शकत नाहीत. सूरत हे या प्रदेशातील प्रमुख केंद्रांपैकी एक आहे, जिथे जगातील सुमारे ९० टक्के हिऱ्यांना आकार आणि पॉलिश केले जाते. हे काम अडीच हजारांपेक्षा जास्त युनिट्समध्ये सुमारे १० लाख कामगार करतात. हीच अवस्था महाराष्ट्रात शेतकऱ्यांची झाली आहे. सर्वाधिक शेतकरी आत्महत्या पश्चिम विदर्भात होत आहेत. यंदा वर्षाच्या पहिल्या सहा महिन्यांत ५५७ शेतकरी आत्महत्या येथे झाल्या. त्यातही सर्वाधिक १७० आत्महत्या या अमरावती जिल्ह्यात झाल्या आहेत. खरीप हंगामासाठी शेतकरी पेरणीच्या धावपळीत असताना शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचा आलेख मात्र वाढला आहे, ही बाब नाकारून चालणार नाही. दुष्काळ, अतिवृष्टी, नापिकी या नैसर्गिक स्थितीखेरीज शेतमालाचे पडलेले भाव, सरकारचा बाजारातील हस्तक्षेप, पीक विम्यातील गोंधळ, सरकारी योजनांचा लाभ मिळवून देण्यात होत असलेली अडवणूक, पीक कर्ज घेताना येणाऱ्या अडचणी, वीज आणि पाण्याचे प्रश्न, उदरनिर्वाहासाठी होणारी आर्थिक ओढाताण आणि यातून उभा राहणारा कर्जबाजारीपणा ही शेतकरी आत्महत्यांसाठी प्रमुख कारणे सांगितली जात आहेत. राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियानाअंतर्गत पिकांचे उत्पादन व उत्पादकता वाढविण्यासाठी सुधारित बियाणे वितरण, कृषी अवजारे, सिंचन साधनांना अर्थसाहाय्य इत्यादी योजना राबविण्यात येत आहेत. एकात्मिक पीक उत्पादकता वाढ, मूल्य साखळी विकास, प्रधानमंत्री सूक्ष्म सिंचन योजना, अनुदान असे उपाय राबवूनही शेती न परवडणारी ठरत आहे. बियाणे खरेदीपासून ते काढणीपर्यंत शेतीचा खर्च वाढलेला आहे. त्या तुलनेत बाजारात शेतमालाला भाव मिळू शकत नाही, ही वस्तुस्थिती आहे. नैसर्गिक आपत्तीनंतर शेतकऱ्यांना तातडीच्या मदतीची आवश्यकता असते. दुसरीकडे शेतीला ऊर्जितावस्था प्राप्त करून देण्यासाठी दीर्घकालीन उपाययोजना आवश्यक आहे असे झाले तरच वाढत्या आत्महत्या कमी होऊ शकतात.


# मरावे परी देहरुपी उरावे... चला, मरणानंतरही जिवंत राहूया!

कविवर्य मंगेश पाडगांवकर यांनी रचलेल्या कवितेतील पुढील ओळी जीवनाचा खरा अर्थ उमजावणारी आहे...

आयुष्य हे विधात्याच्या वहीतलं पान असतं..
रिकामं तर रिकामं, लिहिलं तर छान असतं...
शेवटचं पान मृत्यू अन् पहिलं पान जन्म असतं...
मधली पानं आपणच भरायची असतात...
तेच आपलं कर्म असतं...!

या कवितेचा भावार्थ लक्षात घेतल्यावर आपल्याला आयुष्याचा खरा अर्थ उमगतो. आपण रक्तदान, अवयवदान यासारख्या कृतीमुळे आपल्याला जिवंतपणी रक्तदान करुन आणि आपल्या मरणानंतर अवयवदान करुन मानव धर्माचे खऱ्या अर्थाने पालन करण्याची संधी प्राप्त होते.

म्हणूनच आजच्या या लेखातून अवयवदान व त्याचे महत्व समजून घेवूया आणि पुढील आयुष्यासाठी मानवी दृष्टीकोनातून योग्य तो निर्णय घेवूया...!



**अवयवदान म्हणजे काय?**

• जिवंतपणी अथवा मृत झाल्यानंतर आपले अवयव दुसऱ्या व्यक्तीला देणे म्हणजे अवयवदान होय.

• अवयवदान श्रेष्ठदान असून ज्याद्वारे आपण मृत्यूनंतर आपले अवयवदान करून अंतिम स्वरूपी ज्यांचे अवयव निकामी झाले आहेत, अशा अनेक रुग्णांचे प्राण वाचवू शकतो.

• ज्या रुग्णांचे अवयव कायमस्वरूपी निकामी झाले आहेत, अशा अनेक रुग्णांसाठी अवयवदान हाच एक आशेचा किरण आहे.

**अवयवदान प्रत्यारोपण प्रतिरूप म्हणजे काय?**

मानवी अवयव प्रत्यारोपण म्हणजे आधुनिक वैद्यकीय शास्त्राची एक मोठी उपलब्धी आहे. या उपचारात एखाद्या जिवंत वा मृत व्यक्तीचा अवयव अथवा अवयवाचा काही भाग शस्त्रक्रियेद्वारे विलग करून तो एखाद्या गरजवंत रुग्णांमध्ये प्रत्यारोपित करतात.

ज्यांचा एखादा अवयव कायमस्वरूपी निकामी झाला आहे, अशा रुग्णांसाठी ही प्रमाणित व उपलब्ध अशी उपचार पद्धती आहे.

**आपण कोणत्या अवयवांचे दान करू शकतो?**

* मेंदू स्तंभ मृत्यू (Brain Death)- मृत व्यक्तीची हृदयक्रिया चालू आहे पण तिचा मृत्यू झाला आहे, अशी व्यक्ती बहुतेक प्रमुख अवयवांचे म्हणजे मूत्रपिंड, यकृत, स्वादुपिंड, हृदय, आतडी, डोळे, त्वचा, हृदयाची झडप आणि कानाचे डम यांचेदेखील दान करू शकते.

* सामान्य मृत्यू (Normal Death)- मृत व्यक्तीची जिची हृदयक्रिया बंद पडली आहे, अशी व्यक्ती फक्त डोळे व त्वचा या अवयवांचे दान करू शकते.

• जिवंत व्यक्ती (Live Donor)- जिवंत व्यक्ती फक्त आपल्या जवळच्या नातेवाईकांसाठीच अवयवदान करू शकते.

रुग्ण दात्याचे जवळचे नातेवाईक म्हणजे आजी, आजोबा, नातू, मुलगी, मुलगा, आई-वडील, भाऊ-बहीण अथवा पती किंवा पत्नी हे असावे लागतात. या व्यतिरिक्त कोणालाही रुग्णासाठी अवयवदान करायचे असल्यास शासनाची परवानगी घ्यावी लागते. शासन रुग्ण व दाता यामध्ये काही आर्थिक देवाण-घेवाण नसून फक्त प्रेम व स्नेह या नात्यानेच अवयवदान होत आहे,याची खात्री झाल्यावरच परवानगी देते. जिवंत व्यक्ती फक्त काही मर्यादित अवयवांचे म्हणजे मूत्रपिंड अथवा यकृताचा काही भाग दान करू शकतो.

**मस्तिष्क मृत्यू म्हणजे काय?**

वैद्यकीय शास्त्रानुसार एखाद्या व्यक्तीची चेतना व श्वासोच्छवास कायमस्वरूपी बंद झाल्यास त्याला मृत घोषित करता येते. या दोन्हीचे केंद्र आपल्या मेंदूतील मस्तिष्क स्तंभ या भागात असतो. अपघातात डोक्याला मार लागल्यास मेंदूत रक्तस्राव झाल्याने अथवा मेंदूच्या शस्त्रक्रियेनंतर मस्तिष्क स्तंभास कायमस्वरूपी इजा झाल्यास या व्यक्तीचा मस्तिष्क स्तंभ मृत्यू होऊ शकतो.

एखाद्या व्यक्तीचे अतिदक्षता विभागात उपकरणांच्या सहाय्याने हृदय कृत्रिमरित्या क्रियाशील ठेवले असेल तसेच काही ठराविक प्रमाणात चाचण्यांच्या आधारे तिचा मस्तिष्क स्तंभ मृत झाल्याचे निश्चित झाले तर त्या व्यक्तीस मृत घोषित करता येते.

अशा व्यक्तीचे हृदय जास्तीत जास्त 16 ते 72 तासापर्यंत कृत्रिमरित्या क्रियाशील ठेवता येते व याच कालावधीत प्रमुख अंतर्गत अवयवांचे दान होऊ शकते. यासाठी त्या रुग्णाच्या जवळच्या नातेवाईकांची संमती आवश्यक असते. असे अवयवदान फक्त शासनाने प्रतिरोपणासाठी मान्यता दिलेल्या रुग्णालयातील अतिदक्षता विभागात मस्तिष्क स्तंभ मृत्यू झाल्यासच असू शकतो.

मस्तिष्क स्तंभ मृत्त अथवा ब्रेन डेड व्यक्ती जगण्याची काही शक्यता असते का? या प्रश्नाचे उत्तर "नाही" असे आहे.

• एखाद्या व्यक्तीस मस्तिष्क स्तंभ मृत्यू अथवा ब्रेन डेड घोषित केले असेल तर ती व्यक्ती जगण्याची शक्यता अजिबात नसते व ती व्यक्ती मृत असते.

• मस्तिष्क स्तंभ मृत व्यक्ती व कोमातील रुग्ण यामध्ये फरक आहे.

• कोमातील रुग्ण मृत नसतात व ते परत जगण्याची शक्यता असते. तसेच मस्तिष्क स्तंभ मृत घोषित करणे म्हणजे इच्छामरण असे बिलकुल नाही.

• मस्तिष्क स्तंभ मृत व्यक्ती ही मृत असते.

अवयवदान करायचे असल्यास मृत्यू हा रुग्णालयात येणे गरजेचे आहे का? याचे उत्तर "होय" आहे.

• मस्तिष्क स्तंभ मृत्यू हा प्रतिरोपणासाठी मान्यता असलेल्या रुग्णालयातच घोषित करता येत असल्याने अशा रूग्णालयातील अतिदक्षता विभागातच मृत्यू झाल्यास अवयवांचे दान होऊ शकते.

• परंतु डोळे व त्वचा यांचे दान मृत्यूनंतर सहा तासापर्यंत घरी मृत्यू झाला असेल तरी होऊ शकते.

मस्तिष्क स्तंभ मृत्यू घोषित करणे व अवयवदान कायदेशीर आहे का? याचे उत्तर "होय" असे आहे.

भारतामध्ये मानवी अवयव प्रत्यारोपण कायदा 1994 नुसार नुसार मस्तिष्क स्तंभ मृत्यू व अवयवदान या दोन्हींना मान्यता दिली आहे. या कायद्याची खालील विशेष उद्दिष्टे आहेत-

•मस्तिष्क स्तंभ मृत्यूला मान्यता देणे जेणेकरून मृत्यूनंतर अवयवदान होऊ शकेल.

•रुग्णांच्या उपचारासाठी मृत व्यक्तीचे अवयव काढणे, साठविणे व प्रतिरोपण करणे, यावर नियंत्रण ठेवणे.

•मानवी अवयवांच्या व्यापारावर प्रतिबंध घालणे, कायद्याने अवयव विकणे व विकत घेणे व त्यासाठी जाहिरात करणे किंवा अवयव मिळवून देण्यासाठी व्यापारी तत्त्वावर मध्यस्थी करणे, यावर बंदी घालण्यात आलेली आहे.

अवयवदानानंतर मस्तिष्क स्तंभ मृत व्यक्तीचे शरीर त्यांच्या नातेवाईकांना परत दिले जाते का? होय. मस्तिष्क स्तंभ मृत व्यक्तीचे अवयव काढल्यानंतर त्यांचे शरीर सन्मानपूर्वक त्यांच्या नातेवाईकांना अंत्यविधीसाठी परत दिले जाते. अवयवदान व देहदान या दोन्हीमध्ये फरक आहे. देहदानामध्ये मृताचे शरीर वैद्यकीय प्रशिक्षणासाठी वैद्यकीय महाविद्यालयामध्ये ठेवून घेतले जाते तर अवयवदानमधील अवयव प्रत्यारोपणासाठी वापरले जातात व शरीर नातेवाईकांना परत केले जाते.

दान केलेल्या अवयवांचे वितरण कसे होते, ते फक्त श्रीमंत व्यक्तींनाच दिले जातात का? याचे उत्तर "नाही" असे आहे.

गरजू रूग्णांचे वय, रक्तगट त्यांच्या आजाराची तीव्रता, ते किती दिवस अवयवांची प्रतिक्षा करीत आहेत, त्यांची वैद्यकीय गरज या सर्वांसाठी प्रत्येक रुग्णास गुण दिले जातात. या सर्व गरजू रूग्णांची एक सामायिक प्रतिक्षा यादी केली जाते व सर्वाधिक गरजू रुग्णास अवयव दिला जातो. रुग्णांची आर्थिक स्थिती, त्यांची जात व धर्म, याची प्रतिक्षा यादीत त्यांचे स्थान ठरविताना काही संबंध नसतो. अवयवांचे वितरण हे महाराष्ट्र शासनाने घालून दिलेल्या नियमानुसार विभागीय अवयव प्रत्यारोपण समन्वय समिती यांच्यामार्फत पारदर्शकपणे होते. मस्तिष्क स्तंभ मृत दात्याच्या नातेवाईकांना अवयव कोणाला दिले आहेत हे कळू शकते का? याचे उत्तर "नाही" असे आहे.

नातेवाईकांना अवयव मिळालेल्या रुग्णाचे नाव व पत्ता सांगितला जात नाही. अवयवदान केल्याने मस्तिष्क स्तंभ मृत दात्याच्या शरीरावर काही विद्रूपता येते का? याचे उत्तर "नाही" असे आहे. मस्तिष्क स्तंभ मृत्यू दात्यास ऑपरेशन थिएटरमध्ये नेऊन त्याचे अवयव काळजीपूर्वक काढले जातात व शरीरावर विद्रूपता येत नाही. एखाद्या व्यक्तीची शस्त्रक्रिया जितक्या काळजीपूर्वकरित्या केली जाते, तितक्याच काळजीपूर्वकरित्या मस्तिष्क स्तंभ मृत्यू दात्याचे अवयव काढले जातात, जखम पुन्हा शिवली जाते. शरीरावर, पोटावर अथवा छातीवर शस्त्रक्रिया केल्याचे टाके मात्र राहतात.

अवयवदानाला धर्माची परवानगी आहे का? याचे उत्तर "होय" असे आहे. भारतातील सर्व धर्मांनी अवयवदानाला पाठिंबा दिला आहे व अवयवदान हे एक पुण्याचे काम मानले आहे. अवयवदान केल्यानंतर मस्तिष्क स्तंभ मृत व्यक्तीच्या नातेवाईकाला काही मोबदला दिला जातो का? याचे उत्तर "नाही" असे आहे. अवयवदानासाठी मस्तिष्क स्तंभ मृत व्यक्तीच्या नातेवाईकाला आर्थिक अथवा कुठल्याही स्वरुपाचा मोबदला दिला जात नाही. म्हणून अवयवदान हे शुद्ध व श्रेष्ठ ठरते. परंतु अवयवदानाला संमती दिल्यानंतर अवयवदानासाठी करण्यात येणाऱ्या चाचण्यांचा तसेच इतर काही वैद्यकीय खर्च मृतांच्या नातेवाईकांना करावा लागत नाही.

**अवयवदान करायची इच्छा असल्यास काय करावे?**

एखाद्या व्यक्तीस मृत्यूनंतर आपल्या अवयवांचे दान करण्याची इच्छा असल्यास त्यांनी कायद्यानुसार संमतीपत्र भरणे आवश्यक आहे. संमतीपत्रावर एखाद्या जवळच्या सज्ञान नातेवाईकांची सही घेणे देखील आवश्यक आहे. असा फॉर्म भरल्यानंतर त्या व्यक्तीस डोनर कार्ड दिले जाईल.

हे कार्ड दात्याने सतत आपल्याजवळ बाळगावे. जेणेकरून त्यांच्या नातेवाईकांना अथवा मित्रपरिवाराला त्याच्या अवयवदान करण्याच्या इच्छेविषयी माहिती होईल.

जरी आपण डोनर कार्डवर सही केली असली तरी आपल्या मृत्यूनंतर आपल्या जवळच्या नातेवाईकांच्या संमतीशिवाय अवयवदान होवू शकत नाही, म्हणून आपल्या अवयवदानाच्या इच्छेविषयी नातेवाईकांना माहिती असणे आवश्यक आहे.

अवयवदानाविषयीची अधिक विस्तृत माहिती www.dmer.org, www.notto.nic.in या वेबसाईटवर उपलब्ध आहेच. त्याशिवाय डोनर कार्ड व अवयवदानासंबंधी माहिती देण्यासाठी

• विभागीय स्तरावर मुंबई येथे विभागीय अवयव प्रत्यारोपण समन्वयन समिती, एल.टी.एम.जी. हॉस्पिटल (सायन हॉस्पिटल) कॉलेज बिल्डिंग, दुसरा मजला, औषध भांडाराच्या बाजूला, सायन (पश्चिम) मुंबई-22, (www.ztccmumbai.org),

• विभागीय अवयव प्रत्यारोपण समन्वयन समिती, पुणे द्वारा के.ई.एम. हॉस्पिटल, रास्ता पेठ, पुणे-1, (www.ztccpune.org),

• विभागीय अवयव प्रत्यारोपण समन्वयन समिती, औरंगाबाद, नॅफ्रॉलॉजी विभाग, एम.जी.एम.मेडिकल कॉलेज, एन-6, सिडको, औरंगाबाद 431003,

• विभागीय अवयव प्रत्यारोपण समन्वयन समिती,नागपूर, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल, मानेवाडा, नागपूर-440003 येथे विभागीय अवयव प्रत्यारोपण समन्वय समिती कार्यरत आहेत.

नांदेड जिल्ह्यातील ज्येष्ठ पत्रकार माधव संताजी अटकोरे (मो.8087565172) यांनी या विषयावर "अवयवदान: पार्थिवाचे देणे" या पुस्तकातून अनेक मान्यवरांचे अनुभव आणि कर्तृत्व अतिशय समर्पक शब्दात गुंफले आहे. तर मुंबईतील प्रसिद्ध ज्येष्ठ पत्रकार कुमार कदम, नवी मुंबई घणसोली येथील डॉ.थोरात, ठाणे जिल्ह्याचे जिल्हा माहिती अधिकारी मनोज सुमन शिवाजी सानप, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.कैलाश पवार, अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. धीरज महांगडे यांच्यासह अनेक मान्यवर व्यक्ती "अवयवदान" या विषयावरील समाजात जनजागृती वाढविण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न करीत आहेत.

या लेखाद्वारे आपल्याला "अवयवदान" या विषयाबाबत आवश्यक ती माहिती मिळालेली असेलच. माझ्यासह माझ्या कर्मचाऱ्यांनी अवयवदानाचा संकल्प केला आहे... तर मग चला आपणही अवयवदानाचा संकल्प करु या अन् मरणानंतरही आपल्या अवयवरुपाने जिवंत राहूया.... आपले जीवन सार्थकी लावू या..!

- मनोज सुमन शिवाजी सानप
जिल्हा माहिती अधिकारी, ठाणे

## पत्र मानस

### सर न्यायाधीश धनंजय चंद्रचूड आणि राम शास्त्री प्रभुणेचा बाणा

सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांच्या निवासस्थानी श्री गणेशाचे मा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दर्शन घेतले. आणि आरतीही केली, असे छायाचित्र सर्वत्र प्रसिध्द झाले असून, तत्पूर्वी नारायणराव पेशवे कालीन न्यायदानाची कामगिरी निष्पक्षपणे, चोख, निर्भिडपणे सांभाळणारे प्रमुख न्यायमूर्ती रामशास्त्री प्रभुणे यांनी नारायणराव पेशवे यांच्या खुनात, त्यांचा चुलता रघुनाथराव पेशवे हाच जबाबदार आहे, असे गृहीत धरून त्याबद्दल त्यांनी देहांत प्रायश्चित घेतले पाहिजे, असे बाणेदार उद्गार काढले आणि न्यायाधीश पदाचा राजीनामा दिला होता. पेशव्यांच्या साम्राज्यात प्रभुणे प्रमुख न्यायाधीश म्हणून कार्यरत असताना, ते आपल्या कार्यकाळात कधीही माधवराव पेशवे यांच्या घरी गेले नाहीत. अथवा त्यांना घरी बोलावले नाही. या ज्येष्ठ न्यायाधीशांन बद्दल पाश्चिमात्य इतिहासकार म्हणतो, न्यायाधीशाची जागा विभूषित करणारा पहिला गृहस्थ म्हणजे रामशास्त्री प्रभुणे. तरी आता मागील दहा वर्षात पंतप्रधान मोदी यांनी न्यायमुर्ती धनंजय चंद्रचूड यांच्या घरी गेले का ? पंतप्रधान आणि सरन्यायाधीश नुसते व्यक्ती नाही तर संस्था आहे. सार्वजनिक व्यक्तींवर बंधने असतात. ७ मार्च २०२३ पूर्वी सत्तारुढ भाजपच्या विरोधात काही निर्णय दिले. त्यावेळी भाजप सरन्यायाधीशांना विरोध करत होते. तरी आता सरन्यायाधीश यांच्या समोर पक्षांतर बंदी कायदा, पक्ष चिन्हं, पक्ष कोणाचा या संबंधी न्यायालयीन याचिका आहेत. याचा निर्णय लवकरात लवकर लावावा. चंद्रचूड ८ नोव्हेंबर २०२४ रोजी सेवा निवृत होणार आहेत. तत्पूर्वी न्यायालयाचा आदर राखून निर्णय जाहीर झाल्यास, एक राजकीय निर्णयाची जगात नोंद होईल.

**-विजय कदम, लोअर परळ.**

### अति सर्वत्र वर्जते

सध्या तरुणांमध्ये सिक्स पॅक ॲपचे भलतेच आकर्षण आहे. या आकर्षणातून बॉडी बिल्डिंगचे वेड तरुणांना लागले आहे. आजच्या धावपळीच्या युगात खाण्याच्या सवयींमध्येही बदल झालाय, त्यामुळे सुदृढ शरीरासाठी दररोज व्यायाम गरजेचा आहे. त्यासाठी काहीजण सकाळ संध्याकाळ जिममध्ये घाम गाळताना दिसतात. निरोगी आणि दीर्घायुष्यासाठी व्यायाम गरजेचाच आहे ; पण हे करताना प्रत्येकाने आपल्या प्रकृतीचा देखील विचार करायला हवा. तसे न करता कमी कालावधीत सिक्स पॅक व पिळदार शरीरयष्टी कमविण्यासाठी तरुण व्यायामाचा अतिरेक करतात. अति व्यायाम देखील शरीराला घातक आहे. अति व्यायाम केल्याने त्याचा दुष्परिणाम ही होऊ शकतो इतका की तो जिवावरही बेतू शकतो. अति व्यायाम व अति वजन उचलणे शरीराला घातक आहे. हे पथ्य पाळून तरुणांनी व्यायाम केला तर, त्याचा लाभ आयुष्यभर होऊ शकतो. 'अति सर्वत्र वर्जते' याचे भान तरुणांनी बाळगावे.

**- श्याम ठाणेदार, पुणे**

### गणेश मूर्तींमुळेच जलप्रदूषण होते का ?

नदीपात्रात किंवा समुद्रात श्री गणेश मूर्तींचे विसर्जन केल्यामुळे जलप्रदूषण होत असल्याचा कांगावा काही तथाकथित पर्यावरणप्रेमींकडून केवळ गणेशोत्सवाच्या काळातच केला जातो आणि त्यासाठी मूर्तीदान करण्याचे किंवा मूर्तींचे कृत्रिम हौदात विसर्जन करण्याचे आवाहन गणेशभक्तांना केले जाते. श्री गणेशमूर्तींचे विसर्जन वाहत्या पाण्यात किंवा नैसर्गिक स्रोत असलेल्या ठिकाणी करावे असा धर्मशास्त्रीय सिद्धांत असून त्यामागील शास्त्रीय कारणही तितकेच महत्वाचे आहे. गणेशोत्सव काळात किती जलप्रदूषण होते याचे कोणतेही परीक्षण आजतागायत करण्यात आलेले नाही किंवा तसा अहवालही कुठे सादर करण्यात आलेला नाही, मग ही नुसतीच आधारहीन बोंब दरवर्षी कशासाठी ? यंदा दीड आणि ५ दिवसांच्या गणेशमूर्ती विसर्जनाच्या वेळी अनेक नद्यांच्या आणि नैसर्गिक तळयांच्या ठिकाणी कडक पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. हे पोलीस गणेशभक्तांना नद्यांमध्ये आणि तळयांमध्ये मूर्ती विसर्जन करू देत नव्हते. अशा प्रकारे गणेशभक्तांवर बळाचा वापर करून त्यांना वाहत्या पाण्यात मूर्तीविसर्जन करण्यास मज्जाव करायचा आणि ' यंदा गणेश भक्तांची कृत्रिम हौदांना पसंती' अशा मथळयाच्या बातम्या प्रसारित करायच्या हा कुठला न्याय आहे ? नद्या आणि समुद्रामध्ये कारखान्यांचे रसायनमिश्रित पाणी आणि सांडपाणी प्रतिदिन मोठ्या प्रमाणात सोडले जाते याविषयी पर्यावरणप्रेमी वर्षभर काहीच बोलताना आढळत नाहीत. कत्तलखान्यातील रक्त मिश्रित पाणी आणि प्राण्यांचे अवयव नद्यांमध्ये सोडले जातात याकडेही ही मंडळी जाणीवपूर्वक दुर्लक्ष करतात. त्यामुळे पर्यावरण प्रेमाचे डोस केवळ गणेशभक्तांनाच पाजण्याऐवजी वर्षभर पाणी प्रदूषित करणाऱ्या मंडळींना आणि त्यांना अनिर्बंध सोडणाऱ्या प्रशासनालाही पाजावेत जेणेकरून खऱ्या अर्थाने पर्यावरणाचे रक्षण होईल.

**- मोक्षदा घाणेकर, काळाचौकी**

### खा.राहुल गांधी यांची 'ती' विधाने दुर्दैवीच

काँग्रेस सर्वेसर्वा व खासदार राहुल गांधी मागील वीस वर्षे राजकारणात सक्रिय असून देखील दुर्दैवाने यशस्वी होऊ शकले नाही. खा.राहुल गांधी सध्या परदेशात म्हणजे अमेरिकेत आहेत आणि तेथील त्यांच्या चाहत्या वर्गाला ओरडून सांगत आहे की भारतात सर्व काही ठिक नाही. भारतात शीखाना स्वातंत्र्य नाही ते पगडी तथा कडं घालू शकत नाही. भारतातील निवडणूका नियंत्रित केलेल्या आहेत. चीनचे तर तोंडभरुन कौतुक करत आहे तसेच काँग्रेस सत्तेवर आल्यावर देशातील आरक्षण योग्य वेळी संपवून टाकणार असल्याचे संकेत सुद्धा जाहीरपणे दिले आहे. खा.राहुल गांधी यांच्या अशा बेजवाबदार विधानामुळे देशाची बदनामी जागतिक पातळीवर होत आहे म्हणूनच खा.राहुल गांधी यांची 'ती' सर्व विधाने देशहिताला बाधक,दुर्दैवी व चुकीचे आहे असे वाटत आहे.

**- संजय गंगाराम साळगांवकर, कुर्ला** ■

## पालिका अतिक्रमण विभागामार्फत ऐरोली विभागात पाडकामाची कारवाई

**नवी मुंबई :** महापालिकेच्या अतिक्रमण विभागाच्या वतीने नोटीस देऊनही संबंधितांनी नोटिशीची दखल न घेतल्यामुळे अनधिकृत बांधकामांविरोधात नवी मुंबई महानगरपालिका अतिक्रमण विभागामार्फत आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या निर्देशानुसार व डॉ. राहुल गेठे यांच्या मार्गदर्शनाखाली अतिक्रमण विभागाने ऐरोली विभागात पाडकामाची कारवाई करण्यात आली. नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील जी विभाग ऐरोली अंतर्गत सागरनाथ रामा मढवी, घर नं - 30 ,मच्छी मार्केटच्या मागे, दिवा गाव ,सेक्टर – 9 , ऐरोली येथील आरसीसी इमारतीचे बांधकाम नवी मुंबई महानगरपालिकेची कोणतीही परवानगी न घेता अनधिकृतपणे सुरु केले होते. सदर अनधिकृत बांधकामास ऐरोली विभागामार्फत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम 1966 मधील कलम 54 अन्वये नोटीस बजाविण्यात आलेली होती. संबंधितांनी केलेले अनधिकृत बांधकाम स्वत:हून हटविणे आवश्यक होते. परंतु त्यांनी अनधिकृत बांधकाम सुरु ठेवले होते. मा.उच्च न्यायालयाने रिट याचिका क्र.1591/2023 च्या आदेशानुसार आज रोजी 1 ते 5 व्या मजल्यावरील एका बाजुचे स्लॅबचे बांधकाम निष्कासीत करण्यात आले आहे.





मुक्तपत्रकार - वृत्तपत्रलेखक श्री दिनेश हरिश्चंद्र तुरे यांच्या वावे -अलिबाग या निवासस्थानी विराजमान झालेली श्री गणरायाची सुंदर - सुबक व विलोभनीय आरास




अंकुश शांताराम पार्टे यांच्या घरातील श्रीगणेश मुर्ती यंदा 25 वर्ष निमित्ताने लाडक्या बाप्पाला 56 प्रसादाचा भोग ही चढवण्यात आला आहे.



राष्ट्रवादी काँग्रेस चे जिल्हा सरचिटणीस रवी गुप्ता यांच्या गोरेगाव येथील निवासस्थानी श्रीची स्थापना करून श्रद्धा पूर्वक पूजा अर्चा करण्यात येत आहे.



रोहीत श्रीधर राहाटे, खटाव बिल्डींग, भायखळा येथील श्रींची मूर्ती

# रायगड जिल्ह्यातील धाटाव एमआयडीसीत भीषण स्फोट

## तीन कामगारांचा मृत्यू तर तिघांची प्रकृती गंभीर

प्रतिनिधी
■ रोहा

रायगड येथील धाटाव एमआयडीसीत मोठा स्फोट झाल्याने तीन कामगारांचा मृत्यू झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. हा स्फोट धाटाव एमआयडीसी येथील एका केमिकल कंपनीत झाला असून या स्फोटाचा आवाज इतका मोठा होता की एक किलोमीटर पर्यंत याचा आवाज ऐकू असल्याचे स्थानिकांकडून समजते. या स्फोटामुळे धाटाव एमआयडीसी परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

धाटाव येथील एमआयडीसी परिसरात झालेल्या या स्फोटाची माहिती मिळताच अग्निशमन दलाचे जवान घटनास्थळी दाखल झाले. या ठिकाणी झालेल्या ढीगरा उपसून बचाव कार्य सुरू करण्यात आले आहे. साधना नायट्रो नामक कंपनीत हा स्फोट झाला असल्याचे समोर आले आहे. हा स्फोट सकाळी 11 च्या सुमारास झाला होता.



धाटाव एमआयडीसी येथील प्लॉट क्रमांक 47 येथील साधना नायट्रोकेम लिमिटेड कंपनीत हा स्फोट झाला आहे. कंपनीतील ओबीडी2 केमिकल प्लांटमध्ये ओबीडी2 प्रॉडक्ट वॉशिंग करण्यासाठी असलेल्या मेथनॉल केमिकलच्या स्टोरेज टॅंकवर फॅब्रिकेटर्सचे ६ कामगार वेल्डिंगचं काम करत होते. ते कामगार वेल्डिंगचं काम करत असताना मिथेनॉल केमिकल टॅंकचा ब्लास्ट होऊन त्यात हे सहा कामगार जखमी झाले आहेत. त्यापैकी तीन कामगारांचा मृत्यू झाला आहे, तर तीन कामगार गंभीर जखमी झाले आहेत. सध्या त्यांना उपचारार्थ सिव्हिल हॉस्पिटल, रोहा येथे हलविण्यात आले आहे.

स्फोटाची माहिती मिळताच येथील आमदार अनिकेत तटकरे यांनी कंपनीला भेट दिली. त्याचबरोबर तिथे असलेल्या अधिकाऱ्यांच्या सेफ्टी विषयी माहिती घेतली आणि त्यानंतर त्वरित रुग्णालयात जाऊन तिघे गंभीर जखमी असलेल्यांची विचारपूस करून त्यातील अतिगंभीर असलेल्या एकाला त्वरित मुंबईच्या बर्नल हॉस्पिटलला नेण्यात आले आहे. या घटनेचा अधिक तपास रोहा पोलीस स्टेशनचे पोलिस निरीक्षक देविदास मुपडे करत आहेत.

दरम्यान, यापूर्वी देखील या एमआयडीसीमध्ये विविध कंपन्यांना आग लागणे तसेच स्फोटाच्या अनेक घटना घडल्या आहेत. असे असूनही येथील कामगारांच्या सुरक्षिततेकडे दुर्लक्ष केले जात असल्याचे दिसते. गेल्यावर्षी महाड एमआयडीसी येथील ब्ल्यु जेट हेल्थकेअर लिमिटेड या कंपनीत मोठा स्फोट झाला होता, यात सात कामगार ठार झाले होते.

# हिंदू देवतांबद्दल अपशब्द वापरल्याने डोंबिवलीत ब्राह्मण महासंघाची निदर्शने



प्रतिनिधी
■ डोंबिवली

प्रभू रामचंद्र, सितामाई, कोट्यवधी भाविकांचे श्रध्दास्थान असलेल्या स्वामी समर्थ आणि ब्राह्मणांबद्दल अपशब्द वापरणाऱ्या पुरोगामी विचारवंत ज्ञानेश महाराव यांच्या निषेधार्थ गुरूवारी सकाळी डोंबिवली पूर्व रेल्वे स्थानका जवळील स्वामी समर्थ मठासमोर ब्राह्मण महासंघ, भाजप कार्यकर्त्यांनी जोरदार निदर्शने केली. आणि समाजात तेढ निर्माण करणाऱ्यांवर शासनाने कारवाई करण्याची मागणी केली. संभाजी ब्रिगेडच्या एका कार्यक्रमात विचारवंत महाराव यांनी हिंदू देवदेवता, ब्राह्मणांबद्दल अपशब्द वापरले. त्यांच्या वक्तव्याचा निषेध गुरुवारी डोंबिवलीत निदर्शने करून करण्यात आला. स्वामी समर्थ मठाबाहेर यावेळी टाळ मृदुंगाचा गजर करण्यात आला.

स्वत:ची राजकीय पोळी भाजून घेण्यासाठी काही राजकीय मंडळी हिंदू देवतांचा अपमान, ब्राह्मण समाजाबद्दल अपशब्द वापरून स्वत:चे स्थान निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहेत. या माध्यमातून समाजात तेढ निर्माण करून अस्वस्थतेचे वातावरण निर्माण करत आहेत. या विकृत प्रवृत्तीला वेळीच जरब बसावी, यासाठी शासनाने कठोर पावले उचलावीत, या मागणीसाठी ही निदर्शने करण्यात आली, अशी माहिती ब्राह्मण महासंघाचे मानस पिंगळे यांनी दिली.

राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार, खा. शाहू छत्रपती यांच्या उपस्थितीत महाराव हिंदू देवता, ब्राह्मण समाजाबद्दल जाहिरपणे अपशब्द वापरून समाजात तेढ निर्माण करत असल्याची दृश्यध्वनी चित्रफित समाज माध्यमांवर प्रसारित झाली आहे. ही ध्वनीचित्रफित पाहून हिंदू धर्मविषयक काम करणाऱ्या अनेक संस्था, संघटनांनी तीव्र नाराजी व्यक्त करून राज्याच्या विविध भागात निदर्शने सुरू केली आहेत.

या निदर्शनांमध्ये ब्राह्मण सभेचे अध्यक्ष राहुल दामले, शहरप्रमुख राजेश मोरे, स्वामींचे घर संस्थेच्या माधवी सरखोत, ब्राह्मण महासंघाचे मानस पिंगळे, उपाध्यक्ष अनिकेत घमंडी, भाजप प्रदेश नेते शशिकांत कांबळे, भाजपचे कल्याण ग्रामीण प्रमुख नंदू परब, वैभव गायकवाड, महिला आघाडीच्या मनीषा राणे, मितेश पेणकर सहभागी झाले होते.

# श्री गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर महापालिकेने अवघ्या 25 दिवसात दुर्गाडी येथे गणेश घाटावर तयार केला पर्यायी रस्ता...!

प्रतिनिधी
■ कल्याण

कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील दुर्गाडी येथील गणेश घाटावर घरगुती तसेच सार्वजनिक गणेश मूर्तींचे मोठ्या प्रमाणात विसर्जन होते. यासाठी दुर्गामाता चौकातून गणेश घाटाकडे जाणारे दोन रस्ते होते—एक मार्ग प्रवेशासाठी आणि दुसरा मार्ग बाहेर येण्यासाठी वापरला जात होता. तथापि, चालू वर्षी नेव्हल म्युझियमच्या बांधकामामुळे या मार्गांपैकी एक मार्ग कायमस्वरूपी बंद करण्यात आला होता. यामुळे विसर्जनासाठी येणाऱ्या वाहनांना पर्यायी मार्गाची गरज निर्माण झाली होती.

महापालिकेने पर्यायी मार्ग तयार करण्याचा निर्णय घेतला असून रिंग रोडवरील सीएनजी पेट्रोल पंपापासून दुर्गाडी गणेश घाटाकडे नवीन रस्ता तयार केला आहे. हा रस्ता 115.00 मीटर लांबीचा आणि 15.00 मीटर रुंद आहे. 2.70 मीटर उताराच्या भागात रिटेनींग वॉल बनवून माती भराव करण्यात आली आहे. पावसाळ्यात नाल्याच्या पूलाचे काम चालू ठेवण्यात आले. नाल्यावर सहा फुट व्यासाचे चार पाईप टाकून पूल बांधला आहे. रस्त्याचे काम पेव्हर ब्लॉक वापरून पूर्ण करण्यात आले आहे.

सर्व कामांसाठी महापालिकेने 2 कोटी रुपयांचा खर्च मान्यता दिली आहे. महापालिका आयुक्त डॉ.इंदु राणी जाखड यांनी या प्रकल्पास प्रशासकीय मान्यता दिली असून श्री गणेशोत्सवाच्या आधी हे काम पूर्ण करण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार, दिवसरात्र काम करून हा नवीन रस्ता 25 दिवसांच्या कमी कालावधीत पूर्ण करण्यात आला आहे.

तथापि, रस्त्याचे कॉक्रीटीकरण सुमारे 20 ते 25 मीटरचे कॉक्रीटचे काम अनंत चतुर्दशी झाल्यानंतर पूर्ण केले जाईल. या दरम्यान कामकाजाची गुणवत्ता आणि जलदगती यावर विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. तसेच घाटाच्या आसपासच्या क्षेत्रात आवश्यक सुविधा, जसे की पाणी पुरवठा, स्वच्छता व्यवस्थापन, आणि सुरक्षेच्या उपाययोजना सुनिश्चित करण्यात आल्या आहेत, अशी माहिती शहर अभियंता अनिता परदेशी यांनी दिली.

श्री गणेशोत्सव हा कल्याण डोंबिवली क्षेत्रातील प्रमुख आणि आनंददायी सण आहे, ज्यात भक्तगण मोठ्या उत्साहाने श्रीगणेश मूर्तींचे पूजन करतात आणि विसर्जनाच्या दिवशी मोठ्या जल्लोषात मूर्ती गणेश घाट येथील खाडीत विसर्जित करतात. विसर्जनाच्या दिवशी मोठ्या प्रमाणात लोकांची गर्दी आणि वाहतूक कोंडी होण्याची शक्यता असते, त्यामुळे स्थानिक नागरिकांना आणि प्रवाशांना अडचणी येतात. महापालिकेने घेतलेल्या उपाययोजनांमुळे या समस्येवर प्रभावीपणे नियंत्रण ठेवणे शक्य होईल आणि गणेशोत्सव अधिक सुव्यवस्थित आणि आनंददायी होईल.

# राष्ट्रीय सफाई कर्मचारी आयोगाचे सदस्य डॉ. वावा यांनी केली पालिकेच्या स्वच्छताविषयक कामाची प्रशंसा

प्रतिनिधी
■ नवी मुंबई

केंद्र सरकारच्या राष्ट्रीय सफाई कर्मचारी आयोगाचे सदस्य डॉ.पी.पी.वावा यांनी आज नवी मुंबई महानगरपालिकेच्या मुख्यालयास भेट देत महानगरपालिकेच्या वतीने सुरु असलेल्या स्वच्छता कामांची तसेच स्वच्छतामित्र व सफाईमित्र यांच्यासाठी महानगरपालिका करीत असलेल्या कामाची प्रशंसा केली. यापुढील काळात अधिक चांगले काम होईल असा विश्वास व्यक्त करीत त्यांनी काही मौल्यवान सूचनाही केल्या.

याप्रसंगी उपस्थित सामाजिक सल्लागार श्री.गिरेंदर नाथ व समन्वयक संदिप चरण यांचाही सन्मान करण्यात आला. सदर बैठकीस अतिरिक्त आयुक्त श्री.सुनिल पवार व श्री.शिरीष आरदवाड आणि विभागप्रमुख व अधिकारी उपस्थित होते.



नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी राष्ट्रीय सफाई कर्मचारी आयोगाचे सदस्य डॉ.पी.पी.वावा यांचे स्वागत केले. यावेळी आयुक्तांनी महानगरपालिकेच्या स्वच्छताविषयक कार्याची आणि सफाई कर्मचाऱ्यांसाठी करण्यात येत असलेल्या कामाची व सोयीसुविधांची सादरीकरणाव्दारे माहिती दिली. महानगरपालिका स्वच्छताकर्मींचा उल्लेख स्वच्छतामित्र व सफाईमित्र करते, यामुळे स्वच्छताकर्मींच्या सामाजिक प्रतिष्ठेत वाढ होते याची दखल सदस्य महोदयांनी घेतली.

यावेळी राष्ट्रीय सफाई कर्मचारी आयोगाचे सदस्य डॉ.पी.पी.वावा यांनी नवी मुंबई महानगरपालिकेच्या स्वच्छताविषयक विविध वाहनांची व यंत्रसामुग्रीची प्रत्यक्ष पाहणी केली व सफाईमित्रांशी थेट संवाद साधला.

# दिव्यांग लाभार्थ्यांना 49 लाखांचे अनुदान

■ उल्हासनगर

दिव्यांग कल्याणकारी योजना विभागाच्या वतीने महापालिका क्षेत्रातील दिव्यांग लाभार्थ्यांना दर महिन्याला १० तारखेपर्यंत प्रोत्साहन अनुदान (पेन्शन) दिले जाते. मात्र प्रोत्साहन अनुदानाचे बील तयार करणारा लिपिक याची विधानसभा निवडणुकीच्या कामासाठी तहसिलदार कार्यालयात सेवा वर्ग केल्यामुळे विभागाकडून दि. ११/९/२४ रोजी दिव्यांग लाभार्थ्यांच्या खात्यात ४९ लाख तीन हजार रूपये इतके प्रोत्साहन अनुदान (पेन्शन) जमा करण्यात आले आहे. त्यामुळे सर्व दिव्यांग लाभार्थ्यांनी आनंद व्यक्त केला आहे, महापालिका प्रशासन नेहमीच दिव्यांगांना अनेक सुविधा उपलब्ध करून देण्यास कटिबध्द असल्याचे दिव्यांग विभागाचे प्रमुख श्री. राजेश घनघाव यांनी सांगितले आहे.

# महानगरपालिकेच्या सुयोग्य व्यवस्थेत पाचव्या दिवशी 7940 श्रीगणेशमूर्तींचे विसर्जन



## 1925 गणेशमूर्तींचे कृत्रिम तलावात विसर्जन करीत नागरिकांनी राखले पर्यावरणाचे भान

प्रतिनिधी
■ नवी मुंबई

'इकोफ्रेंडली प्लास्टिकमुक्त श्रीगणेशोत्सव' साजरा करण्याच्या नमुंमपा आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या आवाहनास नागरिकांकडून चांगला प्रतिसाद लाभला असून शाडूच्या मूर्ती प्रतिष्ठापना करणाऱ्या गणेशभक्तांना स्वच्छता व पर्यावरणमित्र प्रशस्तिपत्र देऊन सर्वच विसर्जनस्थळी सन्मानित करण्यात आले. पर्यावरणपूरक दृष्टीकोन जपणाऱ्या नागरिकांना प्रशस्तिपत्राव्दारे प्रोत्साहित करणाऱ्या महानगरपालिकेच्या या अभिनव संकल्पनेचे भाविकांकडून मोठया प्रमाणात स्वागत करण्यात आले. याव्दारे सर्वच नागरिकांमध्ये पर्यावरण जपणूकीचा संदेश प्रसारित होईल अशी प्रतिक्रिया अनेक नागरिकांकडून व्यक्त् करण्यात आली.

5 व्या दिवशीच्या गणेशमूर्ती विसर्जन प्रसंगी महानगरपालिकेने 22 नैसर्गिक आणि 137 कृत्रिम अशा एकूण 159 विसर्जन स्थळांवर केलेल्या चोख व्यवस्थेत 7940 गणेशमूर्तींचे विसर्जन निर्विघ्नपणे पार पडले. महानगरपालिकेच्या व्यवस्थेची घरगुती व सार्वजनिक मंडळे यांच्यासोबत आलेल्या भाविक भक्तांनी प्रशंसा केली.

नमुंमपा क्षेत्रातील 22 नैसर्गिक विसर्जन स्थळांवर 5902 घरगुती तसेच 113 सार्वजनिक मंडळांच्या 6015 श्रीमूर्तींचे विसर्जन संपन्न झाले. तसेच 137 कृत्रिम विसर्जन स्थळांवर 1914 घरगुती तसेच 11 सार्वजनिक मंडळांच्या 1925 श्रीमूर्तींचे विसर्जन करण्यात आले. अशाप्रकारे 7816 घरगुती व 124 सार्वजनिक मंडळांच्या एकूण 7940 श्रीमूर्तींचे विसर्जन सुरळीतपणे पार पडले. यामध्ये शाडूच्या 1185 मूर्तींचे पर्यावरणपूरक दृष्टीकोन जपत भावपूर्ण विसर्जन करण्यात आले.

# कोपर पूर्व रेल्वे स्थानकाजवळ जिन्याच्या मार्गात बेकायदा गाळ्यांची उभारणी

■ डोंबिवली

गणेशोत्सवाच्या काळात कल्याण डोंबिवली पालिकेला असलेली सुट्टी, त्यानंतर पालिका अधिकारी गणपती विसर्जन कार्यक्रमात व्यस्त राहत असल्याने त्याचा गैरफायदा घेत, कोपर पूर्व रेल्वे स्थानकाजवळ (आयरे बाजू) भूमाफियांनी रेल्वेच्या जिन्याच्या समोर प्रवाशांना अडचण होईल अशा पध्दतीने दोन दिवसांच्या कालावधीत बेकायदा गाळे उभारले आहेत. रेल्वे प्रवासी आणि पादचाऱ्यांच्या जाण्याच्या मार्गात हे बेकायदा गाळे उभारल्याने परिसरातील नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे.

पालिकेच्या ग प्रभागाच्या अंतर्गत हा भाग येतो. शुक्रवार ते रविवार या तीन दिवसांच्या कालावधीत कोपर पूर्व रेल्वे स्थानकाजवळ दोन बेकायदा गाळ्यांची उभारणी भूमाफियांनी केली. त्या गाळ्यांना तातडीने रंगरंगोटी, व्यवसायाच्या नावाचा फलक लावून गाळा जुना असल्याचे वातावरण निर्माण केले आहे. कोपर पूर्व रेल्वे स्थानकात आयरे, म्हात्रेनगर, भोपर, बालाजी गार्डन परिसरातील नागरिक येजा करतात. स्कायवॉकचा जिना कोपर पूर्व रेल्वे स्थानक भागात उतरतो, त्या जिन्याच्या मार्गात भूमाफियांनी प्रवाशांना होणाऱ्या अडथळयाचा विचार न करता दोन बेकायदा व्यापारी गाळ्यांची उभारणी केली आहे.

# कायमस्वरुपी वीजपुरवठा खंडित 245 ग्राहकांच्या घरात परतला 'प्रकाश'

## महावितरण अभय योजनेतून मिळवली वीजजोडणी; व्याजमाफीसह मूळ थकबाकीत सवलत

प्रतिनिधी
■ कल्याण

वीजबिल थकबाकीमुळे वीजपुरवठा कायमस्वरुपी खंडित केलेल्या कल्याण परिमंडलातील २४५ ग्राहकांची घरे प्रकाशाने पुन्हा उजळली आहेत. या ग्राहकांनी व्याज व विलंब आकार शंभर टक्के माफीसह किमान ३० टक्के थकबाकी भरणाऱ्यांना त्वरित वीजजोडणीची संधी देणाऱ्या महावितरण अभय योजना-२०२४ चा लाभ घेत ही संधी साधली. १ सप्टेंबरपासून या योजनेची सुरुवात झाली असून परिमंडलातील २ लाख ९४ हजार ९१ घरगुती, व्यावसायिक आणि औद्योगिक ग्राहकांना कायमस्वरुपी खंडित झालेला वीजपुरवठा पूर्ववत करण्याची संधी यातून मिळणार आहे. परिमंडलातील ३८९ ग्राहकांनी आत्तापर्यंत या योजनेचा लाभ घेतला असून उर्वरित ग्राहकांनीही योजनेत सहभागी होण्याचे आवाहन मुख्य अभियंता चंद्रमणि मिश्रा यांनी केले आहे.



अभय योजनेनुसार मार्च-२०२४ अखेर किंवा तत्पूर्वी वीजपुरवठा कायमस्वरुपी खंडित झालेले लघुदाब व उच्चदाब ग्राहक (सार्वजनिक पाणीपुरवठा व कृषीपंप ग्राहक वगळून) योजनेच्या लाभासाठी पात्र आहेत. थकबाकीची मुळ रक्कम एकरकमी किंवा सहा समान हप्त्यात भरल्यास त्यावरील व्याज आणि विलंब आकार पुर्णतः माफ़ होईल. योजनेतील सहभागी ग्राहकांना एकरकमी किंवा सहा समान हप्त्यात मूळ थकबाकी भरण्याचा पर्याय उपलब्ध आहे. तर थकबाकी एकरकमी भरणाऱ्या उच्चदाब ग्राहकांना मूळ थकबाकीवर ५ टक्के आणि लघुदाब ग्राहकांना १० टक्के अतिरिक्त सवलत मिळणार आहे. मूळ थकबाकी एकरकमी अथवा ३० टक्के रक्कम भरुन योजनेत सहभागी होता येईल. त्यानंतर मागणीप्रमाणे आवश्यकतेनुसार तत्काळ नवीन वीजजोडणी मिळेल. ३० टक्के रक्कम भरणाऱ्या ग्राहकांना मूळ थकबाकी व्याजमुक्त अशा सहा समान हप्त्यात भरण्याची सवलत उपलब्ध आहे.

कल्याण परिमंलातील २ लाख ९४ हजार ९१ ग्राहक या योजनेच्या लाभासाठी पात्र आहेत. योजनेत सहभाग घेत या ग्राहकांना विलंब आकाराचे ३ कोटी ८१ लाख व व्याजाचे ४० कोटी ६१ लाख रुपयांची सवलत मिळवण्याची संधी आहे. त्यासाठी पात्र ग्राहकांनी https://wss.mahadiscom.in/wss/wss या पोर्टलवर केवळ ऑनलाइन पद्धतीने अर्ज करावयाचा आहे. याशिवाय महावितरणच्या स्थानिक कार्यालयांमध्ये इच्छुक ग्राहकांना ऑनलाइन अर्ज करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. थकबाकीपोटी कायमचा वीजपुरवठा खंडित झालेल्या संबंधित ग्राहकांनी अधिकाधिक संख्येने या योजनेत सहभागी होण्याचे आवाहन महावितरणने केले आहे.

## बजाज आलीयान्झ कंपनीच्या मॅनजरकडून कंपनीची दीड कोटींची फसवणूक

**पुणे :** अनिवासी भारतीय नागरिकांच्या अनक्लेम पॉलिसीची माहिती चोरुन बनावट नावाने बँक खाते तयार करुन, मोबाईल नंबर बदलून बजाज आलीयान्झ लाईफ इन्शोरन्स कंपनीची मॅनजरकडून १ कोटी ४७ लाख ८२ हजार २७ रुपयांची फसवणूक करण्यात आल्याचा प्रकार समोर आला आहे. फसवणूकीची रक्कम वाढण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. याप्रकरणी बलराम कुमार पटवा (वय ३२, रा. मानपुरा पटवा टोली, जि.गया बिहार) यांनी सायबर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. त्यानुसार मनोज जैन (रा. बिर्ला नगर, ग्वालीयर, मध्यप्रदेश) याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आलेल्याचे नाव आहे. ही घटना २६ मार्च ते १५ एप्रिल २०२४ या दरम्यानच्या काळात ही घटना घडली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहिती नुसार, बजाज आलीयान्झ लाईफ इन्शोरन्स कंपनी मार्फत भारतीय लोकांबरोबर अनिवासी भारतीय नागरिकांना लाईफ इन्शोरन्स दिला जातो. कन्हैया चटलानी यांच्या वडीलांनी २०११ मध्ये काढलेल्या पॉलिसीच्या मॅच्यूरिटी अमाउंट बाबत कंपनीच्या एक्झीक्युटिव्ह यांच्याकडे विचारणा केली. त्यावेळी कंपनीमार्फत सांगण्यात आले की, पॉलिसी मॅच्युअर झाल्यावर उत्तरप्रदेशच्या मैनपुरी येथील बँक ऑफ इंडियाच्या खात्यावर ९१ लाख ३ हजार १८२ रुपये पाठविण्यात आल्याचे सांगण्यात आले.

म ह त्त्वा चे

### पैसे काढून देण्याच्या बहाण्याने 50 हजारांचा गंडा

**पुणे :** एटीएम केंद्रामधून रक्कम काढून देण्याच्या बहाण्याने चोरट्याने हातचलाखी करीत एकाला ५० हजार रुपयांचा गंडा घातला आहे. टिळक रस्ता परिसरातील भारतीय स्टेट बँकेच्या एटीएम केंद्रामध्ये २ सप्टेंबर रोजी ही घटना घडली असून याप्रकरणी स्वारगेट पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार हे भवानी पेठेत वास्तव्यास असून २ सप्टेंबर रोजी कामानिमित्त टिळक रस्त्यावर आले होते. त्याठिकाणी ते भारतीय स्टेट बँकेच्या एटीएम केंद्रामधून पैसे काढण्याचा प्रयत्न करत होते. त्याचवेळी आलेल्या एकाने त्यांना मदत करण्याच्या बहाण्याने रक्कम काढून देण्याची बतावणी केली. हातचलाखी करीत त्याने एटीएम कार्ड बदलून घेत, तक्रारदारकडून पिन क्रमांक घेतला. रक्कम निघत नसल्याचे सांगत, त्याने दुसरेच कार्ड तक्रारदार यांना दिले. त्यानंतर त्याने वेळोवेळी संबंधित चोरलेल्या एटीएम कार्डचा वापर करून बँक खात्यातून ५० हजार रुपये काढून घेतले. बचत खात्यातून रक्कम कमी झाल्याचा मेसेज आल्यानंतर तक्रारदाराला फसवणूक झाल्याचे लक्षात आले. त्यानंतर त्यांनी पोलीस ठाण्यात घेऊन तक्रार दाखल केली आहे. याप्रकरणी स्वारगेट पोलीस तपास करत आहेत.

### गांजा विक्रीसाठी आलेल्या दोघांना अटक

**पुणे :** गांजा विक्रीसाठी आलेल्या दोघांना गुन्हे शाखेच्या अमली पदार्थ विरोधी पथकाने पुणे-सोलापूर रस्त्यावरील लोणी काळभोर परिसरात पकडले. त्यांच्याकडून ३८ किलो गांजा जप्त करण्यात आला. सुमेर सादिक तांबोळी (वय २६), विकास बाळू बनसोडे (वय ३४, दोघे रा. सांगोला, जि. सोलापूर) अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत. तांबोळी आणि बनसोडे पुणे -सोलापूर रस्त्यावरील लोणी काळभोर परिसरात गांजा विक्रीसाठी येणार असल्याची माहिती अमली पदार्थ विरोधी पथकाला मिळाली. त्यानंतर पोलिसांच्या पथकाने सापळा लावून दोघांना पकडले. त्यांच्याकडून ३८ किलो गांजा जप्त करण्यात आला. अमली पदार्थ विरोधी पथकाचे पोलीस निरीक्षक सुदर्शन गायकवाड, सहायक निरीक्षक नितीनकुमार नाईक, युवराज कांबळे, योगेश मांढरे, चेतन गायकवाड, संदीप जाधव यांनी ही कारवाई केली.

# देशात दोनच सेना, एक सीमेवर अन् दुसरी आपली!

**प्रतिनिधी**
■ **नांदेड**

शिवसेनेच्या स्थापनेनंतर राज्यात तब्बल 180 सेना स्थापन झाल्या. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची 181 वी, पण देशात फक्त दोनच सेना आहेत, एक सीमेवर लढणारी अन् दुसरी आपली म्हणजेच शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे, अशा शब्दात शिवसेना नेते खासदार संजय राऊत यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर हल्ला चढवला.

लोहा येथील शिवसंवाद मेळाव्यात राऊत यांनी भाजप आणि महायुतीवर टीका केली. देश, राज्य आणि सर्वसामान्य जनतेसाठी भाजपची भूमीका स्वार्थी आणि दुटप्पी आहे. खोटे बोलण्याची त्यांची सवय पुर्वीचीच आहे. भाजपला राज्यात पोस्टर चिटकावयला माणूस नव्हता, शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी त्यांना सोबत घेतले. आज तेच आमच्या मुळावर उठलेत, पण ही शिवसेना बाळासाहेब ठाकरेंच्या मर्द मावळ्याची आहे, ती यांना पुरून उरल्याशिवाय राहणार नाही.



मी अनेक शिवसंवाद मेळाव्यांना हजर राहिलो, पण ज्या मतदार संघात शिवसेनेचा आमदार नाही तेथे आम्हाला शिवसेनेचा आमदार निवडून आणायचा आहे. शिवसेनेत मायेचा ओलावा आहे तर याउलट भाजपचे काम 'गरज सैरो वैद्य मरो'असे असल्याचा टोला राऊत यांनी आपल्या भाषणात लगावला. लोहा-कंधारमध्ये निजामाशी लढणारी पिढी आहे, पण इथे रस्ते, पाणी नाही. निझामासोबत लढलेल्या भागाची अशी भकास अवस्था करणाऱ्याना आता घरी बसवा, असे आवाहन राऊत यांनी केले.

आता विकासासाठी राज्यात मशालीचा यज्ञ उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली पेटविला जात आहे. आमचे सरकार आल्यावर लाडक्या बहिणीला दीड हजारच काय आम्ही तीन हजार रुपये देऊ, असेही राऊत यांनी सांगितले. या मेळाव्यात अनेक गावचे सरपंच, उपसरपंच, सामाजिक कार्यकर्ते यांनी शिवसेनेत प्रवेश केला.

## भाग्यश्री आत्राम अखेर शरद पवारांच्या राष्ट्रवादीत

### तुम्ही शेर तर मी शेरनी...



**प्रतिनिधी**
■ **गडचिरोली**

अहेरी, गडचिरोली मतदारसंघातील अजित पवार गटाचे आमदार धर्मरावबाबा आत्राम यांच्या घरात अखेर फूट पडली आहे. आत्राम यांची कन्या भाग्यश्री आत्राम - हलगेकर यांनी जयंत पाटील यांच्या उपस्थितीत शरद पवार गटात प्रवेश केला. इतकेच नाही तर त्यांनी आपल्या पहिल्याच भाषणात अजित पवार आणि वडील धर्मरावबाबा आत्राम यांच्यावरही निशाणा साधला.

मी शांत आहे ते बरे आहे, नाहीतर माझ्याकडे दहा हात आहेत. मी शेरनी आहे. तुमच्याकडे दुधारी तलवार असल्याचे तुम्ही म्हणत असाल तर मी देखील दुर्गा आणि चंडीचा अवतार असल्याचा इशारा भाग्यश्री यांनी वडील धर्मरावबाबा आत्राम यांचा दिला आहे. मला आक्रमक होण्याची संधी देऊ नका, आगामी काळात मैदानही आमचेच असेल आणि तिथे चौकार, षटकार देखील आम्हीच लगावणार असल्याचे भाग्यश्री आत्राम यांनी म्हटले आहे. वडील धर्मरावबाबा आत्राम यांना देखील भाग्यश्री आत्राम यांनी चांगलेच सुनावले. वडिलांचा विरोध असताना देखील त्याला जुमानता भाग्यश्री आत्राम यांनी शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला आहे.

मंत्री धर्मरावबाबा आत्राम यांच्या कन्या भाग्यश्री आत्राम या शरद पवार गटात प्रवेश करत असल्याच्या बातम्या मागील काही दिवसांपासून येत होत्या. मात्र, त्याला धर्मरावबाबा आत्राम यांनी विरोध केला होता. मी घर फोडून बाहेर पडले नाही तर घर फोडून अजित पवार बाहेर पडले असल्याचे भाग्यश्री यांनी म्हटले आहे. आधी अजित पवार यांनी ते कबूल करावे, अशा शब्दात भाग्यश्री आत्राम यांनी अजित पवार यांच्यावर देखील निशाणा साधला. शरद पवार यांच्या पक्षात जाण्याचा निर्णय हा माझा आहे. शरद पवारांनी आमचे घर फोडलेले नाही. मी पक्षप्रवेशासाठी तीन वेळा त्यांची भेट घेतली असल्याचे देखील भाग्यश्री आत्राम यांनी म्हटले आहे.

माझ्या वडिलांकडे दुधारी तलवार असेल आणि त्याचा वापर ते करणार असेल तर मला देखील दहा हात आहेत हे लक्षात ठेवा. आगामी काळात नवरात्र आहे. त्यामुळे आगामी काळात मला चंडी आणि दुर्गा होण्याची संधी देऊ नका, अशा शब्दात त्यांनी आत्राम यांना सुनावले आहे. मी जेवढी शांत आहे, तेवढी मला शांतच राहू द्या. असे देखील त्या म्हणाल्या.

## मविआचा MIM ला वंचितसारखे खेळवण्याचा प्रयत्न

**प्रतिनिधी**
■ **संभाजीनगर**

लोकसभा निवडणुकीमध्ये वंचित बहुजन आघाडीला महाविकास आघाडीने जसे खेळवले आणि शेवटपर्यंत आघाडी केलीच नाही त्याच पद्धतीने आता खेळी केली जात असल्याचा आरोप आमदार संजय शिरसाट यांनी केला आहे.

संजय शिरसाट पुढे बोलताना म्हणाले की, केवळ आपली मुस्लिम समाजाची मते पुन्हा कायम ठेवण्यासाठी आघाडीची बोलणी करत असल्याचे दाखवत आहे. शिरसाट यांनी गुरुवारी पत्रकार परिषद घेत महाविकास आघाडीवर टीका केली.

संजय शिरसाट म्हणाले की, एमआयएमच्या वतीने जी ऑफर महाविकास आघाडीला देण्यात आली आहे, त्या बैठका कुठे घेण्यात आल्या हे गुपीते न बाळगता त्यांनी सर्व काही जाहीर करून टाकावे. उगाच काही लपविण्याचा प्रयत्न करू नये.



संजय शिरसाट म्हणाले की, लोकसभा निवडणुकीत जागावाटप करण्यात बराच वेळ गेला होता. उशीर झाल्यामुळे त्या उमेदवाराला प्रचार करण्यास वेळ देखील कमी मिळाला. मात्र आता महायुतीमध्ये ज्या जागेवर वाद नाहीत त्या ठिकाणचे उमेदवार माहिती म्हणून घोषित केले जाणार आहेत. त्या संदर्भात महायुतीमध्ये चर्चा करण्यात आली असल्याची माहिती शिरसाट यांनी दिली आहे. तर पंतप्रधान नरेंद्र मोदी हे आरतीसाठी सरन्यायाधीश यांच्याकडे गेल्या बाबत संजय राऊत यांच्या टीकेवर विचारले असता राऊत हे मूर्खांच्या नंदनवनात वावरत असल्याची टीका शिरसाट यांनी केली आहे.

## शरद पवारांच्या विरोधात हिंदुत्ववादी संघटना आक्रमक

### भाजप व शिंदे सेनेच्या वतीने टाळ मृदुंग वाजवत आंदोलन

**प्रतिनिधी**
■ **औरंगाबाद**

रघुपती राघव राजाराम पतीत पावन सीताराम, राम राम हरे हरे, हरे कृष्ण हरे यासह अनेक भजन म्हणत भाजपने शरद पवार यांच्या विरोधात घोषणाबाजी करत आंदोलन केले आहे. भाजपचे शहराध्यक्ष शिरीष बोराळकर यांच्या नेतृत्वात हे आंदोलन करण्यात आले आहे.

यावेळी हिंदूच्या अपमनाला तुमची मुक संमती आहे का, शरद पवार हाय हाय उद्धव ठाकरेंचे करायचे काय खाली मुडंके वर पाय, अशा घोषणा यावेळी देण्यात आल्या. ज्ञानेश महाराव तोंडी हिंदू देवदेवतांची स्क्रिप्ट तुमचीच आहे का?, असा सवाल यावेळी शिरीष बोराळकर यांनी केला आहे.

यावेळी शरद पवार यांच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी भाजपच्या वतीने करण्यात आली. तसेच त्यांच्या विरोधाचे वेगवेगळे बॅनर देखील या आंदोलनात



लावण्यात आले होते. शरद पवार हाय हाय खाली मुंडके वर पाय, अशी घोषणा यावेळी करण्यात आली.

छत्रपती संभाजीनगर येथील क्रांती चौकात सुरुवातीला भाजपच्या वतीने आंदोलन करण्यात आले. त्यानंतर शिंदे सेनेच्या वतीने देखील आंदोलन करण्यात आले. शिंदेसेनेचे जिल्हाप्रमुख राजेंद्र जंजाळ यांच्या वतीने हे आंदोलन करण्यात आले.

हिंदू देवतांचे अपमान केले जात असतानाही शरद पवार शांत होते. त्यामुळे केवळ एका समाजाची मते मिळवण्यासाठी हा प्रकार सुरू असल्याचे टीका शिंदेसेनेचे जिल्हाप्रमुख राजेंद्र जंजाळ यांनी केली आहे. यावेळी पवारांच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी देखील करण्यात आली.

संभाजी ब्रिगेडच्या अधिवेशनामध्ये पत्रकार ज्ञानेश महाराव यांनी प्रभू रामचंद्र आणि श्री स्वामी समर्थांच्या संदर्भात आक्षेपार्ह वक्तव्य केले. यावेळी मंचावर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार उपस्थित होते. शरद पवारांनी सर्व विधानांना पाठींबा दिल्याचा आरोप करत भाजप आणि हिंदू संघटना शरद पवारांविरोधात आक्रमक झाल्याचे दिसून येत आहे.

## दगडूशेठ गणपतीला 51 लिटरचे मोदक आईस्क्रीम

### मेरिडियन आइस्क्रीमचा उपक्रम, 700 गणेशभक्तांना वाटप

**प्रतिनिधी**
■ **पुणे**

श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपतीला गणेशोत्सवात विविध मिष्टांनाचा नैवेद्य दाखवला जातो. मात्र, यंदाच्या उत्सवात मेरिडियन आइस्क्रीमतर्फे चक्क ५१ लिटरचे मोदक आईस्क्रीमचा नैवेद्य बाप्पाला दाखाविण्यात आला.

यावेळी ट्रस्टचे उपाध्यक्ष सुनील रासने, मेरिडियन आईस्क्रीमचे निलेश चव्हाण, अशोक चव्हाण, पूजा चव्हाण, हेमंत अर्नाळकर आदी उपस्थित होते. मोदक आईस्क्रीम उत्सवमंडपात उपस्थित तब्बल ७०० गणेशभक्तांना प्रसाद म्हणून देण्यात आले.

निलेश चव्हाण म्हणाले, श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती हे



जगभरातील गणेशभक्तांचे आराध्य दैवत आहे. त्यामुळे बाप्पाला आम्ही हा मोदक आईस्क्रीमचा नैवेद्य अर्पण करीत आहोत. हा मोदक ५१ लिटरचा असून गूळ, नारळ, इलायची, खसखस, आईस्क्रीम वापरून साकारण्यात आला आहे. तसेच त्यावर चांदीचे वर्क आणि केशर देखील लावण्यात आले आहे.

मेरिडियन आइस्क्रीमच्या नांदेड सिटी येथील फॅक्टरी मध्ये तब्बल ७ दिवस हे मोदक आईस्क्रीम तयार करण्याचे काम सुरु होते. तसेच याकरिता १० कारागिरांनी मेहनत घेतली आहे. आज दगडूशेठ गणपती चरणी हे मोदक आईस्क्रीम आम्ही अर्पण करीत आहोत, असेही त्यांनी सांगितले.

एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हिर्सिटीच्या एमआयटी स्कूल ऑफ गव्हर्नमेंटच्यावतीने आयोजित 'मास्टर्स इन पॉलिटिकल लिडरशीप अँड गव्हर्नमेंट' (एमपीजी) २० व्या तुकडीचा शुभारंभ १३ सप्टेंबर २०२४ रोजी सकाळी ११.३० वा. कोथरूड येथील एमआयटी डब्ल्यूपीयूच्या संत ज्ञानेश्वर हॉल येथे संपन्न होणार आहे.

## पहिले आठ किलोमीटर झोळीतून नेलं! नंतर नदीपात्राजवळ सासूनेच केली सुनेची प्रसुती

**प्रतिनिधी**
■ **नंदुरबार**

नंदुरबार जिल्ह्यातील आदिवासी बांधवांच्या आजही मरण यातना संपत नसल्याचे चित्र पाहण्यास मिळत आहे. रस्त्यांची सुविधा नसल्याने आरोग्य सेवा पोहचत नाही. यामुळे रुग्णाला अगदी झोळीत टाकून पायपीट करत न्यावे लागत असते. यात खुटवडा ते कुडब्यापाडा गावाला जाण्यासाठी रस्ता नसल्याने जीव धोक्यात घालून गावकऱ्यांना पुराच्या पाण्यातून प्रवास करावा लागतो. अशात आज एका गर्भवती महिलेला पुराच्या पाण्यातून प्रवास करावा लागत असल्याचे धक्कादायक चित्र समोर आले आहे.

नंदुरबार जिल्हा हा आदिवासी बहुल जिल्हा आहे. जिल्ह्यातील अनेक गावांमध्ये आजही रस्त्यांची सुविधा झालेली नाही. यामुळे कोणत्याची प्रकारच्या सुविधा या भागांमध्ये पोहचू शकत नाही. अशाच प्रकारे अक्राणी आणि अक्कलकुवा तालुक्यातील अनेक गावांना जाण्यासाठी रस्ता नाही. यामुळे येथील नागरिकांना जीवघेणा प्रवास करावा लागत असतो.

अक्राणी तालुक्यातील खुटवडा गावातील गर्भवती असलेल्या महिलेला रात्री बारा वाजेपासून त्रास सुरू झाला होता. मात्र जाण्यासाठी सुविधा नसल्याने सकाळ होण्याची वाट पहिली. पहाटेपर्यंत त्रास सुरू होता. गावाकडे जायला रस्ता नसल्यामुळे बांबूची झोळी बनवून नातेवाईकांनी नदी पार करावी लागली. साधारण



आठ किलोमीटर पायपीट करावी लागली. इतकेच नाही तर नदीतील पूर पार केल्यानंतर नदीपात्राजवळच अधिक त्रास झाल्याने रस्त्यातच प्रस्तुती झाली. त्यानंतर महिलेसह नवजात बाळाला एका वाहनाने रुग्णालयापर्यंत पोहोचविण्यात आले. आता राजबर्डी प्राथमिक आरोग्य केंद्रात महिलेवर उपचार सुरू आहेत. गावापर्यंत रस्ताच नसल्याने रुग्णवाहिका येऊ शकत नाही. गावाकडे जायला रस्ता नाही नद्यांना पूल नाही. त्यामुळे प्रत्येक वेळेस बांबूची झोळी करून रुग्णालय गाठावं लागत असल्याचे चित्र येथे नेहमीच पाहण्यास मिळते.

## आळंदीतील 2 नंबरचे धंदे पोलिसांकडून बंद न झाल्यास मीच कारवाई करेन

**प्रतिनिधी**
■ **पुणे**

आळंदीमध्ये वारकरी समाज मोठया प्रमाणात येत असतो, त्याजागी दर्शन घेतल्याशिवाय ते पुढे जात नाही. व्हीआयपी दर्शनमुळे लोकांना त्रास होतो त्यामुळे मी समाधीचे बाहेरुन दर्शन घेतले. सदर भागातील काहीजणांनी माझ्याकडे तक्रार केली की, दोन नंबरचे धंदे सुरु आहे. ते बंद झाले नाही तर मी एखाद्याला निलंबीत करुन पुढील कारवाई करेल. पुणे पोलिसांना सात आणखी पोलिस स्टेशन, पिंपरी चिंचवडला चार अतिरिक्त पोलिस स्टेशन मंजूर करण्यात आले आहे. आम्ही पोलिसांचे कामात हस्तक्षेप करत नाही, त्यांनी दोन नंबरच्या धंद्यावर कडक कारवाई करणे गरजेचे आहे असे मत उपमुख्यमंत्री व पुण्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी गुरुवारी व्यक्त केले.



पुणे जिल्हयात चाकण येथील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या मेळाव्यात ते बोलत होते.

अजित पवार म्हणाले, ज्यांना बीडी, तंबाखू, गुटखा खाणे सवय आहे त्यांना कर्करोग मोठया प्रमाणात होत असल्याचे दिसून येत आहे.13 हजार रुग्ण अशाप्रकारे असल्याचे कॅन्सरमुक्त समाज करण्याचा आमचा संकल्प असून उपजिल्हा रुग्णालय चाकण येथे 95 कोटीची इमारत करण्यात येत आहे. 100 बेडचे महिलांचे हॉस्पिटल देखील उभे करण्याची मागणी खेडचे आमदार दिलीप मोहिते यांची असून ते काम देखील पूर्ण करण्यात येईल.

## संभाजीनगरात 113 रिक्षा जप्त

### बेशिस्त रिक्षा चालकांवर वाहतूक पोलिसांची कारवाई

**प्रतिनिधी**
■ **संभाजीनगर**

छत्रपती संभाजीनगर शहरातील बेशिस्त रिक्षा चालकांवर कारवाई करण्यासाठी आता वाहतूक शाखेचे पोलीस ॲक्शन मोडवर आले आहेत. दरम्यान वाहतूक पोलिसांनी ४८० रिक्षांची तपासणी करून त्यापैकी ११३ रिक्षा जप्त करण्यात आल्याची माहिती वाहतूक शाखेने दिली.

संभाजीनगर रिक्षा चालकांकडून बेशिस्तपणा सुरु आहे. वाहतूक पोलिसांनी अनेकदा कारवाई केल्यानंतर देखील रिक्षा चालकांची अनेकदा मनमानी सुरु असल्याचे पाहण्यास मिळते. दरम्यान बुधवारी एका महिला प्रवासीला गल्लीबोळातून फिरवत नेण्याचा प्रकार एका रिक्षा चालकांकडून करण्यात आला होता. यानंतर सदर महिलेने रिक्षा चालकांना मारहाण देखील केली होती.

एका महिलेला रिक्षा चालकाने जाणून गल्लीबोळातून घेउन जाण्याचा प्रकार घडला होता. हा प्रकार समोर आल्यानंतर त्यानंतर वाहतूक शाखेने ही कारवाई करण्यास सुरुवात केली. यात दिवसभरात ४८० रिक्षांची तपासणी करत ११३ रिक्षा जप्त केल्या आहेत.

## मराठा समाज आरक्षणासाठी विशेष अधिवेशन घ्या

### राजेंद्र राऊतांच्या ठिय्या आंदोलनाला सुरुवात

**प्रतिनिधी**
■ **सोलापूर**

मराठा आरक्षणासाठी आता आणखी एक आंदोलन राज्यात सुरु झाले आहे. मनोज जरांगे यांच्या प्रमाणेच मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण देण्याची मागणी करत अपक्ष आमदार राजेंद्र राऊत यांनी आंदोलन सुरु केले. यावेळी त्यांनी मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे यांचे नाव न घेता त्यांच्यावर जोरदार टीका केली. ते म्हणाले की, स्वतःच्या राजकारणाची पोळी भाजण्यासाठी कोणीही मराठा समाजाला झुलवत ठेवू नये आणि महाराष्ट्राचा मणिपूर करू नये असं आमदार राजेंद्र राऊत यांनी मनोज जरांगे आणि महाविकास आघाडीच्या नेत्यांना उद्देशून केलं.

सर्वच राजकीय पक्षांनी मराठा



आरक्षणावर अंधारात भूमिका न मांडता विधानसभेचे एक दिवसाचे अधिवेशन बोलवून त्यात आपली भूमिका स्पष्ट करावी. जर मराठा समाजाला ओबीसीमधून आरक्षण द्यायचं असेल तर तसे सांगावे. मात्र समाजाला झुलवणे बंद करावे असा टोला आमदार राऊत यांनी मनोज जरांगेंना लगावला. सगळ्या आमदारांकडून पत्र घ्या आणि विशेष अधिवेशन बोलवण्याची मागणी करा, बाकी काहीही बोलू नका असा टोलाही त्यांनी मनोज जरांगे यांना लगावला. बार्शीचे आमदार राजेंद्र राऊत यांनी आजपासून बेमुदत ठिय्या आंदोलन सुरू केले आहे. रोज सकाली दहा ते सायंकाळी सहा ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्या जवळ ठिय्या आंदोलन करणार आहे. राजेंद्र राऊत हे बार्शीचे अपक्ष आमदार आहेत. ते म्हणाले की, माझे विरोधक महाविकास आघाडीत असल्याने पहिली अडीच वर्ष मी विरोधात होतो. भाजपच्या नेतृत्त्वात सत्ता आल्यानंतर मी एकनाथ शिंदें सोबत आलो. वयाच्या सोळाव्या वर्षापासून मी मराठा आंदोलनात काम केलेलं आहे, असंही राजेंद्र राऊत म्हणाले.

## आरटीई अंतर्गत 22 विद्यार्थ्यांचे प्रवेश केले रद्द

### धाराशिवच्या गटशिक्षणाधिकाऱ्याला 15 हजाराचा दंड

**प्रतिनिधी**
■ **धाराशिव**

आरटीई २५ टक्के योजनेतून विद्यार्थ्यांना देण्यात आलेले प्रवेश ऐनवेळी रद्द करण्यात आले होते. यामुळे उच्च न्यायालयाच्या छत्रपती संभाजीनगर येथील खंडपीठाने धाराशिवच्या गटशिक्षणाधिकाऱ्यांना पंधरा हजार रुपयांचा दंड ठोठावला आहे. ही रक्कम त्यांच्या पगारी खात्यातून दोन याचिकाकर्त्यांना देण्याबाबत उच्च न्यायालयाने सांगितले आहे.

राज्य शासनाने शिक्षण कायद्यांतर्गत गरीब मुलांसाठी आरटीई अंतर्गत इंग्लिश मिडीयम शाळांमध्ये २५ टक्के आरक्षणात मोफत प्रवेश देण्याची योजना सुरु केली आहे. पालकांनी ऑनलाईन अर्ज भरून शाळांची निवड करावयाची असते. या यादीनुसार मुलाचा नंबर लागल्यास दिलेल्या मुदतीत प्रवेश घेणे बंधनकारक असते. मात्र शाळेत नंबर लागल्यानंतर देखील ऐनवेळी विद्यार्थ्यांचे प्रवेश रद्द करण्यात आल्याचा प्रकार धाराशिवमध्ये घडला होता. याबाबत पालकांनी खंडपीठात याचिका दाखल केली होती. धाराशिवचे गटशिक्षणाधिकारी आसरार सय्यद यांनी २२ विद्यार्थ्यांचे प्रवेश रद्द करण्याची प्रक्रिया केली होती.

## आमदार योगेश कदम यांच्या शुभेच्छा फलकावर छेडछाड

### दापोली-खेड मार्गावर शिंदेसेनेचा रास्ता रोको

**प्रतिनिधी**
■ **दापोली**

तालुक्यातील टाळसुरे येथे आमदार योगेश कदम व त्यांच्या पत्नीचा फोटो असलेल्या गौरी गणपतीच्या शुभेच्छांच्या फलकाची छेडछाड करण्यात आल्याने शिंदेसेनेच्या कार्यकर्त्यांनी रास्ता रोको केला. त्यामुळे काही काळ वाहतूक ठप्प झाली. पोलिसांनी कारवाईचे आश्वासन दिल्यानंतर रास्ता रोको मागे घेत वाहतूक पूर्ववत करण्यात आली.

दापोली खेड मार्गावरील टाळसुरे येथे लावलेल्या फलकावर छेडछाड करण्यात आल्याचे कळल्यानंतर तालुक्यात सर्वत्र संतापाची लाट पसरली आहे. या



प्रकाराची माहिती मिळताच नीलेश शेठ यांच्या नेतृत्वाखाली संतप्त कार्यकर्त्यांनी दापोली खेड मार्गावर ठिय्या आंदोलन केले. काही काळ वाहतूक रोखून धरण्यात आली. त्यामुळे गोंधळाचे वातावरण निर्माण झाले.

आमदार योगेश कदम व त्यांच्या पत्नीचे छायाचित्र असलेले गौरी गणपतीच्या शुभेच्छा देणारे फलक तालुक्यात सर्वत्र लावण्यात आले आहेत. यातील एका फलकाची छेडछाड करण्यात आल्याचे काही कार्यकर्त्यांच्या निदर्शनास आले. त्यानंतर शिवसैनिक हळूहळू एकत्र जमायला सुरुवात झाली. सर्व कार्यकर्त्यांनी या घटनेचा निषेध नोंदवला आणि सर्व जण रस्त्यावरच ठिय्या मारून बसले.

## निवृत्ती मागे घेऊन पोलार्ड मुंबई इंडियन्सकरता खेळणार

**मुंबई :** आयपीएल २०२५ पूर्वी मेगा ऑक्शन होणार आहे. या मेगा ऑक्शनपूर्वी आयपीएल संघांनी तयारी सुरु केली आहे. आयपीएल २०२५ मेगा ऑक्शनमध्ये बऱ्याच खेळाडूंचा समावेश असणार आहे. कारण यावेळी आयपीएल संघांना चार ते पाच खेळाडूच रिटेन करता येणार असून इतर सर्व खेळाडूंना रिलीज करावे लागणार आहे. म्हणजेच एकंदरीत सर्व संघांना आपली पुनरबांधणी करावी लागणार आहे. अशात पोलार्ड तात्या नावाने आयपीएलमध्ये प्रसिद्ध असलेल्या किरॉन पोलार्डचे आयपीएलमध्ये खेळाडू म्हणून पुनरागमन असल्याची चर्चा सुरु आहे. किरॉन पोलार्ड हा देशातील प्रतिष्ठित लीग आयपीएलमध्ये दीर्घकाळ मुंबई इंडियन्स संघाचा भाग होता. त्याने मुंबई इंडियन्स फ्रँचायझीसाठी प्रदर्शन केले आहे. मात्र, मागील काही वर्षांपूर्वी त्याने आयपीएलमधून निवृत्ती घेतली आहे. सध्या तो मुंबई इंडियन्सचा फलंदाजी प्रशिक्षक आहे. आता, तो कॅरेबियन प्रीमियर लीग २०२४ मधील त्याच्या स्फोटक खेळीमुळे चर्चेत आला आहे.



## श्रीकांत चषक जिंकण्यासाठी ज्युनियर 48 कॅरमपटूमध्ये चुरस

**प्रतिनिधी**
■ मुंबई

श्रीकांत चषक आंतर शालेय-कॉलेज कॅरम स्पर्धा जिंकण्यासाठी ज्युनियर ४८ कॅरमपटूमध्ये १४ सप्टेंबर रोजी कांदिवली-पूर्व येथे चुरस होणार आहे. श्रीकांत स्पोर्ट्स क्लब-कांदिवली व आयडियल स्पोर्ट्स अकॅडमी आयोजित १८ वर्षाखालील विनाशुल्क कॅरम स्पर्धेतील विजेत्या-उपविजेत्यांना एकूण ८ आकर्षक चषक व स्ट्रायकर पुरस्कार दिले जाणार आहेत. श्रीकांत स्पोर्ट्स क्लबने गणेशोत्सव साजरा करतांना यंदा प्रथमच ५ जिल्ह्यांच्या आंतर शालेय-कॉलेज कॅरम स्पर्धेचा मोफत उपक्रम साकारला आहे.


विवा कॉलेज-विरारचे भव्या सोळंकी व जोनाथन बोनाल, आयएनजी इंग्लिश हायस्कूल-वसईचा श्रीशान पालवणकर, पार्ले टिळक विद्यालयाचा सार्थक केरकर, युनिव्हर्सल हायस्कूल-दहिसरचा वेदांत राणे, डॉ. आंबेडकर स्कूल-वरळीचा समीर खान, रुईया कॉलेजचा कौस्तुभ जागुष्टे, पाटकर विद्यालय-डोंबिवलीचे वेदांत पाटणकर व गौरांग मांजरेकर, साठे कॉलेजचा तृशांत कांबळी, वरळी सी फेस हायस्कूलचा रेहान शेख, अकबर पिरभॉय कॉलेजचे झहीर शेख व अवैस खान आदी ज्युनियर कॅरमपटू विजेतेपदाच्या दावेदारीसाठी सर्वोत्कृष्ट खेळ करण्याची शक्यता आहे. आयडियल स्पोर्ट्स अकॅडमीचे अध्यक्ष लीलाधर चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली श्रीकांत स्पोर्ट्स क्लबचे पदाधिकारी प्रणव निकुंब, प्रकाश चेल्लारी, सिद्धेश पवार, स्वप्निल पाटील, मिलिंद गावकर आदी मंडळी कॅरम स्पर्धा दर्जेदार होण्यासाठी विशेष कार्यरत आहेत. पंचाचे कामकाज नामवंत पंच प्रणेश पवार व चंद्रकांत करंगुटकर हे पाहणार आहेत.

# पंतप्रधान मोदी आणि पॅरालिम्पियन खेळाडू यांच्यात 'ग्रेट भेट'

## पॅरालिम्पिक चॅम्पियनसाठी कायपण ! चक्क जमिनीवर मांडी घालून बसले पंतप्रधान







**प्रतिनिधी**
■ नवी दिल्ली

पॅरिस येथील पॅरालिम्पिक स्पर्धेत भारतीय खेळाडूंनी नवा इतिहास रचला. आतापर्यंतच्या इतिहासात जे घडलं नाही तो सीन पाहायला मिळाला. भारताने पॅरीसमध्ये सर्वाधिक २९ पदकं जिंकली. टोकियो पॅरालिम्पिकचा रेकॉर्ड मागे टाकत भारताच्या नावे आता या स्पर्धेतील नव्या विक्रमाची नोंद झाली आहे.

पॅरिस पॅरालिम्पिक स्पर्धेत दमदार कामगिरी करून मायदेशी परतलेल्या खेळाडूंचे सर्वत्र कौतुक होताना दिसत आहे. परंपरेनुसार जगाच्या मानाच्या स्पर्धेतून परतलेल्या खेळाडूंसाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या भेटीचा खास कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. गुरुवारी १२ सप्टेंबर रोजी पंतप्रधानांच्या निवासस्थानी ऑलिम्पिकमधील खेळाडूंप्रमाणेच पॅरालिम्पिक स्पर्धा गाजवणाऱ्या खेळाडूंचही अगदी थाटात स्वागत करण्यात आले. यावेळी मोदींनी खेळाडूंशी अगदी दिलखुलास गप्पा गोष्टी केल्याचे पाहायला मिळाले.

PM मोदी आणि पॅरालिम्पियन खेळाडू यांच्यातील ग्रेट भेटीच्या दरम्यान अनेक वेगवेगळे पैलू पाहायला मिळाले. त्यात भारताचा गोल्डन बॉय नवदीप सिंग आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या भेटीचा क्षण लक्षवेधून घेणारा असा होता. ज्याची सोशल मीडियावरही सध्या जोरदार चर्चा रंगताना दिसत आहे.

जो व्हिडि व्हायरल होताना दिसतोय त्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे साधेपण आणि त्यांनी पॅरालिम्पिक गोल्डन बॉयला दिलेला मान या गोष्टीची खास झलक पाहायला मिळते. नवदीप हा PM मोदींसाठी एक खास कॅप घेऊन आला होता. त्याचे हे खास गिफ्ट स्विकारताना मोदीजींनी साधेपणा जपत पॅरालिम्पिक चॅम्पियनसाठी कायपण हा सीन दाखवून दिला. ते थेट जमिनीवर बसले. मग नवदीपनं त्यांना टोपी घातली. त्यानंतर पंतप्रधान मोदीजी यांनी नवदीपला स्वाक्षरीही दिल्याचे पाहायला मिळाले. पॅरिस पॅरालिम्पिकमधील भालाफेक इवेंटमधील गोल्डन बॉय आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यातील हा सीन सोशल मीडियावर चर्चेचा विषय ठरताना दिसतोय.

## वर्सोवा खाडीवरील प्रस्तावित पुलाचा खर्च वाढला नाही - पालिका प्रशासन

**प्रतिनिधी**
■ मुंबई

मुंबई उपनगरातील मालाड (पश्चिम) येथील मढ बेट येथील रहीवाशांना अंधेरी येथे जाण्याकरिता अंदाजे १८.६ किमीचे अंतर पार करावे लागते ज्यास साधारणतः १.३० तासाचा कालावधी लागत असल्याने मढ बेट येथील रहिवाशी व लोकप्रतिनिधी यांस कडून मढ व वर्सोवा मधील वर्सोवा खाडीवर पूल बांधण्याकरिता वांरवार मागणी होत होती. सदर ठिकाणी मढ जेट्टी-वर्सोवा येथील वर्सोवा खाडीवरील प्रस्तावित पुलाच्या बांधकामामुळे प्रवासाची लांबी १८.६ किमीवरुन ५ किमीपर्यंत कमी होण्यास मदत होईल आणि प्रवासाचा वेळ १ तास ३० मिनिटावरुन २० मिनिटापर्यंत कमी होईल. ज्यामुळे इंधन व वेळेची बचत होईल तसेच पर्यावरणाची हानी कमी करण्यास मदत होईल.

मढ-वर्सोवा पूल बांधणीच्या खर्चवाढीबाबत तसेच मढ-वर्सोवा पूल बांधणीच्या निर्मितीचे काम हे संथ गतीने होत असल्याने खर्च वाढत असल्याचे आरोपही होत आहेत. जनमानसामध्ये गैरसमज पसरु नयेत, याकरीता बृहन्मुंबई महानगरपालिका प्रशासनाने स्पष्टीकरण दिले आहे.

सदर प्रकल्पाची निविदा संकल्पना व बांधणी (Design & Build-FIDIC दस्तऐवज yellow book ) या तत्त्वावर मागवलेली होती. ज्यामध्ये प्रकल्पाचे मुख्य अभियांत्रिकी काम (स्थापत्य/यांत्रिकी व विद्युत, कामाचा खर्च, उन्नत मार्ग, केबल स्टे पूल इत्यादी सीसीटीव्ही, दिवाबत्ती, नियंत्रण कक्ष व इतर यंत्रणा, पर्यावरण व्यवस्थापन अंमलबजावणी, प्रचालणे व देखभाल खर्च (३ वर्षांकरिता), कामगार उपकर, विमा संरक्षण , सविस्तर अभियांत्रिकी खर्च आणि इतर कामाकरिताचा खर्च) रूपये २ हजार ३८ कोटी रूपये इतका खर्च (वस्तू व सेवा कर) वगळून अंदाजित केला होता. सदर अंदाजित खर्च हा निविदा सूचना प्रसिद्ध करते समयी असून त्यामध्ये कुठलाही बदल झालेला नाही. सदर निविदेच्या अनुषंगाने मे. एपको-आरबीएल (जेव्ही) यांनी सर्वात कमी किंमतीची अर्थात २ हजार २९ कोटी (वस्तू व सेवा कर वगळून) रूपयांची बोली लावली. सदर बोली ही महानगरपालिकेच्या अंदाजपत्राच्या पेक्षा (०. ४४) टक्क्यांनी कमी आहे. एकूण कामाचा कालावधी पावसाळा धरून ४२ महिने आहे. ज्यामध्ये सुरवातीचे ६ महिन्याचा कालावधी हा पर्यावरणीय परवानग्या व नाहरकत प्रमाणपत्रे प्राप्त करण्या करीता असून प्रत्यक्ष कामाचा बांधकाम कालावधी हा ३६ महिने आहे. सदर प्रस्तावित कामास मेसर्स ऍपको-आरबीएल (जेव्ही) यांस कंत्राटदार म्हणुन स्वीकृती पत्र (LOA) २९.०८.२०२४ रोजी देण्यात आले आहे. कंत्राटदारास थेट देय असलेली रक्कम स्वीकारलेली रक्कम ही (वस्तू व सेवा कर वगळून) रुपये २ हजार २९ कोटी इतकी आहे.

सदर प्रकल्पाची एकूण प्रकल्प रक्कम (Project Cost) ही रुपये ३ हजार ९९० कोटी इतकी असून ज्यामध्ये प्रकल्पाच्या अनुषंगाने १८ % वस्तू व सेवा कर, आकस्मित खर्च, तात्पुरती रक्कम (Provisional Sum), सानुग्रह अनुदान, कंत्राटावरील दरवृद्धी, कास्टिंग यार्ड व इतर सुविधा करीता लागणारे भाडे, आर्थिक तरतूदी, पाणी आकार, मलनिःसारण आकार, पर्यवेक्षण आकार, सल्लागार शुल्क (प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार) तसेच विविध प्राधिकरण यांना द्याव्या लागणाऱ्या शुल्काचा समावेश आहे.

या सर्व बाबी लक्षात घेता, वेगवेगळे कर व आर्थिक तरतुदी यांच्यापोटी सर्व बाबी गृहित धरुन त्याचा समावेश मूळ अंदाजित खर्चासह करुन प्रकल्पाच्या प्रस्तावास मंजुरी घेण्यात येते. त्याचा अर्थ प्रकल्पाचा खर्च वाढला असा लावणे हे वस्तुस्तिथीला धरून नाही. असे पालिका प्रशासनाने म्हटले आहे.

## मी राजीनामा देण्यास तयार

**पान १ वरुन...**

न आल्यामुळे त्यांनी स्पष्टच शब्दात भूमिका मांडली आहे. तसेच, मी पश्चिम बंगालच्या जनतेची हात जोडून माफी मागते, मी डॉक्टरांना वापस त्यांच्या कामावर रुजू करू शकले नाही, म्हणजेच डॉक्टरांनी आंदोलन मागे घेतलं नाही. त्यानंतर, ममता बॅनर्जी यांनी थेट राजीनाम्याची भाषा केली आहे. राज्यात सध्या डॉक्टरांनी काम बंद आंदोलन सुरू केले आहे, त्यामुळे, राज्यातील नागरिकांना वेळेवर उपचार व वैद्यकीय सुविधा मिळत नाहीत. या आंदोलनामुळे आत्तापर्यंत वेळेत उपचार न मिळाल्याने 27 नागरिकांचा जीवा गेला. मात्र, तरीही डॉक्टरांचे आंदोलन सुरूच आहे. मी तीनवेळा प्रयत्न केला, पण डॉक्टरांसोबत चर्चा होऊ शकली नाही. आता, यासंदर्भात जर कुठली बैठक होणार असेल तर ती राज्याचे मुख्य सचिव आणि संबंधित अधिकाऱ्यांसोबतच होईल, असेही ममता यांनी स्पष्ट केले.


**इंडियन बैंक Indian Bank**
इलाहाबाद ALLAHABAD

मरोळ शाखा: सीटीएस/ ३१ बी, प्रीमियर एम्पेरर, ऑसम हाईटस समोर, अशोक नगर, ऑफ मिलिटरी रोड, मरोळ, मुंबई ४०००७२ दूर क्र: ९१ ०२२ ८५७६५००, ९१ ०२२ ८५७६४००

**जोडपत्र IV ताबा सूचना [नियम – ८ (१)]**
स्थावर मालमत्तेसाठी

ज्याअर्थी, निम्नस्वाक्षरीकार सिक्युरीटायझेशन अँड रिकंस्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शियल ॲसेटस अँड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट (दुसरा) ॲक्ट, २००२ अंतर्गत इंडियन बँक, मरोळ श्खेचे प्रधीकृत अधिकारी आहेत आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) नियमावली २००२ च्या नियम ३ सह वाचल्या जाणाऱ्या कलम १३ (१२) अंतर्गत देण्यात आलेल्या अधिकारंचा वापर करून कर्जदार/ गहाणदार/ हमीदार मुन्निदेवी अमृतलाल यादव (सह-कर्जदार), मुन्निदेवी अमृतलाल यादव (लहान मुलगा राहुल अमृतलाल यादव ह्यांची आई आणि गार्डियन) ह्यांच्याकडे रु. १७,६३,६२५/- (रुपये सतरा लक्ष त्रेसष्ट हजार सह्शे पंचीवीस मात्र) १४.०६.२०२४ पासूनच्या व्याजासह प्रासंगिक खर्च, शुल्क, भार इत्यादीचा भरणा करण्यासाठी मागणी सूचना दिनांकित १४ जून २०२४ रोजी जारी करण्यात आली होती.

कर्जदार/ गहाणदार/ हमीदार हे रकमेचा भरणा करू न शकल्यामुळे सूचना ह्याद्वारे कर्जदार आणि सर्व जनतेला ह्याद्वारे देण्यात येत आहे की निम्नस्वाक्षरीकारांनी नमूद नियमांच्या नियम ९ सह वाचल्या जाणाऱ्या नमूद कायद्याच्या कलम १३ (४) अंतर्गत त्याना देण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून खाली वर्णन करण्यात आलेल्या मालमत्तेचा ०५ सप्टेंबर २०२४ रोजी घेतला आहे.

उपरोक्त नमूद केल्यानुसार विशेषत: कर्जदार/ गहाणदार/ हमीदार आणि सामान्य जनतेला ह्याद्वारे सूचना देण्यात येत आहे की मालमत्तेशी कोणताही व्यावःर करू नये आणि मालमत्तेशी असा व्यवहार रु. १७,६३.६२५/- (रुपये सतरा लक्ष त्रेसष्ट हजार सह्शे पंचीवीस मात्र) आणि त्यावरील व्याजाचा भरणा इंडियन बँक, मरोळ शाखा ह्यांच्याकडे करण्याच्या अधीन असतील.

सुरक्षित मालामत्ता सोडविण्यासाठी उपलब्ध असलेल्या वेळेच्या संदर्भात कायद्याच्या कलम १३ च्या पोटकलम (८) अंतर्गत असलेल्या तरतुदीकडे कर्जदाराचे लक्ष वेधून घेण्यात येत आहे.

**सुरक्षित मत्तेचे वर्णन**

सदनिका क्र. ४०४, ४ था मजला, विंग एफ, इमारत क्र. ०१, रिलायबल गार्डन फेज I, नायगाव पूर्व, गाव जुचंद्र तालुका वसई जिल्हा पालघर ४०१२०८. सीमा: उत्तर: ॲक्सेस रोड, दक्षिण: खुली जमीन, पूर्व: रिलायबल गार्डन, पश्चिम: खुली जमीन

सही/-
प्राधिकृत अधिकारी
इंडियन बँक

दिनांक: ०५.०९.२०२४
ठिकाण: मुंबई


## मुंबईचे जागतिक आर्थिक केंद्राचे स्वप्न दृष्टीपथात : मुख्यमंत्री

**पान १ वरुन...**

मुंबई ही आम्हा सर्वांसाठीच जीवनवाहीनी आहे. हा एक महत्वपूर्ण क्षण आहे. मुंबई बदलली तर महाराष्ट्र आणि देशासाठीही महत्वाचा बदल होणार आहेत. आम्ही राज्याच्या विकासासाठी स्थापन केलेल्या आर्थिक सल्लागार परिषदेने राज्याच्या विकासासाठी शिफारस आणि आराखडा सादर केला आहे. या आराखड्याला बळ मिळेल अशी संकल्पना घेऊन निती आयोग पुढे आला आहे. सात बेटांवरील मुंबईचा विकास आता एमएमआर आर्थिक केंद्र होण्यासाठी सात महत्वाच्या शिफारशी निती आयोगाने केल्या आहेत. मुंबई ही भविष्यात ग्लोबल फिनटेक कॅपिटल होईल, असा विश्वास आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशाची अर्थव्यवस्था फाईव्ह ट्रिलीयन डॉलर्स करण्याचे संकल्प केल्याचे नमूद करून मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले, हा संकल्प पूर्ण व्हावा यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत. यात महाराष्ट्राचे एक ट्रिलीयन डॉलर्सचे योगदान असेल असे नियोजन केले आहे. दावोस मध्ये झालेल्या जागतिक आर्थिक परिषदेतून विक्रमी अशी गुंतवणूक आली. तसेच जगभरातील महत्वाच्या उद्योगांनी महाराष्ट्रासाठी पसंती दिली. यातून मोठी गुंतवणूक येणार आहे. तसेच मोठ्या प्रमाणात रोजगार संधीही उपलब्ध होणार आहेत. यातून जागतिक आर्थिक केंद्राला बळच मिळणार आहे. एमएमआर जागतिक आर्थिक केंद्राच्या या संकल्पनेला साकार करण्यासाठी एमएमआरडीएध्ये विशेष मध्यवर्ती कक्ष स्थापन करण्यात येत असल्याचेही मुख्यंत्र्यांनी सांगितले.

उपमुख्यमंत्री श्री.फडणवीस म्हणाले, अटल सेतु – एमटीएचल या प्रकल्पामुळे तिसरी मुंबई उदयास येत आहे. यामुळे आंतरराष्ट्रीय स्तरावरचे टेक्नॉलॉजी हब या परिसरात उभे होत आहे.यातून देशातील डीजिटील ईकॉनॉमीलाही चालना मिळणार आहे. वाढवण बंदर, बुलेट ट्रेन, विरार-अलिबाग कॉरिडॉर यामुळे या परिसरांचा विकासात्मक असा कायापालट होणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

प्रा. श्वाब यांनी निती आयोगाच्या अहवालाचे आणि एमएमआर जागतिक आर्थिक केंद्र निर्माणासाठी सुरु असलेल्या अमंलबजावणीचे कौतुक केले. ते म्हणाले, हा अहवाल हाच मुळात अप्रतिम आहे. या ब्लू-प्रिंटमुळे विकासाला चालना मिळेल. यातून सामाजिक बदल आणि पर्यावरण पूरकतेचीही काळजी घेतल्याचे दिसते. या परिसरात जागतिकस्तरावरील आधुनिक अशा पायाभूत सुविधांची निर्मिती होईल. या सर्व प्रक्रियेमध्ये मानवी आस्थांचा विचार केला गेला आहे, हे देखील महत्वाचे आहे. यातून मुंबई ही जगातील सात महत्वाच्या महानगरांमध्ये स्थान पटकावेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. मुंबईत आल्यानंतर तरूण उद्यमींशी भेट झाली. या तरूणामध्ये भविष्यातील संधी, विकास याबाबत सकारात्मक ऊर्जा असल्याचे जाणवले. त्यामुळे मुंबईचा हा आर्थिक केंद्राचा मास्टर प्लॅन निश्चितच यशस्वी होईल, असेही ते म्हणाले.

## कॉंग्रेस नेते राहुल गांधींच्या निषेधार्थ रिपब्लिकन पक्षाचे आज आझाद मैदानात आंदोलन - कासारे

**प्रतिनिधी**
■ मुंबई

कॉंग्रेस पक्षाचे नेते राहुल गांधी यांनी आरक्षण संपविण्याबाबत केलेल्या वक्तव्याचा तीव्र निषेध करण्यासाठी रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना.रामदास आठवले यांच्या आदेशानुसार मुंबई प्रदेश रिपब्लिकन पक्षाच्या वतीने उद्या शुक्रवार दिनांक 13 सप्टेंबर रोजी दुपारी 2 वाजता मुंबईत आझाद मैदान येथे तीव्र आंदोलन करण्यात येणार असल्याची माहिती रिपब्लिकन पक्षाचे मुंबई प्रदेश अध्यक्ष सिद्धार्थ कासारे यांनी दिली आहे.

महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानाद्वारे दलित आदिवासी मागासवर्गीयांना दिलेले आरक्षण कधीही संपवता येणार नाही मात्र आरक्षण संपविण्याचा विचार राहुल गांधी यांनी व्यक्त केल्यामुळें कॉंग्रेस नेते राहुल गांधी यांचा रिपब्लिकन पक्षातर्फे तीव्र निषेध करण्यात येणार आहे .उद्या शुक्रवार दिनांक 13 सप्टेंबर रोजी दुपारी दोन वाजता आझाद मैदानात मुंबई प्रदेश रिपब्लीकन पक्षातर्फे राहुल गांधी यांचा निषेध करण्यात येणार आहे.या आंदोलनात रिपब्लिकन पक्षाचे मुंबई प्रदेश अध्यक्ष सिद्धार्थ कासारे; राष्ट्रीय सरचिटणीस अविनाश महातेकर; राज्य सरचिटणीस गौतम सोनवणे; विवेक पवार; बाळासाहेब गरुड; जिल्हा अध्यक्ष संजय पवार; संजय डोळसे; रमेश गायकवाड; प्रकाश कमलाकर जाधव; अजित रणदिवे ; साधू कटके ; महिला आघाडी च्या मुंबई अध्यक्षा उषा ताई रामलु आदी नेते या आंदोलनाचे नेतृत्व करणार आहेत.या आंदोलनात मुंबईतील सर्व रिपब्लिकन कार्यकर्त्यांनी उपस्थित राहण्याचे आवाहन रिपाइं मुंबई चे अध्यक्ष सिद्धार्थ कासारे यांनी केले आहे


**शहापूर नगरपंचायत, शहापूर. जि. ठाणे.**
मु. पो. शहापूर, जि. ठाणे. पिन - ४२१६०१

जा.क्र.श.न.प/कर/१०५७ / २०२४ — दिनांक- १२/०९/२०२४

**जाहीर सुचना**

शहापूर नगरपंचायत कार्यालयामार्फत शहापूर नगरपंचायत हद्दीतील मालमत्तांचा सर्व्हे करण्याच्या कामांकरिता संबंधित नोंदणीकृत / अधिकृत ठेकेदारांकडून द्वी लिफाफा पद्धतीने ई - निविदा दि. १३/०९/२०२४ रोजी पासून मागविण्यात येत आहे. या सदर निविदांची अधिक माहिती www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

सदर निविदांबाबत कोणतेही कारण न देता एक अथवा सर्व निविदा नाकारण्याचा अधिकार नगर पंचायतीने राखून ठेवला आहे.

| अ.क्र. | कामाचे नांव |
|---|---|
| 1. | Appointment of Agency for GIS Based Base map creation & Door to Door Property Tax Assessment Survey of All Properties and supply installation, implementation and integration of offline with response QR code solution for Shahapur Nagarpanchayat, to assist tax assessment process and to provide all required data in prescribed format |

शिक्का

सही/-
( शिवराज वि. गायकवाड )
मुख्याधिकारी
शहापूर नगरपंचायत, शहापूर


### मारवा व भाजपाविरोधात कॉंग्रेसचे आज आंदोलन

**मुंबई ।** लोकसभेचे विरोधी पक्षनेते खासदार राहुल गांधी यांना जीवे मारण्याची धमकी देण्यात आली आहे. देशविघातक शक्तींनी महात्मा गांधी, इंदिरा गांधी, राजीव गांधी यांचे बळी घेतले आहेत.आता पुन्हा गांधी संपवण्याची जाहीर धमकी दिली जात आहे व भाजपाचे सरकार मात्र त्यावर काहीही कारवाई करत नाही हे अत्यंत गंभीर व आक्षेपार्ह आहे. राहुल गांधी यांना जीवे मारण्याची धमकी देणारा भाजप नेता तरविंदरसिंह मारवा आणि भारतीय जनता पक्षाच्या विरोधात उद्या शुक्रवार 13 सप्टेंबर रोजी कॉंग्रेस पक्ष राज्यभर तीव्र आंदोलन करून भाजपा सरकारचा धिक्कार करणार आहे.


**बृहन्मुंबई महानगरपालिका**

**सार्वजनिक आरोग्य विभाग**
**कस्तुरबा हॉस्पिटल**
**साने गुरुजी मार्ग, चिंचपोकळी (पश्चिम), मुंबई ४०००११**
**क्र. एचओ /३८७८/ केएच दि. १२/०९/२०२४**

**ई-निविदा सूचना**

बृमनपाचे महानगरपालिका आयुक्तांसाठी आणि त्यांच्या वतीने वैद्यकीय अधीक्षक कस्तुरबा हॉस्पिटलद्वारे खाली नमूद करण्यात आलेल्या साहित्याच्या पुरवठ्यासाठी ऑन लाईन ई-निविदा मागवित आहेत.

| अनु. क्र. | बोली क्र. | प्रकाराचे नाव | परिमाण |
|---|---|---|---|
| १ | २०२४ एमसीजीएम _१०८३९३८_१ | ३ वर्षांच्या कालावधीकरिता कस्तुरबा हॉस्पिटलच्या पीसीआर लॅब येथील क्लीन रूम आणि ट्रान्सीट रूमच्या एअर कंडिशनिंग सिस्टीमच्या देखभाली करिता हेपा आणि प्री- फिटर बदलण्यासह व्यापक कंत्राट. | परिमाण देयकानुसार |

बोली सुरु : १३.०९.२०२४ रोजी १०:०० वा. बोली समाप्ती : १९.०९.२०२४ रोजी १६:०० वा.
संपर्क अधिकारी: डॉ. चंद्रकांत पी. पवार, वैद्यकीय अधीक्षक, कस्तुरबा हॉस्पिटल
दूर क्र. ०२२-२३०२७७६९ ई-मेल : ms01kasturba.phd@mcgm.gov.in
बोली योग्य प्रक्रियेने सादर ऑनलाईन सादर करावयात.
पूर्ण ई-निविदा कागदपत्रे महाटेंडर पोर्टल http://portal.mcgm.gov.in वर उपलब्ध आहे.

सही/-
वैद्यकीय अधीक्षक,
कस्तुरबा हॉस्पिटल

पीआरओ/१२६५/जाही/२०२४-२५

स्वमर्जीने औषधोपचार करू नका.



**केनरा बैंक Canara Bank**
भारत सरकार का उपक्रम — A Govt. of India Undertaking

**एआरएम शाखा – I मुंबई**
**३७ खसमल्या, पाटकर हॉल, न्यू मरीन लाईन्स , ठाकरसी मिल मार्ग, मुंबई ४०००२०**
**ई-मेल: cb2360@canarabank.com दूर: (०२२) २२०६५ ४२५ / ३० संकेतस्थळ: www.canarabank.com**

**विक्री सूचना**

**सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) नियमावली २००२ च्या नियम ८(६) मधील तरतूदीसह वाचल्या जाणाऱ्या सिक्युरिटायझेशन अँड रिकंस्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेटस अँड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ च्या तरतुदीच्या अंतर्गत स्थावर मालमत्तांच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना.**

याद्वारे सर्वसाधारणपणे लोकांना आणि विशेषतः कर्जदार आणि जामीनदारांना सूचना देण्यात येत आहे की खाली वर्णन केलेल्या स्थावर मालमत्ता सुरक्षित कर्जदाराकडे गहाण/शुल्क आकारल्या आहेत, ज्याचा प्रतिकात्मक ताबा अधिकृत अधिकाऱ्याने घेतला आहे. कॅनरा बँक, खाली वर्णन केल्याप्रमाणे देय रकमेच्या वसुलीसाठी खाली नमूद केल्याप्रमाणे "जशी आहे तिथे", "जशी आहे तशी" या आधारावर विकली जाईल. बयाणा रकमेची ठेव टेबलमध्ये नमूद केलेल्या खाली किंवा त्यापूर्वी जमा केली जाईल. आरटीजीएस / एनईएफटी / कॅनरा बँक ARM I शाखा A/C च्या क्रेडिटमध्ये निधी हस्तांतरण. क्रमांक 209272434. ईएमडीचे तपशील आणि इतर कागदपत्रे सेवा प्रदात्यावर किंवा त्यापूर्वी सबमिट करावयाची आहेत. मालमत्तेची तपासणी करण्याची तारीख खाली दिलेली आहे, ज्यात प्राधिकृत अधिकाऱ्याची पूर्व नियुक्ती आहे.

| अनु. क्र | कर्जदाराचे नाव | थकीत रक्कम | मालमत्तेचे वर्णन | राखीव रक्कम / इसारा रक्कम ठेव |
|---|---|---|---|---|
| 1 | कर्जदार: मे. मा ओम शिव शक्ती एजन्सी (प्रोप्रायटर श्री. विनय घनश्याम लाल देसाई) आणि हमीदार: श्री. कीर्ती एम. कनाकिया, श्री. निकुंज के कनाकिया, श्री विनय घनश्याम लाल देसाई | ३१.०८.२०२४ अनुसार रु. २,८९,०४,०९,३४१.८६ (रुपये दोनशे एकूणनव्वद कोटी चार लक्ष नऊ हजार तीनशे एक्केचाळीस आणि शहाऐंशी पैसे मात्र) अधिक त्यावरील ०१.०९.२०२४ पासूनचे व्याज | सहार रोड, सुतार पाखाडी, सहार एअर कार्गो कॉम्पलेससमोर, अंधेरी (पूर्व) मुंबई ४०००९९ येथे वसलेल्या जयंत अपार्टमेंट सीएचएस लि च्या ए विंग मधील सदनिका क्र. १०२ | रु. ४०,५०,००/- / रु. ४,०५,०००/- |

**ई-लिलाव दिनांक १५.१०.२०२४ आहे आणि बोली/ इरठे/सहभागी होण्यासाठी विनंती पत्र सादर करण्यासाठी शेवटचा दिनांक १४.१०.२०२४ रोजी सायं. ५.०० वा. पृवी आहे.**

विक्रीच्या तपशीलवार अटी व शर्तींसाठी, कृपया कॅनरा बँकेच्या वेबसाइटवर (WWW.CANARABANK.COM) प्रदान केलेल्या "ई-लिलाव" या लिंकचा संदर्भ घ्या किंवा डॉ. सीमा सोमकुवार, अधिकृत अधिकारी, कॅनरा बँक, एआरएम I शाखा, मुंबई यांच्याशी संपर्क साधा (दूरध्वनी क्र.: (०२२) २२०६ ५४२५ / ३० / मोबा क्र. ८६५५९६३४८९) किंवा श्रीमती रिंकिता सोडानी ऑफिसर (मोबा क्र. ९४१३६४१७०१) ई-मेल आयडी : CB2360@CANARABANK.COM कोणत्याही कार्यालयीन वेळेत. सेवा प्रदान करते मे. पीएसबी अलायन्स (EBKRAY), युनिट 1, 3रा मजला, विओस कमर्शियल टॉवर, वडाळा ट्रक टर्मिनल जवळ, वडाळा पूर्व, मुंबई - ४०० ०३७, संपर्क व्यक्ती श्री धर्मेश आशर मोब. ९८९२२१९८४८, (AVP.PROJECTMANAGER2@PSBALLIANCE.COM), हेल्प डेस्क क्रमांक ८२९१२२०२२०, (SUPPORT.EBKRAY@PSBALLIANCE.COM), वेबसाइट: HTTPS://EBKRAY.IN

दिनांक: ०९.१०.२०२४
ठिकाण: मुंबई

सही/-
अधिकृत अधिकारी कॅनरा बँक , एआरएम I शाखा


संदीप कदम यांच्या घरचा गौरी-गणपती
मु.पो.आरे (आरेश्वर वाडी) ता. देवगड, जि. सिंधूदुर्ग


योगेश सुभाष हेंद्रे व परिवार 540 नारायण पेठ साई केशर अपार्टमेंट केळकर रोड पुणे.


उदय मसुरकर यांच्या घरचा गौरी गणपती जोगेश्वरी (ईस्ट ) मुंबई


विवेक प्रमोद रहाटे गोराई २ बोरिवली (प )
यांच्या घरातील सुंदर मूर्ती


अनंत पांडुरंग चव्हाण यांच्या गांधीनगर,
कोपरी, ठाणे (पूर्व) येथील निवासस्थानी
विराजमान झालेले गणपती बाप्पा


वेदांत इंपिरियल मधील
विराजमान वेदांत इंपिरियल राजा


मुलुंडचा केळशीकरांचा बाप्पा...
नील सुशांत केळशीकर, टाटा कॉलनी, आदिश मेचट्रॉनिकस


श्री गोवर्धन भुवन चा राजा (खेतवाडी ) गिरगाव
मधील विराजमान बाप्पा


श्री नरेश कायंदेकर विलेपार्ले येथील
गणपती बाप्पा ची शाडूची सुबक मूर्ती


अलिबाग तालुक्यातील सुप्रसिद्ध हाशिवऱ्याचा राजा' ची सुबक मूर्ती


सौ. सेलवी विनायक मूर्ती यांच्या घरीची शाडूची
भांडुप मधील गणपती बाप्पा ची सुबक मूर्ती


सागरचा विघ्नहर्ता, सागर नगर सार्वजनिक
गणेशोत्सव मंडळ, वाकोला, सांताक्रूझ (पूर्व). मुंबई


मुंबई काँग्रेसच्या उपाध्यक्षा माधवी राणे व 57
चे ब्लॉक अध्यक्ष गौरव राणे यांच्या मोतीलाल
नगर 1, गोरेगाव (पश्चिम) येथील घरी विराजमान
झालेली श्रींची रेखीव मूर्ती.


राजेश शिंदे यांच्या बी/703, आशीर्वाद रेसिडेन्सी,
वजीरा नाका, बोरीवली (पश्चिम) येथील रेखीव
गौराईसह गणरायाची सुबक मूर्ती दिसत आहे.


संगणक क्षेत्रात विद्यार्थ्यांना सर्वोत्तम शिक्षण देणारे सुभाष खडतरे
यांच्या आंबोली, अंधेरी (पश्चिम)च्या निवासस्थानी गौराई मातेसह श्रींची
विराजमान झालेली मूर्ती दिसत आहे. तसेच यावेळी सुभाष खडतरे यांची
पत्नी, त्यांचे भाऊ संतोष खडतरे यांनी पत्नीसह आशीर्वाद घेतले.


गोरेगाव पूर्व येथील श्री पिंपळेश्वर दुर्गा चॅरिटेबल
ट्रस्टची गणरायाची सुंदर मूर्ती. सदरचे ट्रस्टचे
ट्रस्टी समाजसेवक रवी गुप्ता आहेत.


बदलापूर पश्चिम येथील कृष्णा इस्टेट
सार्वजनिक उत्सव मंडळ, वर्ष १७ वे हि
मनमोहक गणेशमूर्ती दिसत आहे.


मधुकर जगन्नाथ माने घाटकोपर यांच्या
निवास स्थानी विराजमान श्री गणेश


श्री वसंत देवळेकर आणि परिवार, गौरी गणपती,
लोअर परळ येथील रेखीव गौराईसह गणरायाची
सुबक मूर्ती दिसत आहे.


नितीन आंबोकर व कुटुंबीय, नालासोपारा पश्चिम
यांची मनमोहक गणेशमूर्ती दिसत आहे.


मुक्तपत्रकार - वृत्तपत्रलेखक दिनेश हरिश्चंद्र
तुरे यांच्या वावे -अलिबाग या निवासस्थानी
विराजमान झालेली श्री गणरायाची सुंदर - सुबक
व विलोभनीय आरास


पार्थवी संजय दुबे, डीजीएस शीतल सेजल
सोसायटी, नालासोपारा येथील गणपती

# वेदगंगा सहकारी पतसंस्था मर्या., मुंबईची २६ वी वार्षिक सर्वसाधारण सभा संपन्न

**मुंबई । प्रतिनिधी**

वेदगंगा सहकारी पतसंस्था मर्या. मुंबईची २६ वी वार्षिक सर्वसाधारण सभा खेळीमेळीच्या वातावरणात विद्याविहार मुंबई येथील के. जे. सोमय्या ऑडीटोरीअम सभागृहात संपन्न झाली. सभेच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे चेअरमन डॉ. बाळकृष्ण द. पाटील हे होते.



सुरुवातीला कार्यक्रमाचे दिपप्रज्वलन मान्यवरांचे हस्ते झाले. संस्थेचे सचिव बळवंत पाटील यांनी पतसंस्थेचा इतिवृतांत अहवाल वाचन केले. यावेळी पतसंस्थेचे विविध ठराव बहूमताने मंजूर करण्यात आले. या प्रसंगी शैक्षणिक क्षेत्रात यश संपादन करणाऱ्या सभासदांच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला. या वेळी उद्योजक रोहीदास शिंदे, कुर्ला शाखा कॅनरा बँकेचे व्यवस्थापक जगन्नाथ बुगडे, पोलीस उपनिरीक्षक नवनाथ काळे, माणूस फाऊंडेशनचे संदिप धम्मरक्षित, संस्थेच्या खजिनदार सौ. छाया सावर्डेकर, मान्यवर, संचालक व सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.



कार्यक्रमाचे सुत्रसंचालन भुषण हांडे, संजय शिंदे यांनी तर आभार संस्थेचे उपाध्यक्ष गणपती पाटील यांनी केले. २६ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे योग्य नियोजन सर्व संचालक, सर्व शाखा व्यवस्थापक, कर्मचारी वर्ग व संस्थेचे व्यवस्थापक कृष्णा यशवंत देसाई यांनी केले.